डिटेक्टिव्ह अल्फा रहस्यकथा

# अर्धप्रकाशित खिडकी



सौरभ वागळे


डिटेक्टिव्ह अल्फा
Series

**ई साहित्य प्रतिष्ठान**

सादर करत आहे

# डिटेक्टिव्ह अल्फा

# आणि

# अर्धप्रकाशित खिडकी

सौरभ वागळे

# लेखक : सौरभ वागळे

Mail:

sourabhwagale@yahoo.com

Facebook:

https://www.facebook.com/sourabh.wagale

https://www.facebook.com/detectivealfa123/

Instagram:

https://www.instagram.com/sourabh238?r=nametag

https://www.instagram.com/detective_alfa?r=nametag


## मुखपृष्ठ: सौरभ वागळे


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237 (Whatsapp)

प्रकाशन : ९ जून २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**सौरभ वागळे** हे आयआयटी मुंबईच्या २०२० बॅचचे एम-टेक् पासआऊट आहेत. सांगली येथे जन्म व शिक्षण झालेल्या सौरभ यांनी शाळेत असतानाच लिखाणाला सुरुवात केली. जे. के. रोलिंग व सर आर्थर कॉनन डॉयल हे त्यांचे प्राथमिक आदर्श. सुरुवातीला केवळ हौस म्हणून लिहिता लिहिता त्यांनी कॉलेजमध्ये बरीच नाटकं आणि मॅगझिनसाठी विज्ञानकथा लिहिल्या.

२०१६ साली ईसाहित्य प्रतिष्ठानने त्यांची ‘डिटेक्टिव्ह अल्फा आणि रत्नजडित खंजिराचे रहस्य’ ही कथा प्रकाशित केली आणि तेव्हा खऱ्या अर्थाने सौरभ वागळे हे नाव मराठी वाचकांच्या समोर आलं. तिथून पुढच्या सहा वर्षांत त्यांनी ‘डिटेक्टिव्ह अल्फा’ या पात्रावर आधारित बारा

पुस्तके (चौदा कथा) प्रकाशित केल्या आणि मराठी रहस्यकथाप्रेमींचा त्यांना प्रचंड प्रतिसाद लाभला. त्याच मालिकेतील ही पंधरावी कथा.

सौरभ यांना वाचनाचं वेड आहे (त्याला छंद म्हणणं अत्यंत गैर ठरेल!). अगाथा ख्रिस्ती, सत्यजित रे, सुहास शिरवळकर, बाबूराव अर्नाळकर यांच्या कथांनी सौरभ यांचं बुकशेल्फ खचाखच भरलेलं आहे. त्यांना गायन व नाटकांतही रस आहे. त्यांना भटकंती व ऐतिहासिक स्थळांना भेट देणं आवडतं. सध्या ते 'बेकार्ट' या कंपनीत रिसर्च अँड डेव्हलपमेंटमध्ये टेक्नॉलॉजी इंजिनिअर म्हणून काम करतात व आपल्या पत्नीसह पुण्यात राहात आहेत.

# डिटेक्टिव्ह अल्फाचे यापुर्वीचे भाग

यातील काही वाचायचे राहिले असतील, पुन्हा वाचायचे असतील तर खालील लिंक्स तुम्हाला ते डाऊनलोड करण्यास मदत करतील –

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 1 : रत्नजडित खंजिराचे रहस्य

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 2 : 'देखावा'

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 3 : जुन्या घराचे गूढ

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 4 : अंधारातील पाऊल

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 5 : मृत्यूचे संदेश

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 6 : पछाडलेला प्रोफेसर

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 7 : 'द मूनलाईट मर्डर' प्रकरण

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 8 : गायब झालेली 'स्टार्लेट'

डिटेक्टिव्ह अल्फा भाग- 9: 'मोरेवाडी इस्टेट'मधील रहस्य

डिटेक्टिव्ह अल्फा भाग – 10: 'अमर-अकबर-अँथनी' कोडं

डिटेक्टिव्ह अल्फा भाग- 11 : ग्रामदेवतेचा प्रकोप

डिटेक्टिव्ह अल्फा भाग- 12 : कोरलेल्या तीन आकृत्या

Wholeheartedly dedicated to

My MOM & DAD

# डिटेक्टिव्ह अल्फा

# आणि

# अर्धप्रकाशित खिडकी

या पुस्तकातील कथा, पात्रे, घटना आणि स्थळे पूर्णतः काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही आणि असल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# एक

हे प्रकरण जेव्हा घडलं, तेव्हा माझे मुंबईतले काही शेवटचे दिवस सुरू होते. माझं आयआयटीमधलं मास्टर्स थेसिस नुकतंच संपलं होतं आणि मी थोडासा मोकळा श्वास घ्यायला लागलो होतो. काही महिन्यांपूर्वीच मी पीएचडीच्या ॲडमिशनसाठी ॲप्लाय करायला सुरुवात केली होती. सगळ्या एक्झाम्स, इंटरव्ह्यूज् आणि इतर प्रक्रिया पार पडल्यानंतर अखेर माझ्या सुदैवाने म्हणा, किंवा मी केलेल्या कष्टांचं फळ म्हणा, पण मला इंग्लंडच्या केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये पीएचडीसाठी ॲडमिशन मिळालं. सप्टेंबरला सुरू होणाऱ्या ऑटम सेमिस्टरसाठी मी युकेला रवाना होणार होतो आणि त्यासाठी लागणारी पासपोर्ट-व्हिजा वगैरे डॉक्युमेंट्स जमा करण्याची माझी धावपळ सुरू होती. सध्या मे महिना सुरू होता आणि जूनमध्ये मी माझा आयआयटीमधला सगळा

संसार गुंडाळून घरी जाणार होतो. त्या आधी मुंबईतली सगळी कामं उरकण्याचं ध्येय मी डोळयांसमोर ठेवलं होतं.

माझ्या केंब्रिजच्या अॅडमिशनमुळे सगळयांना इतका आनंद झाला होता, की विचारू नका! माझे वडिल पेशाने प्राध्यापक असल्यामुळे त्यांना 'केंब्रिज' या नावाचं महात्म्य ठाऊक होतं. इचलकरंजीसारख्या कुणाला ठाऊकदेखील नसलेल्या छोट्याशा शहरात शिकलेला आमचा मुलगा जगातील नंबर एकच्या युनिव्हर्सिटीत जाऊन पोचला, असं ते अभिमानाने प्रत्येकाला सांगत होते. मी जाईन तिथे अक्षरशः उत्सवमूर्ती बनत होतो. मी शिकलेल्या शाळा, कॉलेजमध्ये माझ्या नावाने पोस्टर लावले गेले होते (आणि हे कळाल्यावर मी कपाळावर हात मारून घेतला होता). माझ्या एमटेक् प्रोजेक्ट गाईडने माझ्या या यशाबद्दल पार्टीचं आयोजन केलं आणि लॅबमधल्या प्रत्येकाला आमंत्रण दिलं.

या सगळयात मला स्वतःला फार काही आकर्षण असं वाटत नव्हतं. अर्थात, भारत सोडून दुसऱ्या देशात शिकायला जाणार, नवे लोक, नवी ठिकाणं बघायला मिळणार याची उत्सुकता होती. पण इतका मानसन्मान मिळणं म्हणजे जरा जास्तच होत होतं. आपल्या आईवडिलांच्या, नातेवाईकांच्या, मित्रांच्या चेहऱ्याने वर दिसणारा आनंद हाच माझ्यासाठी खरा सन्मान होता. मी त्यांच्या कौतुकाला पात्र झालो, त्यांची शाबासकी मिळवली, यातच सर्वकाही आलं.

या सगळयात एक मनुष्य असा होता, ज्याला या सगळयाचं ना आनंद होता ना कौतुक होतं. तो म्हणजे अल्फा. मला ॲडमिशन मिळाल्याचा जेव्हा मेल आला, तेव्हा तो माझ्या समोरच बसला होता. मी मेल वाचून एकदम आनंदाने उडीच मारली.

“येऽस!! अल्फा... मला केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये पीएचडीला ॲडमिशन मिळालं!! आय कान्ट बिलीव्ह्... केंब्रिज...!!“

अल्फा तेव्हा टेबलावर एका पांढऱ्या कागदाच्या पृष्ठभागावर ठेवलेल्या कसल्यातरी सूक्ष्म गोष्टीचं भिंग डोळयाला लावून निरिक्षण करत होता. त्याने फक्त मान वर करून ‘अं?’ असं केलं.

“केंब्रिज मित्रा केंब्रिज!!” मी ओरडलो, “जगातल्या नंबर वन युनिव्हर्सिटीत मला शिकायला मिळणार... इंग्लंडला जायला मिळणार! लोकांचं आयुष्यभरासाठी स्वप्न असतं केंब्रिजमध्ये रिसर्च करण्याचं. काही मोजक्याच लोकांना तिथं प्रवेश मिळण्याचं भाग्य लाभतं. त्या मोजक्या लोकांमध्ये माझा नंबर लागला आहे!!”

अल्फाने माझ्याकडे भावशून्य चेहऱ्याने पहात माझं बोलणं ऐकून घेतलं, प्रतिक्रियेदाखल एक भुवई बारीकशी उडवली आणि पुन्हा भिंगात डोळा घालून कागदाकडे पाहू लागला.

“अरे!! असा बहिऱ्यासारखा काय करतोयस? मी काय सांगितलं ते ऐकलंस का तू?” मी जरा घुश्श्यातच म्हणालो. यावर तो आता डोकं वरसुद्धा न करता म्हणाला,

“श्‌ श्‌ श्‌.. मला डिस्टर्ब करू नकोस. तुझ्या बातमीवर मी आत्ता प्रतिक्रिया व्यक्त करू शकत नाही. मी आत्ता एका क्लिष्ट पुराव्याचे अवलोकन करण्यात मग्न आहे. ते पूर्ण होईपर्यंत कोणत्याही भावनांचा स्पर्श मला होऊ शकत नाही. जरा दम धर. माझं झालं की मग आपण तुझं जे काही आरडाओरडा करण्याचं कारण आहे त्यावर चर्चा करू.”

त्याच्या त्या प्रतिक्रियेवर मी अक्षरशः सुन्न झालो होतो. जरा वेळ शांततेत गेल्यावर मग त्याने अखेर डायरी मिटली आणि मग तो माझ्याकडे वळला.

“हं. काय म्हणत होतास मघाशी?” अल्फाने विचारलं. यावेळी मी लक्ष दिलं नाही. माझ्या नातेवाईकांना आणि कॉलेजच्या मित्रांना माझ्या ॲडमिशनची बातमी देण्यासाठी मोबाईलवर मेसेज टाईप करत राहिलो.

“टिट फॉर टॅट, हं!” अल्फा हसत म्हणाला, “मी तुला मघाशी काही प्रतिक्रिया दिली नाही याचा अर्थ असा नाही, की मला मुळीच आनंद झाला नाही. मला ठाऊक आहे, की केंब्रिजला ॲडमिशन मिळवणं ही तुझ्यासाठी खुप मोठी गोष्ट आहे. पण मी ज्या पुराव्याचं ॲनालिसिस करत

होतो, त्यावर एका माणसाचं जीवनमरण अवलंबून होतं. त्यामुळे तुझं अभिनंदन करायला दोन मिनिटं उशीर झाला तर फारसं काही बिघडत नाही. तुझ्या ॲडमिशनची बातमी चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी चुकीच्या व्यक्तीसमोर तुला समजली असं म्हण हवं तर.”

यावर मी काय बोलणार! नंतरदेखील तो फार विषय न वाढवता घाईघाईने कुठल्यातरी कामानिमित्त बाहेर निघून गेला. त्यानंतर बरेच दिवस मी रागावलेलोच होतो. त्याच्याकडे जायचं मुद्दामच मी टाळलं. नंतर एके दिवशी त्याचाच फोन आला, आज मी रिकामा आहे, कुठेतरी जेवायला जाऊ म्हणून. मी त्याच्याकडे गेलो, मग आम्ही जेवायला गेलो, तरीही अल्फा माझ्या ॲडमिशन आणि इंग्लंडला जाण्याच्या विषयावर जेमतेमच बोलला. का कुणास ठाऊक, पण मला असं वाटत होतं की त्याला मुळातच आनंद झाला नव्हता. पण मी त्याबद्दल त्याला काही बोललो नाही.

नंतर काही दिवस मीच व्हिजा आणि इतर कागदपत्रांच्या कामात गुंतल्यामुळे मला अल्फाकडे जाणं झालं नाही. मग दहा-पंधरा दिवसांनी पुन्हा अल्फाचा फोन – ‘उद्या सकाळी मी रिकामा आहे. चहाला येतोस का?’ आवाजात तोच कोरडेपणा, निरुत्साह. मी ‘येतो’ असं सांगितलं. त्यावेळी मात्र मी मनाशी ठरवलंच होतं, की आज अल्फाला जाब

विचारायचा. त्याच्या अशा विचित्र वागण्यामागचं कारण त्याच्याकडून वदवून घ्यायचंच.

सकाळी लवकर मी कॉलेजमधून बाहेर पडलो आणि साडेआठच्या सुमारास पवई मार्केटपाशी असणाऱ्या अल्फाच्या अपार्टमेंटमध्ये जाऊन पोहोचलो. त्याच्या फ्लॅटबाहेर सँडल काढून ठेवत असताना तिथं चपलांची आणखी एक जोड पाहून मला लक्षात आलं, की अल्फाला भेटायला कोणीतरी आलंय. इतक्या सकाळी कोण बरं आलं असेल, याचा विचार करत मी दार ढकललं आणि आत प्रवेश केला.

खुर्चीवर एक सडपातळसा मनुष्य बसला होता. त्याच्या अंगावर असलेला फिक्कट निळ्या रंगाचा युनिफॉर्म आणि त्यावर खिशाजवळ शिवलेली अक्षरं यावरून तो 'ग्रँड फोर्स' नावाच्या सिक्युरिटी कंपनीचा वॉचमन आहे, हे माझ्या लक्षात आलं. तसा तरुणच होता तो. लेट ट्वेन्टीज् मध्ये वय असेल. रापलेला चेहरा, थोडे खोबणीत असलेले डोळे, क्लीन शेव्ह, नाकाखाली जाडसर मिशी अशी एकूण चेहरेपट्टी होती. एकूण वागण्यावरून तो कसल्यातरी कारणाने अस्वस्थ आहे. असं मला वाटलं. मी आत येताच अल्फा आणि त्याचा हा नवा पाहुणा, दोघांनीही माझ्याकडे पाहिलं.

"ये, ये प्रभू. बस." अल्फा समोरच्या खुर्चीकडे बोट दाखवत म्हणाला, "आपल्या चहाच्या बेतमध्ये थोडासा बदल झाला तर हरकत

नाही ना? कारण आपल्याकडे अनपेक्षितपणे एक पाहुणे आले आहेत. तसं तू बरोबर वेळेतच आलास, कारण आमचीही अजूनपर्यंत केवळ ओळखच झाली आहे.”

अल्फा समोर बसलेल्या माणसाकडे हात करत म्हणाला,

“हे श्री. दिपक कोळी. ग्रँड फोर्स सिक्युरिटी सिस्टीमतर्फे वॉचमनचे काम करतात. दिपक, आपल्या वयात फारसं अंतर दिसत नाही, त्यामुळे मला वाटतं आपण फार औपचारिकता न पाळता अरे-तुरे करू शकतो. तुला माझ्या मित्राची ओळख करून देतो. हा प्रभव, याने आयआयटीमध्ये नुकतंच पोस्ट ग्रॅज्युएशन पूर्ण केलं. हा माझा खास मित्र आहे आणि माझ्या बऱ्याचशा शोधकार्यात याचा सहभाग असतो. त्यामुळे तुला जे काही सांगायचं आहे, ते याच्या समोर सांगितलंस तरी चालेल.”

दिपकने थोडी चुळबुळ केली. त्याचा चेहरा सचिंत दिसत होता. बऱ्याच अनिश्चिततेनंतर त्याने अल्फाकडे यायचा निर्णय घेतला असावा. अखेर शब्दांची जुळवाजुळव करत तो म्हणाला,

“मी… मी खरंतर आधी पोलीस स्टेशनला गेलो होतो. पण त्यांना माझी समस्या फारशी महत्त्वाची वाटली नाही. मग तिथल्याच एका हवालदाराने मला तुमचं नाव सुचवलं. तुम्हाला विचित्र गोष्टींमध्ये फार रस

आहे, तुम्हीच माझी मदत करू शकाल असं त्याने सांगितलं. म्हणून मी तुमच्याकडे आलो आहे.”

त्याच्या भाषेवरून मला लगेच लक्षात आलं, की हा मनुष्य मुळचा विदर्भातला आहे. फारसा शिकलेला नसावा, पण बोलण्याच्या पद्धतीवरून कळालं, की स्वभावाने सभ्य व सरळ आहे.

“हं, मला विचित्र गोष्टींमध्ये रस आहे खरा.” अल्फा स्मित करत म्हणाला, “बोला, काय समस्या आहे तुमची?”

“सांगतो, पण त्याआधीही एक गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे. तुमची सर्व्हिस ही मुंबईत प्रसिद्ध आहे, म्हणजे तुम्ही प्रकरण स्विकारण्याची फीसुद्धा जास्त घेत असणार. पण माझी फी भरण्याची ऐपत नाहीये. मी एक साधा वॉचमन आहे. शिवाय हे प्रकरण माझ्या वैयक्तिक आयुष्याशी निगडित आहे असंही नाही. फक्त मला या संबंधात घडलेल्या घटना आणि त्यांचा परस्परसंबंध थोडा रहस्यमय वाटतोय म्हणून मी कुतूहलापोटी तुमच्याकडे आलो आहे.”

त्यावर अल्फा जोरात मान हलवत म्हणाला,

“चक् चक् चक्… त्या सगळ्या गोष्टी माझ्यासाठी दुय्यम आहेत. तुम्ही तुमची समस्या आधी मला सांगा. जर त्यात खरंच काही माझ्या बुद्धीला आव्हान देण्यासारखं काहीतरी आहे असं मला वाटलं, तर मी फी

वगैरे गोष्टींचा विचारसुद्धा करणार नाही. पण जर मला त्यात विशेष काही दिसलं नाही, तर मग मी तुम्हाला आणखी काही डिटेक्टिव्ह एजन्सीज् चे कॉंटॅक्ट मिळवून देईन. ते तुमचं कुतूहल शमविण्याचं काम करतील.”

“अं... बरं ठीक आहे. मी तुम्हाला शक्य तितकं सविस्तर सांगण्याचा प्रयत्न करतो.” दिपक कोळी म्हणाला, “तुम्ही आत्ताच माझी ओळख करून दिली, त्याप्रमाणे मी ‘ग्रँड फोर्स’ सिक्युरिटी कंपनीमध्ये काम करतो. आमची कंपनी विविध रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्सचे सिक्युरिटी कॉंट्रॅक्ट्स घेते आणि त्यांना सिक्युरिटी फोर्स पुरवते. सिक्युरिटी फोर्स म्हणजेच थोडक्यात वॉचमन लोक, किंवा सिक्युरिटी गार्डस्. मुंबईतल्या जवळजवळ शंभर अपार्टमेंट कॉम्प्लेक्समध्ये ग्रँड फोर्सचेच वॉचमन आहेत. मी त्यांतलाच एक. माझी ड्यूटी मलबार हिलजवळच्या ‘स्कायलाईन’ अपार्टमेंटमध्ये आहे. तिथल्या मेन गेटवर मी नाईट शिफ्टला असतो.

“हे स्कायलाईन अपार्टमेंट समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावरच आहे. समुद्राचा मस्त व्ह्यू दिसतो तिथून. त्या अपार्टमेंटच्या शेजारीच समुद्राच्या बाजूला एक इमारत अंडर कंस्ट्रक्शन आहे. खरंतर तिथलं बांधकाम जवळपास पूर्ण झालंच आहे, पण तरीही तिथं कोणी रहात नाही. याचं कारण म्हणजे, ती इमारत कसल्यातरी वादात अडकली आहे. मुंबईतील बडे बिल्डर हिरेन कपाडिया यांनी ती बांधली आहे. पण बहुतेक

त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांचं कारस्थान असेल किंवा आणखी काय, कुणास ठाऊक. पण ती इमारत बेकायदेशीर जागेत बांधली आहे अशी कोणीतरी तक्रार केली आणि तेव्हापासून त्यावर कोर्टात खटला सुरू आहे. जवळपास वर्षभर ती इमारत तशीच अपूर्ण अवस्थेत उभी आहे.

“तिथं कोणी रहात नसूनदेखील इमारतीची देखभाल करण्यासाठी बिल्डरने एक वॉचमन नेमला होता. याचं कारण म्हणजे, इमारतीत आणि तिच्या आवारात बरंच बांधकामाचं साहित्य गेल्या वर्षी आणून टाकलं होतं. ते तिथं तसंच पडून आहे. ते सामान कोणीतरी घेऊन जाऊ नये, शिवाय रिकामी इमारत बेवड्यांचा – भिकाऱ्यांचा अड्डा बनू नये म्हणून रात्रीच्या वेळी एक वॉचमन तिथं नेमण्यात आला. सत्पाल सिंग असं त्याचं नाव. सरदारजी होता. मी शेजारच्याच अपार्टमेंटमध्ये मेन गेटला असल्याने आमची ओळख झाली. स्वभावाने एकदम दिलदार आणि भला माणूस होता तो. खूप धाडसी होता तो. इतर वॉचमन लोकांसारखा कामचुकारपणा अजिबात करायचा नाही.

“त्याची एकच सवय होती, जी वाईट होती – ती म्हणजे दारूचं व्यसन. ड्यूटीवर असतानासुद्धा त्याच्या खिशात एक बाटली असायचीच. तसं पाहिलं तर तो कधी नशेत किंवा अगदी दारू पिऊन झिंगलेला वगैरे मी पाहिला नाही. पण तास दोन तासांनी एखादा घोट घेतल्याशिवाय त्याला जमायचंच नाही. त्याच्याविरुद्ध बऱ्याच तक्रारी आल्या. पण

त्याचा अनुभव आणि प्रामाणिकपणा पाहून तो काम करत असलेल्या सिक्युरिटी कंपनीने त्याला रेसिडेन्शियल अपार्टमेंटमध्ये ड्युटीला न पाठवता इकडे रिकाम्या इमारतीच्या देखभालीसाठी ठेवलं होतं.

"तो फिरत फिरत आमच्याकडे यायचा आणि गप्पा मारायचा. त्याला शेरोशायरी करण्याचा नाद होता. रिकाम्या इमारतीवर पहारा देता देता त्याने त्याच्या डायरीत बऱ्याच शायऱ्या लिहून काढल्या होत्या. त्या ऐकवून तो आमची करमणूक करायचा."

अचानक अल्फाने कोळी सांगत असलेल्या हकिकतीवरून लक्ष काढून घेतलं. त्याने आपला मोबाईल उचलला आणि नाक खुपसून काहीतरी धुंडाळू लागला. त्याच्या या कृतीमुळे कोळी आपलं बोलणं थांबवावं की सुरू ठेवावं, या गोंधळात पडला. तेवढ्यात अल्फाने मोबाईलवर सेव्ह केलेली एक इमेज काढून आम्हाला दाखवली. तो एका न्यूज ॲपवरच्या बातमीचा फोटो होता. त्याची हेडलाईन अशी होती –

'मलबार हिल येथील इमारतीचा वॉचमन एक आठवड्यापासून बेपत्ता, पोलीस चौकशीस सुरुवात'

"तू जे बोलतो आहेस, ते याबद्दलच आहे का?" अल्फाने विचारलं.

"हो हो… सत्पाल सिंग गायब झालाय. त्याबद्दलच बोलायला मी इथं आलो आहे." कोळी म्हणाला.

"तू मलबार हिल आणि वॉचमन या दोन शब्दांचा उल्लेख करताच माझ्या डोक्यात ही बातमी घोळायला लागली होती. पण तरीही मी खात्री होईपर्यंत ऐकत राहिलो. पण नंतर तू त्या सत्पाल सिंगचा भूतकाळात उल्लेख करायला लागलास, तेव्हा मला लक्षात आलं, की तू ज्या माणसाबद्दल बोलतोयस तो हाच." अल्फा म्हणाला, "पण मला एक कळत नाही. ही बातमी तर जवळपास महिन्याभरापूर्वीची आहे. म्हणजे सत्पाल सिंग त्याही आधी आठवडाभर गायब होता. मग तू आत्ता हे सगळं घेऊन माझ्याकडे का आला आहेस?"

"सांगतो." कोळी म्हणाला, "सत्पाल सिंग गायब होऊन आता बरेच दिवस झाले, हे खरं आहे. पण अजूनही तो कुठं आहे, जिवंत आहे की मेलाय, हे अद्याप कुणालाही समजलेलं नाही. तो गायब झाला, तेव्हा मी सुट्टीवर होतो. माझ्याच सोबतच्या एका वॉचमनने त्याला रात्री शेवटचं पाहिलं होतं. त्यानंतर तो कुठं गेला, पोलीसांनी त्याचा कितपत शोध घेतला, हे आम्हालाही ठाऊक नाही. त्या रिकाम्या इमारतीच्या गेटपाशी सत्पालला बसण्यासाठी एक पत्र्याची केबिन बांधून दिली होती. तो गायब झाल्यानंतर इमारतीच्या बिल्डरने तिथं नवीन कोणी वॉचमन नेमला नाही. त्यामुळे ती केबिन तशीच रिकामी पडली आहे.

"मी सुट्टीवरून आल्यावर मला सत्पलच्या गायब होण्याची खबर समजली. मला आश्चर्य वाटलं आणि थोडं वाईटही वाटलं. मी एक दिवस

ड्युटीला थोडं लवकर आलो आणि त्या रिकाम्या इमारतीच्या आवारात एक चक्कर टाकली. पण मला काही विशेष मिळालं नाही. तिथून निघण्याआधी मी त्या पत्र्याच्या केबिनला भेट दिली. तिथं एक टेबल आणि खुर्ची यांशिवाय दुसरं काही नव्हतं. मी टेबलाचा खण उघडून पाहिला. तो रिकामा होता. थोडं आणखी काळजीपूर्वक पाहिल्यावर मला लक्षात आलं, की त्या टेबलाला खाली एक चोरकप्पादेखील आहे. ते एक वापरत नसलेलं, जुन्या पद्धतीचं मोडकळीस आलेलं लाकडी टेबल होतं. अशा टेबलांना चोरकप्पे असतात. मी त्यात हात घालून पाहताच मला तिथं सत्पालची डायरी मिळाली.

“सत्पलाच्या कुटुंबात त्याच्या तरुण मुलाशिवाय कोणी नाही. बायको पूर्वीच वारली आहे. मी विचार केला, की ती डायरी त्याच्या मुलाला देऊन टाकावी. त्याआधी कुतूहल म्हणून मी तिची पानं चाळली. बरीच पानं शायऱ्यांनीच भरलेली होती. पण अधून मधून त्याने त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या आणि विशेष वाटणाऱ्या घटनाही लिहिलेल्या होत्या. त्यातील गेल्या महिन्यातील त्याच्या नोंदी मला फारच विलक्षण वाटल्या.”

अल्फाने डोळे बारीक केले. कोळी पुढे म्हणाला,

“त्याने असं लिहिलंय, की एप्रिलच्या मध्यावर, म्हणजे तो गायब व्हायच्या दोनतीन दिवस आधी त्याला त्या रिकाम्या इमारतीमधील एका

खोलीच्या खिडकीतून कसलातरी मंद प्रकाश दिसला होता. ती खोली अकराव्या मजल्यावर एका बाजूला होती, असं त्याने नमूद केलंय. तो त्या इमारतीवर गेले वर्षभर पहारा देत होता. पण याआधी इमारतीच्या कोणत्याच भागातून कधी तसा प्रकाश त्याला दिसला नव्हता. शिवाय पूर्ण इमारत निर्मनुष्य असल्याने तिथे कोणी रहात असल्याचा प्रश्नच नव्हता.

‘‘इमारतीत कोणीतरी घुसखोरी केली आहे, असं त्याला वाटलं. त्यामुळे तो टॉर्च आणि लाठी घेऊन वरती जायला निघाला. इमारत अपूर्ण आणि वापर नसलेल्या अवस्थेत असल्यामुळे त्याला सगळे अकरा मजले पायऱ्या चढून जावे लागले. ज्या खोलीमधून प्रकाश दिसला होता, ती अकराव्या मजल्यावरच्या कॉरीडॉरमध्ये सगळयात टोकाला होती. सत्पाल पोचला, तेव्हाही तिथून मंद प्रकाशाची तिरीप बाहेर येतच होती. तेवढं सोडता बाकी संपूर्ण कॉरीडॉरमध्ये मिट्ट अंधार होता.

‘‘अशा प्रसंगी दुसरा कोणी असता, तर असं एकट्याने वरती जायला धजला नसता. पण सत्पाल धाडसी होता. तो पुढे गेला आणि त्याने खोलीत डोकावून पाहिलं. तो प्रकाश आतल्या खोलीतून येत होता. तेथील शांततेवरून तरी आत कोणी असल्यासारखं वाटत नव्हतं. सत्पाल काळजीपूर्वक पावले टाकत आतमध्ये शिरला आणि हल्ला-प्रतिहल्ल्याची तयारी करूनच आतल्या खोलीत घुसला.

"आतमध्ये कोणीच नव्हतं. जमिनीवर एक मेणबत्ती संथपणे जळत होती. तिचाच मिणमिणता प्रकाश संपूर्ण खोलीत पसरला होता आणि तोच खालून सत्पालनेही पाहिला होता. बाकी पूर्ण खोली रिकामी होती. तिथं कोणी आल्या-गेल्याची एवढीशीदेखील खूण नव्हती. सत्पालने ती पूर्ण खोली धुंडाळली, त्याच मजल्यावरच्या आजूबाजूच्या दोनतीन खोल्या पाहिल्या. जोरजोरात हाका मारल्या. पण पूर्ण इमारतीत चिटपाखरुदेखील नव्हतं. निदान सत्पालला तर कोणी दिसलं नाही.

"मग प्रश्न हा उद्भवतो, की कॉरीडॉरच्या त्या शेवटच्या खोलीत मेणबत्ती कशी आली? ती ज्वलंत कोणी केली? जर कोणी घुसखोर होताच, तर तो अशी मेणबत्ती पेटवून कुठं गायब झाला? त्यावेळी सत्पालने ती मेणबत्ती सोबत घेतली आणि तो पुन्हा अकरा मजले उतरून खाली आला. खालीदेखील त्याला कुणाचं अस्तित्व जाणवलं नाही. एकूणच ही मोठी चमत्कारिक घटना होती. त्यामुळे त्याने ती डायरीत लिहून ठेवली."

कोळी आमची प्रतिक्रिया पाहण्यासाठी थोडा थांबला. त्याच्या अपेक्षेप्रमाणे आम्ही दोघंही ती हकिकत ऐकून स्तंभित झालो होतो. तो पुढे म्हणाला,

"सत्पलाचं एकूण व्यक्तिमत्त्व पाहता एखादा म्हणेल, की दारूच्या नशेत त्यानं काहीबाही लिहिलं असेल. पण मला ते पटत नाही. तो नशेत

एकवेळ शायरी जरूर लिहेल, पण काहीतरी कल्पोकल्पित हकिकत मुळीच लिहिणार नाही. इतकी संगतवार तर नाहीच नाही. शिवाय त्याने असं एकदा लिहिलं असतं, तर ठीक होतं. पण अगदी पुढच्याच दिवशी त्याने असाच प्रसंग पुन्हा एकदा घडल्याचं लिहून ठेवलं आहे.”

“काय सांगतोस?” अल्फाने आश्चर्याने विचारलं.

“होय.” कोळी उत्तरला, “दुसऱ्या रात्रीसुद्धा सारखीच घटना घडली. कालच्या प्रसंगामुळे सत्पाल त्या खोलीच्या खिडकीकडे बारीक नजर ठेवून होता. रात्री बाराच्या सुमारास त्याला त्याच खिडकीत काहीतरी लखलखल्यासारखं वाटलं. जणूकाही कोणीतरी एखादा मंद दिवा चालू-बंद करावा. पण हा प्रकाश कालच्याइतका स्पष्ट नव्हता, असं सत्पालने लिहिलं आहे. त्याने पुन्हा एकदा अकरा मजले चढून वर जाऊन पाहिलं. त्याहीवेळी त्या खोलीमध्ये किंवा इतरत्र कोणीच नव्हतं. हीच काय ती सत्पलाच्या डायरीतली अखेरची नोंद. त्यानंतर त्याने डायरीत काहीच लिहिलं नाहीये.”

“ती डायरी आत्ता तुझ्याकडे आहे का?” अल्फाने विचारलं.

“हो आहे ना. हा सगळा मजकूर वाचल्यानंतर मला एकूणच या प्रकाराबद्दल शंका आली म्हणून मी ती डायरी सत्पलाच्या मुलाला दिली नाही.” दिपकने त्याच्या बॅगेतून एक जुनाट डायरी काढली. साधी वहीच

होती ती. अल्फाने ती हातात घेतली आणि नजरेखालून घातली. मग काही क्षण थांबून तो म्हणाला,

“आपण या सगळ्या प्रकरणाकडे थोडं तारखांच्या क्रमातून पाहू.” त्याने डायरीची दोन पानं पलटली, “तेरा एप्रिलला सत्पालने इमारतीच्या खिडकीत पहिल्यांदा प्रकाश पाहिला. त्या पुढच्या दिवशी, म्हणजे चौदा एप्रिललासुद्धा तसाच प्रकाश पाहिल्याचं त्याने लिहिलंय. त्यानंतर डायरीत पुढची कोणतीच नोंद नाही. मी मघाशी मोबाईलवर जी बातमी दाखवली, त्यात असं दिलंय की पंधरा एप्रिलच्या रात्री सत्पालला शेवटचं पाहिलं गेलं होतं. त्यानंतर तो गायब झाला. म्हणजे सत्पालने ज्या रात्री खिडकीत दुसऱ्यांदा प्रकाश पाहिला, त्याच्या पुढच्याच रात्री तो गायब झाला. बातमीची तारीख आहे पंचवीस एप्रिल.”

त्याने कोळीला उद्देशून विचारलं,

“तुला डायरी नक्की कधी मिळाली?”

“नक्की तारीख सांगता येणार नाही, पण सत्पाल गायब झाल्यानंतर पाचसहा दिवसांनी असेल.” दिपक म्हणाला.

“म्हणजे साधारण वीस एप्रिलच्या आसपास तुला डायरी मिळाली असं म्हणू. आणि आजची तारीख आहे एकवीस मे.” अल्फा म्हणाला,

“तुला डायरी मिळाल्यानंतर तू ती लगेच वाचली असणार. मग पोलीसांकडे किंवा माझ्याकडे यायला तू एक महिना का लावलास?”

“अं… “ दिपक थोडं अडखळला, “खरंतर ती माझीच चूक आहे. डायरीतील नोंदी वाचल्यानंतर मला पूर्ण खात्री नव्हती, की सत्पालने पूर्ण शुद्धीत असताना हे लिहिलंय की नाही. मी मघाशीच म्हणालो की त्याला ड्यूटीवर असताना दारू प्यायची सवय होती. कदाचित काहीतरी कल्पनारम्य लिहण्याची त्याला लहर आली असावी. शिवाय डायरी वाचल्यानंतर पुढच्या दोनतीन रात्री मी त्या रिकाम्या इमारतीवर नजर ठेवून होतो. मला तिच्या कोणत्याही भागातून असा प्रकाश काही दिसला नाही. आणि तिसरी गोष्ट म्हणजे… मला या पोलीसतपास आणि साक्षीदार वगैरे भानगडींत पडायचं नव्हतं. त्यामुळे मी या सगळ्या प्रकरणाकडे दुर्लक्ष केलं.”

“मग आत्ता असं काय घडलं, ज्यामुळे तू अचानक पोलीसांत संपर्क साधलास?” अल्फाने विचारलं.

“मी पोलीसांत गेलो… कारण… कारण मला काल रात्री त्या इमारतीच्या खिडकीत सत्पालने लिहिलं होतं तसाच एक मिणमिणता प्रकाश दिसला.”

ते ऐकून अल्फा एकदम ताठ झाला. माझेही डोळे नकळत विस्फारले गेले.

“होय.” आपल्या बोलण्याचा अपेक्षित परिणाम झालेला पाहून दिपक पुढे म्हणाला, “मी मजले मोजले. अकराव्या मजल्यावरच्या खोलीतूनच येत होता तो. अगदी तीच खोली जिथं सत्पालनेही प्रकाश पाहिला होता. ते पाहिल्यावर मला असं वाटायला लागलं, की सत्पलाच्या हकिकतीत काहीतरी तथ्य नक्कीच आहे. त्याचा सत्पलाच्या गायब होण्याशी काही संबंध आहे की नाही, ते ठाऊक नाही. पण त्या खोलीत आणि तिथल्या प्रकाशात काहीतरी गूढ दडलंय खास!”

आम्ही विचारमग्न झालो होतो. काही वेळ तिथं शांतता पसरली होती. अखेर अल्फाने विचारलं,

“हा प्रकाश जेव्हा तू पाहिलास, तेव्हा रात्रीचे किती वाजले होते?”

“फार नाही. साडेअकरा वगैरे वाजले असतील.” दिपक उत्तरला.

“आणि किती वेळ तो प्रकाश दिसत होता?”

“साधारणपणे अर्धा तास. बारा वाजण्याच्या सुमारास तो विझला. किंवा कोणीतरी विझवला.”

“खिडकीत कोणाची सावली दिसत होती का? किंवा आतमध्ये काही हालचालीचे निशाण?”

“नाही. मी जिथं बसतो तिथून काही हालचाली दिसणं शक्य नव्हतं.” दिपक उत्तरला.

“तुला खात्री आहे का, की तू तो प्रकाश आधी कधी पाहिला नव्हतास?”

“नाही. काल पहिल्यांदाच मी तो पाहिला.”

अल्फा विचारांत बुडाला. मलाही या सगळ्यामागचा अर्थ लक्षात येत नव्हता. एका रिकाम्या इमारतीच्या अकराव्या मजल्यावर रात्री अपरात्री कोण काय करत होतं? आणि कशासाठी?

काही वेळ कोणी काहीच बोललं नाही. दिपक अल्फा आता काय सांगतो, याची वाट पहात होता. त्याने सांगितलेली हकिकत अल्फाला त्याच्या बुद्धीला आव्हान देणारी वाटली की नाही, याचा तो अंदाज घेत असावा.

“दिपक,” अखेर अल्फा म्हणाला, “तुझं आत्ता काही काम नसेल, तर आम्हाला त्या इमारतीकडे घेऊन चलशील का?”

“म्हणजे तुम्ही यात लक्ष घालणार आहात तर!” दिपकचा चेहरा उजळला.

“अर्थात!” अल्फा जागेवरून उठत म्हणाला, “या प्रकरणाने माझ्यातल्या डिटेक्टिव्हला जणू आव्हान दिलंय. भलेही खिडकीतल्या

त्या प्रकाशाचा सत्पलाच्या गायब होण्याशी संबंध नसेल, किंवा त्या प्रकारामागे काहीतरी क्षुल्लक कारण असेल. पण ते जाणून घेतल्याशिवाय मला आता स्वस्थ बसवणार नाही. प्रभू, तुला पुढचे दोनतीन तास काही काम नसेल तर तूसुद्धा सोबत का येत नाहीस? दिपकसोबत जाऊन त्या निर्मनुष्य इमारतीला भेट देऊन येऊ."

मला अर्थातच काही काम नव्हतं. मी तर अल्फासोबत पेटपूजा करण्याच्या उद्देशाने आलो होतो. पण दिपक कोळीने अल्फाकडे आणलेल्या विलक्षण प्रकरणामुळे मला माझ्या भुकेचा विसर पडला आणि दहाच मिनिटात आम्ही मलबार हिलच्या दिशेने वाटचाल करू लागलो.

***

# दोन

तासाभरात आम्ही मलबार हिलला पोहोचलो. अल्फाच्या नव्या कारमुळे आम्हाला मुंबई हिंडायला सोपी झाली होती (मागच्या काही प्रकरणांत अल्फाने भरघोस कमाई केली होती आणि त्याची पोर्श् ची महागडी कार रस्त्यावर पळताना लोकांच्या वेधून घेत होती). मलबार हिलमध्ये शिरल्यावर आमची कार दिपकने दाखवलेल्या रस्त्यावर धावू लागली. काही वेळातच मुख्य रस्त्याला बगल देत समुद्राच्या बाजूला जाणारा एक छोटा रस्ता आम्हाला दिसला आणि आम्ही तिकडे वळलो. त्या रस्त्याच्या सुरुवातीला उजव्या बाजूस एक छोटं गार्डन होतं. मग डाव्या बाजूला एकदोन शॉपिंग मार्ट्स, स्वीट शॉप आणि डेअरी होती. पुढे गेल्यावर रस्त्याने वळण घेतलं होतं आणि ‘स्कायलाईन’ अपार्टमेंटच्या

इमारती सुरू होत होत्या. ती सोसायटी बरीच मोठी होती आणि मला जेवढं दिसलं, त्यावरून तिथं सहासात विंग्ज् तरी असतील.

सुरुवातीला त्या सोसायटीचं मेन गेट आणि सिक्युरिटी केबिन होती (जिथे दिपक कोळी बसत असला पाहिजे). सोसायटीच्या समोरून जाणारा रस्ता पुढे थेट समुद्राकडे गेला होता आणि त्याच रस्त्यावर, पण समुद्राच्या थोडं आधी ती 'अंडर कंस्ट्रक्शन' असलेली इमारत आम्हाला दिसली. मी चालता चालताच तिचे मजले मोजले. एकवीस मजली इमारत होती ती. सभोवताली पत्र्याचं कुंपण होतं. तिच्या मागेच अथांग पसरलेला समुद्र दिसत होता.

"ती पहा. अकराव्या मजल्यावरच्या कोपऱ्यातील खिडकी, जिच्याबद्दल मी सांगत होतो." दिपकने खिडकीतून बोट करून दाखवले. दुरून तरी ती खिडकी इतर खिडक्यांसारखीच वाटत होती. अल्फाने केवळ तिकडे एक नजर टाकली. पण तो काही बोलला नाही. आम्ही गेटपाशी आलो आणि जवळच गाडी पार्क केली. मग मागे येऊन पत्र्याचं फाटक ढकलून आत शिरलो. समोर थोडा मोकळा भाग होता आणि त्याच्या मागे इमारतीची एंट्रन्स होती. उजव्या बाजूला पत्र्यानेच उभी केलेली एक केबिन होती. ती सत्पलाची बसण्याची जागा असणार. तिकडे न जाता अल्फा सरळ इमारतीकडे चालू लागला आणि आम्हीही त्याच्या मागोमाग निघालो.

"कपाडिया बिल्डर ही इमारत रेसिडेन्शियल अपार्टमेंट म्हणून निश्चितच बांधत नाहीये." अल्फा त्या इमारतीत शिरता शिरता म्हणाला.

"ते कशावरून?" दिपकने विचारलं.

"कोणत्या रेसिडेन्शियल अपार्टमेंटमध्ये असा भव्य एंट्रन्स असतो?" अल्फा म्हणाला, "ही इमारत नक्कीच एक फाईव्ह स्टार हॉटेल बनणार आहे. अर्थात, जर सध्या सुरू असलेल्या वादातून मुक्त झाली तर!"

मलाही ते आत शिरताच लक्षात आलं होतं. पण त्याने आमच्या केसमध्ये काही फरक पडणार नव्हता.

"अकरावा मजला, हं?" आत आल्यानंतर पायऱ्यांकडे पहात अल्फा म्हणाला, "प्रभू, तुझी चांगलीच दमछाक होणार आहे बरं का!"

खरंच होतं ते. अकरा मजले चढून जाणं म्हणजे काही खेळ नव्हता. पायऱ्या चढता चढता माझ्या तोंडाला अक्षरशः फेस आला. ज्यांचा आधार घेता यावा असे कठडेसुद्धा जिन्याला नव्हते. सर्वत्र पायांत माती आणि सिमेंटची धूळ होती. लाकडाचे, खिळयांचे तुकडे इतस्ततः पडले होते. सिमेंटची पोती प्रत्येक मजल्यावर पडलेली होती. एकेक पायरी चढत जेव्हा आम्ही अकराव्या मजल्यावर पोचलो, तेव्हा मी आणि दिपक दोघंही धापा टाकत होतो. अल्फा मात्र लिफ्टमधून आल्यासारखा नॉर्मल होता.

“म्हणून मी सांगत असतो. रोज व्यायाम करत चला.” त्याने टोमणा मारला. आम्ही थोडा श्वास घेतला आणि दिपकने मघाशी दाखवलेल्या खोलीच्या दिशेने चालू लागलो.

तो एक ऐसपैस कॉरीडॉर होता. त्याच्या दोन्ही बाजूंना खोल्या होत्या (ज्यांना दारं अजून लागली नव्हती). खोल्यांमध्ये प्रकाश अडवण्यासाठी काहीच नसल्याने संपूर्ण कॉरीडॉरमध्ये भरपूर उजेड होता. आम्हाला हवी असलेली खोली सर्वात शेवटी, डाव्या बाजूला होती. आम्ही चालत तिच्या दारापाशी पोचलो.

“तुम्ही मिनिटभर इथंच थांबा. या खोलीत येऊन गेलेली शेवटची व्यक्ती जर गुन्हेगार असेल, तर आतमध्ये काही खाणाखुणा मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या पावलांनी त्या पुसून जायला नकोत. मी हाक मारल्यानंतरच आत या.”

आम्ही आज्ञाधारकपणे माना डोलावल्या. अल्फाने आपल्या खिशातून भिंग काढले आणि तो दारातच खाली वाकला. आमच्या पायांखालची जमीन अनफिनिश्ड्, खडबडीत सिमेंटची होती. तिथं पावलांचे ठसे वगैरे मिळणं अशक्यच होतं. तरीही, भिंगाखाली जमीन न्याहाळत पुढे जात असताना अल्फा एकदम स्तब्ध झाल्याचं पाहून मला आश्चर्य वाटलं. पहिल्याच झटक्यात त्याला काहीतरी मिळालं होतं.

“काय दिसतंय तुला?” मी विचारलं. त्याने काही उत्तर दिलं नाही. तो जसा गेला तसाच भिंगातून पहात परत दारापाशी आला. मग दारातून बाहेर कॉरीडॉरमध्ये आला आणि तिथली जमीन निरखू लागला. काही क्षण कॉरीडॉरमध्ये तपास करून तो पुन्हा खोलीत गेला आणि पुन्हा जमीनीकडे भिंगातून पाहू लागला. त्याच्या कपाळावर आठ्यांचं दाट जाळं पसरलं होतं. त्याला काहीतरी मिळालं होतं. आणि त्याच्या चेहऱ्यावरून हे स्पष्ट होत होतं की ते जे काही होतं, ते गोंधळात पाडणारं होतं.

तो एखाद्या अदृश्य पाऊलखुणांचा माग घेत असल्यासारखा भिंगातूनच पहात हळूहळू पुढे गेला. ती खोली तशी फार मोठी नव्हती. वीस बाय दहाची असेल. मुख्य दाराला लागून डावीकडे एक बाथरूम-टॉयलेट स्पेसचं दार होतं आणि त्याच्या पुढेच आणखी एक दार दुसऱ्या खोलीत उघडत होतं. हॉटेलच्या सूटचंच डिझाईन होतं ते. एक हॉल, आणि एक बेडरूम. दोन्ही खोल्या तीन बाजूंनी बंदिस्त होत्या, पण समोरचा भाग मात्र पूर्ण मोकळा ठेवलेला होता. तिथून थेट समोर आम्हाला समुद्रकिनारा आणि त्याच्या बाजूने उभ्या असलेल्या इमारतींची रांग दिसत होती. कदाचित बिल्डरने तिथं काचेची ‘कर्टन वॉल’ लावून आतल्या लोकांना सी-व्ह्यू देण्याचा विचार केला असावा.

अल्फा पुढे जाऊन अखेर त्या ओपन एन्डला थांबला. मग उभा रहात खाली पाहू लागला. आम्ही काहीच न समजून दारातच उभे होतो आणि त्याच्या बोलावण्याची वाट पहात होतो. तो पुन्हा मागे येऊन दुसऱ्या खोलीत गेला. असं करत करत त्याने पूर्ण सूट धुंडाळला आणि अखेर आम्हाला आवाज दिला,

"प्रभू, दिपक, आत आलात तर चालेल."

आम्ही आत गेलो. मी खोलीच्या टोकाला असलेल्या ओपन वॉलकडे गेलो.

"जपून. तिथं कठडा नाहीये. फ्लोअर संपतो तिथून थेट अकरा मजले खालचं दृश्य दिसेल. जरा लांब रहा." अल्फाने इशारा दिला. मी फार पुढे न जाता मागेच उभा राहून समोरचं समुद्रकिनाऱ्याचं आणि मुंबईच्या उंचच उंच इमारतींचं विहंगम दृश्य डोळ्यांत साठवत राहिलो. दिपकसुद्धा तो व्ह्यू पाहून भारावून गेला होता. भविष्यात कधी जर हे हॉटेल बनलंच, तर इथं एखाद्या रात्रीचं बुकींग करायला मला नक्कीच आवडेल – मी विचार केला.

मिनिटभर तिथं थांबून आम्ही दुसऱ्या खोलीत गेलो. तिथंही एक बाजू मोकळी होती आणि लगतच्या बाजूच्या भिंतीत एक खिडकी होती. अल्फा पाठमोरा उभा राहून त्या खिडकीतून  बाहेर पहात होता.

“ते बघ, स्कायलाईन अपार्टमेंट. आणि ती सत्पालची केबिन. सत्पाल आणि दिपक यांनी याच खिडकीत प्रकाश पाहिला होता.” तो माझ्याकडे वळून म्हणाला. मी खिडकीतून पाहताच मलाही लक्षात आलं. हीच ती खिडकी होती. अल्फाने वळून बाहेरच्या खोलीतील जमिनीकडे पाहिलं. त्याला तिथं काय दिसलं होतं, हे मी विचारणार इतक्यात तो म्हणाला,

“चला. मला इथं जे पहायचं होतं ते मी पाहिलेलं आहे. कॉरीडॉरमध्ये थोडा तपास करू आणि खाली जाऊ.”

माझा प्रश्न तसाच राहून गेला. आम्ही त्या सूटच्या बाहेर आलो. कॉरीडॉरमध्ये विशेष असं काहीच नव्हतं. अल्फाने आजूबाजूच्या दोनतीन खोल्यासुद्धा तपासल्या. मग तो पुन्हा कॉरिडॉरमध्ये आला. त्याचं लक्ष एकदम कॉरीडॉरच्या विरुद्ध टोकाला गेलं. तो तिकडे वळला आणि चालत पुढे गेला. मीही त्याच्या मागोमाग गेलो. तिथे आम्हाला आणखी एक जिना दिसला.

“फायर एस्केप!” अल्फा म्हणाला, “मला वाटलंच होतं की इथं आणखी एक जिना असायला हवा. ठिकाय. आता खाली जायला हरकत नाही.”

दिपक मुख्य जिन्यापाशीच थांबला होता. आम्ही तिघंही पायऱ्या उतरू लागलो. मला अल्फाची प्राथमिक निरिक्षणं जाणून घ्यायची होती. पण तो नेहमीप्रमाणेच स्वतःहून काही बोलणार नव्हता. त्यामुळे मीच न राहवून विचारलं,

“अल्फा,” मी म्हणालो, “तुला त्या खोलीतल्या जमिनीवर नक्की काय दिसलंय?”

त्याने चालता चालता मागे वळून पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होतं.

“तुला स्वतःला कोणताही सुगावा मिळो न मिळो, मला काहीतरी मिळालंय, हे तू बरोब्बर ओळखतोस, हो ना?” तो म्हणाला.

“तुझ्या चेहऱ्यावरून आणि हालचालींवरून मला सगळं समजतं.” मी म्हणालो, “काहीतरी खास पाहिलंयस् तू. बरोबर ना?”

“हो.” तो म्हणाला, “त्या खोलीत काहीतरी घसटत गेल्याचे निशाण आहेत, प्रभू. काहीतरी जड वस्तू जमिनीवरून ओढत नेली गेली आहे.”

ते ऐकून माझे डोळे विस्फारले गेले. अल्फा पुढे म्हणाला,

“ते निशाण दारापाशी सुरू होतायत आणि दुसऱ्या बाजूला ओपन वॉलच्या जागी जिथं फ्लोअर संपतो तिथं जाऊन थांबताहेत. आणि विशेष

म्हणजे हे निशाण एकदम ताजे आहेत. अगदी काल रात्री पडले आहेत असं म्हणू शकतो."

"म्हणजे... म्हणजे काल रात्री इथं खरंच कोणीतरी होतं?" दिपक भीतीने गोठल्यासारखा चेहरा करून म्हणाला.

"होय." अल्फा एकेक पायरी उतरत उत्तरला, "अगदी निःसंशय."

"पण... पण तो जो कोणी होता, तो अशी कोणती जड वस्तू ओढत दुसऱ्या टोकाला नेत होता?" मी विचारलं.

"ठाऊक नाही. पण निशाणांवरून एवढंच कळतंय, की त्या वस्तूची रुंदी साधारण एक-सव्वा फूट होती." अल्फा म्हणाला. माझ्या मनात एक अप्रिय विचार आला. माणसाच्या दोन खांद्यांमधलं अंतर सरासरी चौदा ते सोळा इंच असतं. म्हणजेच सव्वा फुटाच्या आसपास. मग काल इथे जमिनीवरून ओढत नेली गेलेली जड वस्तू एखादी ह्युमन बॉडी तर नसेल?

"तू जो विचार करतोयस, तोच विचार मीही करतोय." अल्फा माझ्या चेहऱ्याकडे पहात म्हणाला, "ती जड वस्तू म्हणजे एखादी डेडबॉडी तर नसेल ना?"

'डेडबॉडी' हा शब्द ऐकून दिपकची तर दातखीळच बसली.

"जर ती एखादी डेडबॉडी असेल, तर गुन्हेगाराने तिला टोकापर्यंत ओढत नेऊन नक्की केलं काय? खाली फेकून दिलं?" अल्फा म्हणाला,

“मला हे तर्कसंगत वाटत नाही. कोणी एखादी डेडबॉडी रिकाम्या इमारतीच्या अकराव्या मजल्यावर आणून खाली का फेकेल? शेजारी इतका मोठा समुद्र आहे. जर बॉडीपासून सुटका करून घ्यायचीच असेल तर तिला समुद्रात टाकून देणं जास्त सयुक्तिक नाही का?”

अल्फाचा मुद्दा बरोबर होता.

“मग दुसरं काय?” मी विचारलं.

“जे काही असेल, ते गुन्हेगाराने टोकापर्यंत ओढत नेलंय. याचा अर्थ त्याने ते तिथून खाली टाकलं असणारच आहे. आपण खाली गेल्यावर बघुया. उंचावरून काहीतरी खाली पडल्याच्या खाणाखुणा दिसतायत का ते.”

आम्ही तळमजल्यावर आलो आणि इमारतीच्या बाहेर पडलो. अकराव्या मजल्यावरची ती खोली विरुद्ध बाजूला उघडत होती. आम्ही इमारतीला वळसा मारून मागच्या बाजूला आलो. इथंसुद्धा पत्र्याचे कंपाऊंड होतेच. आम्ही एके जागी येऊन थांबलो. अकराव्या मजल्यावरचा तो सूट आमच्या बरोबर वरती होता. याचा अर्थ घसटत आणलेली जड वस्तू जर खाली टाकली असेल, तर ती इथंच पडायला हवी.

पण तिथं काहीच नव्हतं. खाली जमिनीवर किंवा आजूबाजूला वरून कोणती वस्तू (किंवा डेडबॉडी) पडल्याचे कोणतेच निशाण नव्हते. मी अल्फाकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर कोणतेही भाव नसले, मनात गोंधळ माजला होता, याची मला खात्री होती. अल्फा हातांची घडी घालून काही वेळ तिथेच उभा राहिला. आम्हीही तो काय करतो, याची वाट पहात उभे राहिलो.

“चला, पुढच्या बाजूला जाऊ.” अखेर तो म्हणाला. आम्ही पुन्हा इमारतीच्या एंट्रन्सपाशी आलो.

“आता आपल्याला एक मोठं काम करायचं आहे.” अल्फा म्हणाला, “आपण आता पूर्ण इमारत आणि तिच्या सर्व परिसराचा कानाकोपरा तपासून पाहणार आहोत.”

“पूर्ण इमारत? ते का म्हणे?” दिपकने भांबावून विचारलं. त्यावर अल्फा उत्तरला,

“अकराव्या मजल्यावरील आपल्या खोलीत काहीतरी गूढ घडतंय हे तर निश्चित आहे. पण ते नक्की काय आणि कशासाठी, हे माझ्या अजून लक्षात येत नाहीये. त्या खोलीत रात्री जो कोणी येतो, तो समुद्रातून येतो का? की रस्त्यावरून येतो? इमारतीच्या आत जाताना तो कधी कुणाला दिसला नाही का? तो फक्त अकराव्या मजल्यावरची ती खोलीच वापरतो

की तिथं उजेड पेटता ठेवून इमारतीच्या इतर भागातही फिरतो? आपल्याला हे जाणून घ्यायला हवंय. पूर्ण इमारतीची कसून तपासणी केल्याशिवाय या प्रश्नांची उत्तरं मिळणार नाहीयेत. कदाचित काही सुगावे मिळतील, जे आपल्याला आणखी माहिती पुरवू शकतील."

त्याने आमच्याकडे पाहिलं,

"तुमच्यावर माझ्यासोबत येण्याचं काही बंधन नाही. कारण संपूर्ण एकवीस मजले आणि प्रत्येक मजल्यावरच्या पंधरा खोल्या आणि शिवाय खालचा संपूर्ण परिसर इतक्या सगळ्या भागाचा तपास करायला खूप वेळ आणि कष्ट लागतील. तुम्ही खाली वाट पहात थांबू शकता किंवा परत जाऊदेखील शकता."

एवढ्या मोठ्या इमारतीची तपासणी म्हणजे खरंच एक मोठ्ठं काम होतं. पण अल्फाला एकट्याला सोडून खाली बसणं मलाही पटत नव्हतं (जरी त्याला त्याचं काही वाटत नसलं तरीही). आणि शिवाय या सगळ्या प्रकाराबद्दल मनात कुतूहल तर होतंच. त्यामुळे मी अल्फासोबत जायला तयार झालो. दिपकदेखील चांगलाच हौशी माणूस होता. तोही आमच्यासोबत यायला तयार झाला.

लगेचच आमची शोधमोहीम सुरू झाली. इमारतीच्या बेसमेंटपासून ते टेरेसपर्यंत एकन् एक खोली आम्ही पायांखालून घातली. दोन्ही जिने

तपासले. पुन्हा खाली येऊन इमारतीचा संपूर्ण आवार तपासला. सत्पालच्या केबिनसुद्धा भेट दिली. या संपूर्ण शोधात मला तरी काही लक्ष वेधून घेतील असे पुरावे दिसले नाहीत. चार तासांनी जेव्हा आम्ही पुन्हा मुख्य गेटपाशी येऊन थांबलो, तेव्हा सूर्य डोक्यावर तळपत होता आणि आमचं अंग घामानं निथळत होतं.

"आता आपलं इथलं सगळं पाहून झालेलं आहे." अल्फा म्हणाला, "आश्चर्याची गोष्ट म्हणजे गुन्हेगारानं काहीही खाणाखुणा मागं सोडल्या नाहीयेत. कदाचित त्याचा इमारतीत इतरत्र कुठे वावर झालेला नसावा. त्यामुळे लगेचच हालचाली करण्यासारखं आपल्याकडे काहीच नाहीये."

थोडा श्वास घेऊन तो म्हणाला,

"आपण एक काम करुया. दिपक, तू आज 'स्कायलाईन'वर नाईट ड्युटीला आहेस ना? गुड. आम्ही आज रात्री इथं तुझ्या सोबतीला येतो. आपण तुझ्या केबिनपाशीच वाट पाहू आणि इमारतीच्या खोलीत प्रकाश दिसतो का ते पाहू. जर दिसला, तर थेट ट्रॅप लावून आत जो कोणी असेल त्याला रंगेहाथ पकडण्याचा प्रयत्न करू. फार खेळत बसण्याची गरज नाही. एकदा का तो मनुष्य हाती लागला, की सगळंकाही सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ होईल. सत्पलच्या गायब होण्याचा या सगळ्याशी काही संबंध आहे की नाही, तेही समजेल."

"पण अल्फा, त्या खोलीत आज रात्री दिवा लागेलच कशावरून? जर त्या मनुष्याला कळालं की आपण इथं तपास करायला आलो होतो, तर तो सावध होईल आणि दिवा न लावताच परत जाईल."

"तुझं म्हणणं बरोबर आहे. पण तरीही मला असं वाटतंय, की आज तो मनुष्य येईल आणि दिवासुद्धा लावेल. लेट्स होप फॉर द बेस्ट! दिपक, तू आता घरी जाऊन चांगली विश्रांती घे बरं का. रात्रीच्या साहासात मी तुलाही सोबत गृहीत धरतोय. चल प्रभू!"

आम्ही तिथून निघालो.

*

उन्हाळा आणि मुंबई हे कॉम्बिनेशन किती भयंकर असतं, हे मुंबईत राहणाऱ्यांनाच ठाऊक! अक्षरशः काही न करता नुसतं बसून राहिलं तरी अंगाला घाम फुटतो. इथं आम्ही तर आठवड्याभराचा व्यायाम होईल एवढी धावपळ केली होती. ऊन आणि घाम यामुळे माझा जीव हैराण झाला होता. जेवण करून, मलबार हिल ते पवई हा लांबलचक प्रवास करून अल्फाच्या फ्लॅटवर येऊन जेव्हा आम्ही विसावलो, तेव्हा कुठं मला जरा बरं वाटलं. चहाची वेळ झालीच होती. अल्फाने मस्तपैकी दोन कप

चहा बनवला (आम्ही दोघंही चहाचे भोक्ते होतो. बाहेर अगदी शिजण्याएवढा उन्हाळा असला तरीही आमचं चहाशिवाय भागायचं नाही!). अल्फा चहाचा कप घेऊन सोफ्यावर बसला आणि काही वेळ शांततेत आम्ही चहाचे घोट घेत राहिलो.

“तुला काय वाटतं प्रभू? काय असावं त्या खिडकीतल्या प्रकाशामागचं रहस्य?” अल्फाने विचारलं. त्याने स्वतःहूनच विषयाला तोंड फोडल्यामुळे मला उत्साह आला.

“काही समजत नाही बुवा. रात्री अपरात्री एवढ्या वरती जाऊन दिवा लावण्याचा उद्योग कोण का करेल?”

“तरीही. जर याचं पॉसिबल एक्सप्लेनेशन द्यायचं झालं तर काय देशील?” अल्फाला माझ्याकडून उत्तर हवं होतं. मी थोडं डोकं खाजवलं.

“पहिल्यांदा आपण फॅक्ट्स् एका बाजूला करू.” मी त्याच्याच स्टाईलमध्ये सुरूवात केली (अल्फा गालातल्या गालात हसला), “गेल्या महिन्याच्या साधारण मध्यावर सत्पाल सिंगला त्या इमारतीच्या अकराव्या मजल्यावरच्या शेवटच्या खोलीत अंधुकसा प्रकाश दिसला. त्याने दोनदा वरती जाऊन तपासलं, पण त्या खोलीत आणि इमारतीच्या आवारातदेखील त्याला कोणी दिसलं नाही. हा प्रकार सुरू झाल्याच्या तिसऱ्याच दिवशी सत्पाल गायब झाला. त्यानंतर मात्र बरेच दिवस तो

प्रकाश कुणाला दिसला नाही. पण काल ‘स्कायलाईन'चा नाईट वॉचमन दिपक कोळी याला तो पुन्हा दिसला.

“आपण तिथं जाऊन अकराव्या मजल्यावरील त्या खोलीची आणि इतर इमारतीचीही तपासणी केली. तुझ्या निरिक्षणांच्या अनुसार खोलीत दरवाजापासून ते फ्लोअरच्या दुसऱ्या टोकापर्यंत एक ते सव्वा फूट रुंदीची काहीतरी जड वस्तू ओढत नेल्याचे निशाण आहेत. पण त्याच्या बरोबर खाली इमारतीच्या तळाशी वरून काही पडल्याचे निशाण नाहीत. शिवाय पूर्ण इमारतीत इतर कोणत्याही संशयास्पद खाणाखुणा नाहीत.”

अल्फाने प्रोत्साहनपर स्मित केलं.

“व्हेरी वेल. छान सारांश दिलास. गो अहेड.” तो म्हणाला.

“तर मुख्य प्रश्न असा आहे, की कोणीतरी रात्री उशिरा वरती जाऊन त्या खोलीत दिवा लावून काय करतंय? याबद्दल माझ्या मनात आलेल्या एकेक शक्यता मी सांगतो. त्यावर तुला काय वाटतं ते सांग.” मी म्हणालो, “मला पहिल्यांदा वाटलं, की त्या इमारतीत काहीतरी अवैध धंदा सुरु असेल. वर्षभर वापरात नसलेली इमारत म्हणजे अशा धंद्यांना मिळालेला आयता अड्डाच! शिवाय समुद्रही लागूनच आहे. तस्करांची एखादी टोळी या इमारतीचा समुद्रावरून आणलेला माल तात्पुरता ठेवण्यासाठी किंवा तशाच एखाद्या कामासाठी करत असावेत.

“पण असं घडण्यात बऱ्याच अडचणी आहेत. एकतर तस्करीचं सामान कोणी अकराव्या मजल्यावर कसं घेऊन जाईल? शिवाय हे एकट्यादुकट्याचं काम नाही. कमीतकमी चारपाच लोकांची तरी इमारतीत ये जा व्हायला पाहिजे ना! आणि एवढी हालचाल सत्पालच्या नजरेतून सुटणं अवघड आहे. दुसरी शक्यता अशी आहे, की तिथं कसलेतरी गुप्त प्रयोग होत असतील का? एखादं नवं ड्रग, किंवा स्फोटक, किंवा बेकायदेशीर रसायन, औषध… काहीही. तिथं एखादी ह्युमन बॉडी आणली जात असेल आणि त्यावर कसल्यातरी गोष्टीचं टेस्टींग होत असेल. खोलीतल्या जमिनीवर घसटत आणल्याचे निशाण त्या बॉडीमुळेच बनले असतील आणि काम झाल्यावर ती बॉडी खाली फेकून दिली जात असेल.

“पण यातही बरेच प्रश्न उभे राहतात. कोणताही प्रयोग करायचा म्हटला, तर त्यासाठी काहीतरी किमान साहित्य लागेलच ना. मग जेव्हा सत्पाल दोनदा त्या खोलीत गेला, तेव्हा ती रिकामी कशी होती? इतक्या झटपट प्रयोगाचं सगळं सामान गुंडाळून, त्या बॉडीची विल्हेवाट लावून गुन्हेगार गायब कसा झाला? तेही काहीही निशाण मागे न सोडता?”

अल्फाने काही क्षण माझ्याकडे पाहिलं आणि तो म्हणाला,

“सुंदर! फार चांगले तर्क मांडलेस.”

नेहमीप्रमाणे त्यानं माझा मुद्दा हाणून कसा पाडला नाही, याचं मला आश्चर्य वाटलं. तो पुढे म्हणाला,

“तू बोलून दाखवलेली दुसरी शक्यता खरंच विचारात घेण्यासारखी आहे. कसलातरी गुप्त प्रयोग त्या खोलीत होत असलेला असणं नक्कीच शक्य आहे. गुन्हेगार त्या खोलीत – एक मिनिट, आपण आत्ताच त्याला गुन्हेगार म्हणायला नको. कारण तिथं खरंच काही गुन्हा घडतोय का, हे आपल्याला अजून माहिती नाहीये. त्याला आपण घुसखोर असं संबोधू. तर, हा घुसखोर तिथं कसलातरी बेकायदेशीर प्रयोग करत असेल आणि सत्पालची चाहूल लागताच त्याचं सामान गुंडाळून तिथून सटकत असेल. तू म्हणालास, की तो इतक्या कमी वेळात सगळं सामान गोळा करून तिथून निघणं कसं शक्य आहे? माझ्या मते तेही शक्य आहे. कारण काही रासायनिक चाचण्यांना निव्वळ दोन रसायनांच्या बाटल्यांइतकं कमी सामान लागू शकतं. कदाचित त्याच्या प्रयोगाचं सामान फारच थोडं असेल आणि त्यामुळे त्याला पटकन् सगळं गुंडाळून तिथून पळ काढणं सहज शक्य असेल.

“पण तरीही बॉडी किंवा जी काही जड वस्तू आहे, तिचा प्रश्न अनुत्तरितच राहतो. दुसरा महत्त्वाचा आणि अनाकलनीय मुद्दा असा आहे, की घुसखोराने अशी खोली का निवडावी जिचा उजेड खाली बसलेल्या सत्पालच्या नजरेस पडेल? त्या इमारतीत कितीतरी अशा खोल्या आहेत

ज्या सत्पलाच्या केबिनच्या विरुद्ध दिशेला आहेत. जर घुसखोराच्या प्रयोगाला प्रकाशाची गरज असेल तर त्याने त्या बाजूच्या खोल्यांची निवड का केली नाही? सत्पालला प्रकाश दिसेल अशी खोली का निवडली?"

मी थोडं डोकं लढवलं.

"तू म्हणतोयस त्यावरून आणखी एक शक्यता निर्माण होते." मी म्हणालो, "जर सत्पालला खिडकीतून उजेड दिसावा, असा घुसखोराचाच हेतू असेल तर?"

"ते का बरं?" त्याने विचारलं, "सत्पालने खिडकीत प्रकाश पाहिल्यामुळे घुसखोराचा काय फायदा होणार?"

"होऊ शकतो." मी म्हणालो, "मी मघाशी तस्करीच्या सामानाची शक्यता बोलून दाखवली. कुणालातरी समुद्रावरून तस्करीचा माल उतरवायचा आहे आणि तो त्या इमारतीच्या तळमजल्यावर किंवा आवारात कुठंतरी लपवून ठेवायचा आहे. कारण ती इमारत दुर्लक्षित आहे आणि तिथं तुझा माल तात्पुरता सुरक्षित राहिल हे तुला माहीत आहे. पण अडचण अशी आहे, की त्या इमारतीच्या गेटवर एक सरदारजी रात्री पहारा देतोय आणि त्याची नजर चुकवून तुला इमारतीत शिरणं शक्य नाही. मग तू काय करशील?"

अल्फाच्या चेहऱ्यावर स्मित पसरलं.

"मी त्या सरदारजीचं लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करेन." तो म्हणाला.

"बरोबर!" मी म्हणालो, "हे अकराव्या मजल्यावर दिवा लावणं सत्पालचं लक्ष विचलित करण्याचाच एक प्रकार असू शकतो ना! म्हणजे सत्पाल दिवा बघून अकराव्या मजल्यावर जाणार हे घुसखोरांना ठाऊक होतं. तो वरती गेला की पटकन् खालच्या खाली तस्करीच्या मालाची ने आण करायची. झालं!  दोन दिवस सत्पाल फसून वरती गेला असेल, पण तिसऱ्या दिवशी त्याला ही भानगड लक्षात आली आणि त्याने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असेल. तेव्हा त्या लोकांनी त्याला गायब करून टाकलं असेल."

माझं बोलून होता होता अल्फाच्या चेहऱ्यावर कौतुक पसरलेलं मला दिसलं.

"शाब्बास पठ्ठ्या! शाब्बास!" तो म्हणाला, "तुझी तर्कशास्त्रातील प्रगती पाहून मला माझाच अभिमान वाटायला लागला आहे. माझ्यासोबत दीर्घकाळ राहून एखाद्याची निरिक्षण-निष्कर्ष क्षमता कशी वृद्धिंगत होऊ शकते, याचं तू एक उत्तम उदाहरण आहेस."

माझी स्तुती करता करता अल्फाने स्वतःचीही पाठ थोपटून घेतल्याचं लक्षात येताच मी त्याच्याकडे एक तिरकस कोरडा कटाक्ष टाकला. पण त्याकडे दुर्लक्ष करून अल्फा पुढे म्हणाला,

"मला वाटतं की तू या प्रकरणातल्या बऱ्याचशा शक्यता मांडण्यात यशस्वी झाला आहेस. खासकरून शेवटची शक्यता जास्त तर्कसंगत होती. मीही सुरुवातीला हाच विचार करत होतो, की अकराव्या मजल्यावरच्या खिडकीतला तो प्रकाश म्हणजे निव्वळ सत्पालचं लक्ष विचलित करण्यासाठी लावलेला ट्रॅप आहे. पण दुर्दैवानं या शक्यतेत एक मोठा दोष आहे."

मी भुवया आक्रसल्या.

"तो कोणता?" मी विचारलं.

"जर सत्पालला त्याच्या केबिनपासून दूर नेणं इतकाच त्या प्रकाशामागचा हेतू असेल, तर मग एका महिन्यानंतर काल रात्री दिपक कोळीला तो प्रकाश का दिसला?" अल्फाने विचारलं. मला खटकन् माझ्या डोक्याचा बल्ब फुटल्यासारखं झालं. अर्थात् माझ्याकडे त्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं. अल्फा पुढे म्हणाला, "सत्पालचं तिथं असणं हीच काय ती घुसखोरांसाठी मुख्य अडचण होती. जर त्यांनीच सत्पालला गायब केलं

असेल, तर पुन्हा पुढच्या वेळी खिडकीत दिवा लावण्याचं त्यांना काहीच कारण नाही. पटतंय का माझं म्हणणं?"

"मग नक्की भानगड काय आहे अल्फा?" मी अखेर हार मानली, "सगळ्याच शक्यतांमध्ये कोणता ना कोणता प्रश्न अनुत्तरित राहतोच आहे. असं झालं तर हळूहळू आपले सर्वच मार्ग बंद होतील आणि एकही शक्यता हातात उरणार नाही. "

"अं हं. आणखी एक शक्यता आहे जिचा तू अजून विचार केला नाहीस." अल्फा म्हणाला.

ते ऐकून मी बुचकळ्यात पडलो.

"अजून कोणत्या गोष्टीसाठी रात्री अपरात्री रिकाम्या इमारतीत दिवा लागू शकतो?" मी विचारलं. अल्फाने थोडा वेळ माझ्याकडे पाहिलं. मग माझ्या प्रश्नाला डावलून तो म्हणाला,

"तुला माहिती आहे का, तू जसा उंचीवर जाशील तसं तुला किती दूरचं दिसू शकतं?"

मी कपाळावर आठ्या पाडल्या.

"नाही."

"त्यासाठी एक गणिती सूत्र आहे." अल्फा म्हणाला, "समज, जर तू पन्नास फूट उंच गेलास, तर तुला जवळपास चौदा किलोमीटर दूरपर्यंतचा

प्रदेश दिसू शकतो. अर्थात, मध्ये काही अडथळे नसतील तर. आपला अकरावा मजला जमिनीपासून जवळजवळ सव्वाशे फूट उंच आहे. थोडी आकडेमोड केली तर तुझ्या लक्षात येईल, की त्या उंचीवरून साधारण बावीस किलोमीटर दूरपर्यंतचा परिसर दिसू शकतो."

"बरं, मग?" अल्फाच्या या ज्ञानाचा आमच्या केसशी काय संबंध आहे, हे मला अजूनही लक्षात येत नव्हतं.

"विचार कर." अल्फा म्हणाला, "जर तू दूरवर समुद्रात आहेस. तुझ्याजवळ काहीतरी तस्करीचं सामान आहे जे तुला किनाऱ्यावर आणायचंय. आणि त्यासाठी तुला किनाऱ्यावरून सगळंकाही आलबेल असल्याचा सिग्नल हवाय – कोणतंही वायरलेस उपकरण न वापरता. तू काय करशील?"

अल्फाला काय सांगायचंय, हे आता माझ्या लक्षात आलं.

"मी एखादी दृश्य स्वरूपातली खूण वापरेन... जसं की... "

"जसं की उंचीवर लावलेला दिवा!" अल्फाने माझं वाक्य पूर्ण केलं.

"म्हणजे तो खिडकीतला प्रकाश हा दूरवर उभारलेल्या एखाद्या व्यक्तीसाठी उद्देशून एक सिग्नल असू शकतो!" मी उत्तेजित होऊन म्हणालो.

"अगदी बरोबर!" अल्फा म्हणाला, "जर ही शक्यता गृहीत धरली, तर आपले बरेच प्रश्न सुटतात. जसं की, सत्पाल वरती गेल्यानंतर त्याला ती खोली रिकामी का आढळली? कारण खोलीतील व्यक्ती दिवा लावून दुसऱ्या जिन्याने कधीच पसार झाली होती. तिथं काही सामान असण्याचंही काहीच कारण नाही. कारण तिथं ना तुम्ही चोरीचा माल लपवताय, ना कसले प्रयोग करताय. फक्त वरती जाऊन दिवा लावणं एवढंच घुसखोराचं काम आहे. शिवाय तो दिवा सत्पालला दिसेल अशाच खोलीत का लावला गेला? कारण दूरवर ज्या व्यक्तीला इशारा द्यायचा आहे, तिला याच खोलीचा उजेड व्यवस्थित दिसत असेल. आता ती खोली सत्पाललाही उजेड दिसेल अशा बाजूला निघाली, हे घुसखोराचं दुर्दैव."

"आणि खोलीतल्या जमिनीवरचे? डेडबॉडी ओढत नेल्याचं भासवणारे ते निशाण?" मी विचारलं.

"त्याबद्दल माझ्या मनात अजूनही संदिग्धता आहे. पण मला वाटतं की तिसऱ्या दिवशी जेव्हा सत्पाल वरती गेला, तेव्हा तो घुसखोराला पकडण्यात यशस्वी झाला असावा. त्यांच्यात काहीतरी मारामारी होऊन शेवटी घुसखोरानं सत्पालला चीत केलं. त्याला वरून खाली ढकलून देण्यासाठी घुसखोरानं खोलीच्या टोकापर्यंत ओढत आणलं. पण समोर समुद्र बघून त्याने विचार बदलला असावा. सत्पालची बॉडी थोडी

काळजी घेऊन समुद्रात टाकली, तर काय झालं हे कुणाच्या लक्षात येणार नाही आणि त्याला त्याचं काम शांततेत करता येईल असा त्याने विचार केला असावा. त्यामुळे घुसखोरानं सत्पालची बॉडी उचलली आणि खाली आणून समुद्रात टाकली.''

माझ्या अंगावर शहारे आले.

''माय गॉड! बिचारा सत्पाल..'' मी हळहळत म्हणालो.

''अर्थात, असंच घडलेलं असायला पाहिजे असं काही नाही. पण सत्याच्या सर्वाधिक जवळ जाणारी शक्यता सध्या तरी हिच आहे असं मला वाटतं.'' अल्फा म्हणाला.

''थोडक्यात घुसखोर हा दूरवर समुद्रात तस्करी करणाऱ्या टोळीचा साथीदार आहे तर!'' मी म्हणालो.

''चक् चक् चक्!'' अल्फाने नकारात्मक हावभाव केले, ''ते तर मी केवळ उदाहरणादाखल सांगितलं. ज्या व्यक्तीला दिवा लावून इशारा द्यायचा आहे, ती समुद्राऐवजी दुसरीकडे कुठेतरी असू शकते. कदाचित जिथून तो दिवा दिसतो अशा दूरच्या एखाद्या गोडाऊनमध्ये, एखाद्या रेल्वे स्टेशनवर किंवा अगदी समोरच्या स्कायलाईन अपार्टमेंटमध्येसुद्धा!''

ते ऐकून मी भुवया उंचावल्या.

“थोडक्यात, त्या खिडकीतील प्रकाशाच्या इशाऱ्यावर जर गुन्हा घडत असेल, तर तो कुठंही घडू शकतो?” मी विचारलं.

“एक्झॅक्टली!” अल्फा म्हणाला, “त्यामुळे आपल्याला फक्त ती रिकामी इमारत किंवा आसपासच्या परिसरापर्यंत मर्यादित राहून चालणार नाही. मी माझ्या सूत्रांना ती इमारत जिथून दिसते अशा आसपासच्या सगळ्या एरियावर आज रात्री लक्ष ठेवायला सांगितलं आहे. इकडे आपण त्या रिकाम्या इमारतीवर धाड घालूच. दोन्ही बाजूंनी काय हाती लागतं ते पाहू.”

मी मान डोलावली. आम्ही दोघंही या चमत्कारिक प्रकरणावर विचार करण्यात हरवून गेलो.

***

# तीन

राત्र झाली. मी कॉलेजमध्ये जाऊन थोडी सामानाची आवराआवर केली आणि पुन्हा अल्फाच्या फ्लॅटवर आलो. अल्फा माझी वाटच पहात होता. लवकर जेवण करून आम्ही नऊच्या सुमारास घरातून बाहेर पडलो. अल्फाच्या सांगण्याप्रमाणे मी साधे, चपळ हालचाल करायला सोपे पडतील असे कपडे घालून आलो होतो. त्यानंही सुळसुळीत कपडे घातले होते. पाठीवर एक बॅग होती. निघताना त्यानं सोबत रिव्हॉल्वर घेतल्याचं पाहून मला धक्काच बसला.

“तू रिव्हॉल्वर कधीपासून वापरायला लागलास?” मी विचारलं.

“आजकाल फार धोक्याची कामं स्विकारायला लागलोय मी. फक्त बुद्धी कधीपर्यंत बचाव करणार! त्यामुळे रिव्हॉल्वरचं लायसन्स मिळवलं.” अल्फा हसत उत्तरला.

“गुड.” मी म्हणालो. एका अर्थी बरंच होतं ते. अल्फावर माझा विश्वास असला तरी आम्ही कितीतरी असे प्रसंग पाहिले होते जिथं आम्ही संकटांना अगदी निःशस्त्र सामोरे गेलो होतो आणि केवळ नशिबाच्या जोरावर वाचलो होतो. आता कमीतकमी नशिबावर तरी अवलंबून रहावं लागणार नव्हतं.

आम्ही मलबार हिलला पोचेपर्यंत रात्रीचे दहा वाजले. अल्फाने कार माझ्या हातांत दिली आणि स्वतः पूर्ण रस्त्यात फोनवर सतत कुणाला कुणाला सूचना देत राहिला. स्कायलाईन अपार्टमेंटमध्ये दिपक कोळीने आमच्या पार्किंगची व्यवस्था केली होती. गाडी लावून आम्ही त्याच्या केबिनमध्ये जाऊन बसलो. जवळच समुद्र असल्यामुळे किनाऱ्यावर लाटांच्या आदळण्याचा आवाज येत होता. खारं वारं सळसळत इमारतींच्या मधून जात होतं. स्कायलाईन अपार्टमेंट अजून जागं होतं आणि लोकांची गेटमधून जा-ये सुरू होती.

“आपल्याला थोडी वाट बघावी लागेल. तो प्रकाश रात्री साडेअकरा-बाराच्या नंतर दिसायला लागतो.” दिपक म्हणाला.

“बाय ऑल मीन्स! आपली सगळी तयारी झालीच आहे. फक्त घुसखोराने टांग नाही दिली पाहिजे!” अल्फा म्हणाला.

दिपकने त्याची चहाची किटली काढली आणि छोट्या कपांमध्ये चहा भरून आम्हाला दिला. आम्ही शांतपणे चहाचे घुटके घेत राहिलो. थोडी रहदारी नाही असं पाहून दिपकच्या सोबतचा वॉचमन आमच्याकडे चालत आला.

“हेच का ते पाव्हणे?” त्याने आमच्याकडे खूण करत दिपकला विचारलं.

“होय.” दिपक म्हणाला.

“आजच बेत आहे काय मग? तिकडं जायचा?” वॉचमन मित्रानं त्या इमारतीकडे इशारा करत विचारलं. कदाचित दिपकनं त्याला आमचा प्लॅन सांगितला होता. पण अल्फाने काही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. त्याला दिपकने प्लॅन इतर कुणाला बोलण्याशी काही प्रॉब्लेम नसावा.

“होय. आजच जायचं आहे.” दिपक म्हणाला.

“साहेब,” तो वॉचमन आम्हाला उद्देशून म्हणाला, “वाईट वाटून घेणार नसाल तर एक विचारू का?”

“विचार ना.” अल्फा म्हणाला.

“तुम्ही विनाकारण धोका पत्करताय असं नाही का वाटत तुम्हाला?”

“का रे बाबा? कसला धोका?” अल्फाने विचारलं.

“नाही, म्हणजे.. “ तो म्हणाला, “रात्री अपरात्री अशा सुनसान इमारतीत दिवे जळणं… काही भलतंच असायचं त्याच्या मागं.”

“भलतं म्हणजे?” मला त्याचा मुद्दा कळाला नाही.

“म्हणजे, भूतपिशाच्च वगैरे.” वॉचमन म्हणाला, “त्या जागी फार पूर्वी स्मशानभूमी होती असं मी ऐकलंय. ती जागा अशुभ आहे. म्हणून तर तिथं बांधायला काढलेली इमारतही अर्धवट राहिली. मला तर वाटतं तुम्ही तिथं जाऊ नका. कशाला विषाची परिक्षा घेताय साहेब!”

“अहो विषाची परिक्षा घेणं हाच तर माझा पोटापाण्याचा धंदा आहे!” अल्फा हसून म्हणाला, “आत्तापर्यंत कित्येक भानगडींत गरज नसताना नाक खुपसून मी गुन्हेगारांना पकडून दिलं आहे आणि माझ्या अशीलांना संकटातून सोडवलं आहे. तिथं खिडकीत दिवा लावायला येणारं भूत जरी असलं, तरी त्याला शोधून बाटलीत बंद करेन तेव्हाच शांत बसेन.”

आम्ही हसलो. त्यानंतर तो वॉचमन पुढे काही बोलला नाही. पण त्याच्या त्या सूचनेमुळे माझं डोकं वेगळ्याच दिशेनं तर्क लढवायला लागलं. रिकाम्या, अंधाऱ्या इमारतीत रात्री अपरात्री घुसणं आता जीवघेणं साहस तर ठरणार नाही ना, असं वाटू लागलं. दिपकच्या चेहऱ्यावरून तर

स्पष्टच दिसत होतं, की भूताप्रेताचा विषय निघताच त्याच्या मनानं अर्धी कच खाल्ली होती. फक्त आम्हाला सोबत येण्याचं वचन दिलेलं असल्यामुळे तो मूग गिळून गप्प बसला.

आम्ही बसलो होतो तिथून थेट त्या रिकाम्या इमारतीचा वरचा भाग दिसत होता. आत्ता ती इमारत म्हणजे केवळ अंधाराच्या पटलावर कोरलेली एक स्थिर आकृती दिसत होती. कुठंच काही हालचाल नाही की कसली चाहूल नाही. माझं आणि अल्फाचं लक्ष त्या इमारतीवरच खिळलेलं होतं. दिपकही त्याचं काम करता करता मधून मधून तिकडे पहात होता. अकरा वाजले, बारा वाजले. स्कायलाईनच्या गेटवरची वर्दळ कमी झाली. एकेक करून इमारतीतले दिवे बंद होऊ लागले. पण दूरची ती रिकामी इमारत आधीसारखी काळोखातच राहिली.

“इतका वेळ नाही लागायला पाहिजे.” घड्याळानं जेव्हा एक वाजल्याचं दाखवलं, तेव्हा दिपक म्हणाला, “सत्पालनं डायरीतही बारा साडेबाराची वेळ लिहून ठेवली आहे.”

“त्याला आपण सकाळी तिथं येऊन गेल्याची चाहूल तर लागली नसेल ना?” मी मघापासून माझ्या मनात घोळणारी भीती बोलून दाखवली, “कोणीतरी अकराव्या मजल्यावरच्या त्या खोलीला भेट दिली, हे कळताच तो दिवा न लावताच निघून गेला असेल.”

“मला तसं नाही वाटत.” अल्फा म्हणाला, “तिथली जमिन टणक असल्यामुळे पावलांच्या खुणा निर्माण व्हायचा प्रश्नच नाही. शिवाय निघायच्या आधी आपण तिथं कोणतेच निशाण मागं सोडले नाहीत, याची मी खात्री करून घेतली होती. आणि अंधारात इतकं बारकाईने खाणाखुणा पाहणं शक्य नाही.”

“मग तो आज इतका वेळ का लावतो आहे?” मी विचारलं.

त्यावर अल्फा काही बोलला नाही. तो फक्त त्या इमारतीकडे डोळे लावून राहिला. आणखी काही वेळ गेला. आम्ही जवळजवळ आशा सोडली होती, तितक्यात आम्हाला त्या इमारतीत काहीतरी लुकलुकल्यासारखं वाटलं. मला प्रथम वाटलं की मला भासच झालाय. मी लक्षपूर्वक पाहिलं तेव्हा माझ्या लक्षात आलं, की इमारतीत एका मजल्यावरच्या खिडकीत अंधुकसा प्रकाश दिसायला लागला होता. आम्ही झटकन् एकमेकांकडे पाहिलं.

“तोच आहे! हाच तो प्रकाश आहे!” दिपक ओरडला. अल्फा खुर्चीवरून उठलाच. मीही त्याच्या मागोमाग उठलो. अल्फाने त्याच्या बॅगेतून एक दुर्बिण काढली आणि डोळ्यांवर ठेवून लेन्स ॲडजस्ट केल्या. निशाणा त्या अर्धप्रकाशित खिडकीवर लावला. पाचेक मिनिटं तो त्या खिडकीवर लक्ष ठेवून होता. पण जेव्हा त्यानं डोळ्यांवरून दुर्बिण काढली, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर फारसा उत्साह दिसला नाही. त्याच्याकडून

दुर्बिण घेऊन मी खिडकीकडे पाहिलं. खिडकीमागून मिणमिणता प्रकाश स्पष्ट दिसत होता. पण आतमध्ये काहीच हालचाल दिसत नव्हती. जणूकाही दिवा लावून घुसखोर पसार झाला होता.

अल्फाने दुर्बिण पुन्हा बॅगमध्ये ठेवली.

“चला मित्रहो! साहसाची वेळ जवळ आली आहे.”. तो म्हणाला. आम्ही ‘स्कायलाईन’ च्या गेटमधून बाहेर पडलो आणि रिकाम्या इमारतीकडे चालू लागलो. स्कायलाईनच्या आवारातून येणारा प्रकाश कमी कमी होत गेला आणि आम्ही अंधाराच्या कवेत जाऊ लागलो. आकाश रिकामं होतं, पण नुकतीच अमावस्या होऊन गेलेली असल्यामुळे चंद्राचा प्रकाश नव्हता. रिकाम्या इमारतीच्या मागच्या बाजूने लाटांचा आवाज येत होता. आम्ही गेटपाशी येऊन थांबलो आणि कानोसा घेतला. सगळा प्रदेश स्मशानासारखा शांत होता.

“आता मी सांगतो ते नीट ऐका.” अल्फा हळू आवाजात म्हणाला, “वरती नुकताच दिवा लागला आहे, याचा अर्थ अजूनही घुसखोर इमारतीतच असायला हवा. वरून खाली येण्यासाठी दोन जिने आहेत. ते दोन्ही जिने आपण ब्लॉक केले, तर त्याला पळून जायला तिसरा मार्ग नाही. मी मुख्य जिन्यावरून वरती जातो. तुम्ही दोन्ही जिने अडवून खाली उभे रहा. आपल्यापैकी एकाला तरी तो सापडलेच. आपल्यापैकी कुणालाच तो नाही सापडला तर तो इमारतीतच कुठंतरी लपलाय असा

अर्थ होतो. मग आपण एकेक मजल्यावरच्या खोल्यांत जाऊन तपासणी करू. ओके?”

“ओके.” मी म्हणालो. दिपक जरा भेदरलेला होता, पण त्यानंही मान डोलावली. आम्ही इमारतीच्या आवारात प्रवेश केला. अंधारात पायाखालचं दिसणं मुश्किल झालं होतं. तरीही आम्ही अंदाजाने पावलं टाकत इमारतीपाशी आलो आणि पायऱ्या चढून आत शिरलो. इमारतीच्या आत अंधाराचा रंग अधिकच गडद भासू लागला होता. भर उन्हाळ्याच्या दिवसांत मला अंगात हुडहुडी भरल्यासारखी वाटायला लागली. आम्ही जिन्यापाशी येऊन पोचलो. अल्फाने माझा खांदा थापटला आणि तो दिपकला घेऊन निघून गेला.

मी जिन्याच्या दिशेने वरती पाहिलं. पाचसहा पायऱ्यांच्या पुढे काहीही दिसत नव्हतं. माझ्या श्वासोच्छ्वासांचाही आवाज येईल इतकी शांतता होती. पाचदहा मिनिटं गेली. मी काहीतरी घडण्याची वाट बघत राहिलो. अल्फा एव्हाना वरती पोचला असेल का? त्याला कोणी/काही दिसलं असेल का? मग अल्फा त्याला पकडेल का? की तो अल्फाला चकवा देऊन दोन्हीपैकी एका जिन्यावरून खाली पळत येईल? तसं असेल तर तो माझ्या बाजूला येईल की जिथं दिपक थांबलाय तिथं येईल? अचानक मला कोणत्याही क्षणी होणाऱ्या हल्ल्यासाठी सज्ज रहायला हवं, अशी जाणीव झाली.

मी कानात प्राण ओतून ऐकण्याचा प्रयत्न करत होतो, पण एवढासाही आवाज कुठून येत नव्हता. तिथं इतकी शांतता होती, की अगदी अकराव्या मजल्यावर काही खुट्ट झालं तरी खालपर्यंत ऐकू आलं असतं. पण ना कुणाच्या धावपळीचा आवाज आला, ना कुठला आरडाओरडा ऐकू आला. वरती नक्की काय घडत होतं, याचा तिळमात्र अंदाज येत नव्हता.

आणि अचानक तो आवाज आला – धप् असा. जणू कोणीतरी उंचावरून उडी मारली होती. पण तो आवाज बाहेरच्या आवारातून आला होता. कसला आवाज आहे, हे पाहण्यासाठी घटनेची नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून माझे पाय बाहेरच्या दिशेने वळले. पण क्षणात माझं मन स्तब्ध झालं – धिस् कुड बी अ ट्रॅप! जिन्यात उभारलेल्या लोकांचं लक्ष विचलित करण्यासाठी घुसखोराने ही युक्ती केलेली असू शकते! मी बाहेर पाहण्याची माझी इच्छा काबूत ठेवली आणि जिन्यापाशीच पाय रोवून उभा राहिलो.

पण तिथं मी चुकलो होतो. पुढच्याच क्षणी मला अल्फाचा फोन आला –

“प्रभू, ताबडतोब बाहेर जा… घुसखोर पळून जातोय!”

मी तत्क्षणी वळून बाहेरच्या दिशेने धावलो. मुख्य दाराच्या पायऱ्या उतरून ज्या दिशेने आवाज आला होता, तिकडे वळलो. मागोमाग

दिपकही आलाच. इमारतीला वळसा घालून आम्ही जेव्हा मागे आलो, तेव्हा आम्हाला ते दिसलं – दूरवर मागच्या बाजूच्या कंपाऊंडवर चढलेली काळी आकृती! तोच आम्हाला हवा असलेला घुसखोर आहे, हे मी ताडलं. मी जोरात त्याच्या दिशेने धावलो. पण माझा प्रयत्न निष्फळ ठरणार होता. कारण आमच्यामधलं अंतर खूपच जास्त होतं. आम्ही अर्ध्या रस्त्यात पोचायच्या आधीच ती आकृती पलिकडच्या बाजूला दिसेनाशी झाली होती. तिकडून एक गाडी सुरू झाल्याचा आवाज आला. एका क्षणी तो आवाज वाढला, मग ‘घूं घूं’ करत तो कमी कमी होत गेला आणि अखेर नाहीसा झाला. आम्ही पत्र्याच्या कंपाऊंडपाशी आलो त्या वेळेपर्यंत आमचं सावज कधीच पसार झालं होतं.

मी आणि दिपक गुडघ्यांवर हात ठेवून धापा टाकत राहिलो. मिनिटभरातच अल्फाही मागोमाग पोचला. तो फोनवर कुणाशीतरी बोलत होता.

“... हँगिंग गार्डनच्या रोडला ब्लॉक करता येईल का? पटकन् चेक कर आणि मला कळव.”

त्यानं फोन ठेवला आणि आमच्याकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावर वैताग होता.

“मूर्ख! महामूर्ख आहे मी!” तो दातओठ खात म्हणाला, “माझा मेंदू काढून ‘जगातला सर्वात मठ्ठ मेंदू’ या शिर्षकाखाली प्रदर्शनाला ठेवायला पाहिजे!”

“नक्की काय घडलं अल्फा?” मी विचारलं, “तो जिन्याचा वापर न करता खाली कसा उतरला?”

“जिन्याचा वापर करूनच उतरलाय तो!” अल्फा म्हणाला, “पण तो तळमजल्यावर आलाच नाही. त्यानं पहिल्या मजल्यावरच्या एका खोलीत शिरून थेट बाहेर उडी मारली. त्याला बहुधा ठाऊक होतं की दोन्ही जिन्यांचे तळ तुम्ही अडवून उभे आहात. त्यामुळे त्यानं थोडं धाडस करून वरच्यावर तुम्हाला बायपास केलं. डॅम… मी खरंच महामूर्ख आहे.”

“ओह् माय गॉड!” मी चाटच पडलो.

“आपण घुसखोराला कमी लेखुन चूक केली, मित्रांनो. आपल्या तिघांच्याही हातांवर आरामात तुरी ठेवल्या त्यानं.” अल्फा म्हणाला, “मला अजूनही कळत नाही की मी आल्याची चाहूल त्याला लागलीच कशी?”

आम्ही हताश शांततेत काही वेळ तसेच उभे राहिलो.

“तो सापडण्याची काही शक्यता आहे का?” दिपकने विचारलं.

"मी माझ्या इंटेलिजन्स नेटवर्कला अलर्ट दिला आहे. पण तो स्पोर्ट्स बाईक घेऊन आला असेल, याची मला थोडीच कल्पना होती! आपण पाठलाग केलाही असता, पण आपली गाडी बाहेर निघेपर्यंत तो कुठल्याकुठे गेला असेल. शिवाय आपल्याकडे ना त्याच्या गाडीचा नंबर आहे ना रंगरूप आहे. पाहूया. आता तो सापडला, तर चमत्कारच घडला असं मी म्हणेन."

काही वेळ कोणीच बोललं नाही.

"आता काय करायचं?" मी विचारलं. अल्फाने काही क्षण इकडेतिकडे पाहिलं.

"तो इतका धावतपळत गेलाय याचा अर्थ काहीतरी मागं सोडून गेला असणार." तो म्हणाला, "जरा तपास करून पाहू, आपलं नशिब चांगलं आहे का ते!"

त्याने मोबाईलचा टॉर्च पत्र्याच्या कंपाऊंडजवळचा परिसर तपासायला सुरुवात केली. आतल्या बाजूला तरी काही पटकन नजरेला दिसेल असा पुरावा नव्हता. थोडा वेळ तपास केल्यावर अल्फानं मोबाईल मला धरायला दिला आणि तो स्वतः पत्र्याच्या कंपाऊंडवर चढला. मधोमध तोल सावरत त्यानं पत्राही तपासला. मग पलिकडच्या बाजूला उडी मारली.

“मोबाईल फेक रे प्रभू!” पलिकडून आवाज आला.

“झेलशील का?” मी ओरडून विचारलं.

“हो हो टाक.” पुन्हा आवाज. मी आवाजाच्या अनुरोधाने मोबाईल पत्र्यावरून पलिकडे फेकला. मोबाईल खाली पडल्याचा आवाज आला नाही याचा अर्थ अल्फाने तो पकडला असावा. मग काही वेळ इकडेतिकडे चालणाऱ्या पावलांचा आवाज आला. आणि अचानक कंपाऊंडवर डोकावणारा अल्फाचा चेहरा दिसला.

“फाऊंड इट!!” तो उत्साहाने ओरडला. त्याने हात उंचावून दाखवला. त्याच्या हातात एक पांढरा रुमाल लटकत होता. आणि त्याच्याकडे पाहून अल्फा आनंदाने हसत होता.

*

दुसऱ्या दिवशी सकाळी मी उठलो तेव्हा क्षणभर माझ्या लक्षातच आलं नाही, की मी कुठं आहे. इकडेतिकडे नजर फिरवल्यावर माझ्या ध्यानात आलं की काल रात्री रिकाम्या इमारतीचं साहस करून आल्यानंतर मी अल्फाच्या फ्लॅटवरच झोपलो होतो. मी आळोखेपिळोखे देत उठलो आणि बाहेर आलो. अल्फा कुठंतरी गायब होता. मी ब्रश वगैरे

करून अल्फाला फोन लावला. पण त्यानं काही उचलला नाही. तो कुठे असणार, हे मला ठाऊक होतं. मी दार बंद करून बाहेर आलो आणि पलिकडच्या खोलीत अल्फाने सेटअप केलेल्या छोट्या फॉरेन्सिक लॅबमध्ये शिरलो. आणि माझ्या अपेक्षेप्रमाणे, अल्फा तिथंच होता.

"काय रे. सकाळ सकाळी लॅबमध्ये येऊन बसला आहेस!" मी म्हणालो. पण त्याने लक्ष दिलं नाही. त्याचे डोळे मायक्रोस्कोपच्या भिंगात होते आणि काल रात्री सापडलेला रुमाल निरखत होते. कान अर्थातच बधिर झाले होते आणि त्यांना माझा आवाज ऐकू येणं बंद झालं होतं. मी बाजूच्या खुर्चीवर बसून त्याचा कार्यक्रम होण्याची वाट पाहात राहिलो. अखेर पंधरा मिनिटांनी तो त्याच्या खुर्चीवर गोल वळला आणि माझ्याकडे पाहिलं.

"काय मिळालं?" मी विचारलं.

"बरंच काही." अल्फा म्हणाला, "आपला घुसखोर कसा दिसतो, त्याचं राहणीमान कसं आहे, आर्थिक परिस्थिती कशी आहे, त्याच्या सवयी काय आहेत, त्याला व्यसनं कोणती आहेत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, तो कुठं राहतो."

"व्हॉट?" मी ते ऐकून उडालोच, "या रुमालावरून तू तो कसा दिसतो आणि कुठं राहतो हे कसंकाय सांगू शकतोस?"

“निरिक्षण-निष्कर्ष पद्धतीच्या आधारे, माय फ्रेंड.” अल्फा उत्तरला.

“चल! काहीतरीच काय. मला नाही पटत हे.” मी अविश्वास दाखवत म्हणालो.

“अरेच्चा! बरं, तुला एकेक करून माझे निष्कर्ष सांगतो. मग त्याचा एव्हिडन्स दाखवतो. मग तर पटेल?”

“बरं, सांग.” मी म्हणालो.

“तर,” अल्फा एखाद्या जादुगाराच्या आविर्भावात म्हणाला, “माझ्या निरिक्षणांच्या अनुसार, हा घुसखोर तीस ते चाळीस या वयोगटातला आहे. त्याचा वर्ण सावळा असावा. त्याची आर्थिक परिस्थिती पूर्वी फार चांगली होती, पण अलिकडे त्याला पैशांची चणचण भासतेय. तो अविवाहित आहे, कदाचित एकटाच राहतो. पण त्याची कोणीतरी प्रेयसी असावी. स्वभावाने निष्काळजी आहे. त्याला ड्रग्ज घेण्याची सवय आहे. तो एक प्रशिक्षित ॲथलीट आहे, पण सध्या बेकार असावा. आणि शेवटचं – तो गोवंडी किंवा देवनार यांपैकी कुठल्यातरी भागात रहात असावा. कदाचित एखाद्या चाळीतच.”

मी चाट पडून त्याच्याकडे पहातच राहिलो.

“काय? अरे बोल की काहीतरी!” अल्फा माझ्या तोंडाकडे पहात म्हणाला.

“तू... तू त्या रुमालावरून एवढे सगळे निष्कर्ष काढलेस? कसं शक्य आहे?” मी विचारलं. भलेही मी याआधीही अल्फाचे चमत्कृतीपूर्ण तर्क ऐकले होते आणि अनुभवले होते, पण दरवेळी मला नवा धक्का बसायचा कधी चुकला नव्हता. एखाद्याच्या रुमालावरून फारफारतर तो माणूस थोबाडावर कोणती पावडर लावतो हे कळालं असतं. पण हे ॲथलीट वगैरे!!

माझ्या बोलण्यावर अल्फा हसला.

“सांगतो.” तो म्हणाला. “खुर्ची ओढ इकडे.”

मी त्याच्याजवळ गेलो. त्यानं मायक्रोस्कोपला ॲटॅच केलेला त्याचा लॅपटॉप माझ्या दिशेने वळवला आणि काही इमेजेस ओपन केल्या.

“मी तुला माझे तर्क या फोटोज् च्या आधारे स्पष्ट करतो. आपण एकेक गोष्ट पहात जाऊ.” अल्फा म्हणाला, “तर, हा पहिला फोटो पहा. दोनतीन केस दिसतायत का? दोन काळे आहेत आणि एक पांढरा.”

मी इमेजमध्ये पाहिलं. अगदी बारीक केस होते ते.

“हे कानाजवळचे कल्ल्यांचे केस आहेत.” अल्फा म्हणाला, “तसं केसांवरून वय सांगणं कठीण आहे. शिवाय पांढरे-काळे संमिश्र केस म्हणजे वय चाळीस ते साठच्या दरम्यान आहे असं कोणीही म्हणेल. पण घुसखोराची चपळता पाहता मला नाही वाटत की त्याचं वय फार असेल.

म्हणून मी म्हटलं की वय चाळीसच्या आतच असावं. फारफारतर अर्ली फोर्टीज्. पुढं.”

त्याने इमेज पुढे ढकलली.

“मी रुमालावरच्या घटकांवर काही रासायनिक चाचण्या करून पाहिल्या. त्यात मला फेअरनेस क्रिमचा काही अंश आढळला. आता एखाद्या गोऱ्यापान मनुष्याला फेअरनेस क्रिमची आवश्यकता का पडेल? मलाच पहा!”

मी तिरक्या नजरेनं त्याच्याकडे पाहिलं.

“अर्थातच, तो मनुष्य सावळा असणार.” अल्फा हसत म्हणाला, “पुढची इमेज. हा रुमालाच्या फॅब्रिकचा मायक्रो स्केलवर घेतलेला फोटो आहे. या धाग्यांच्या क्वालिटीवरून सरळसरळ दिसतं, की हे चांगल्या प्रतिचं कापड आहे. स्टेशनवर विकत घेतलेला दहापंधरा रुपयांचा रुमाल नाहीये हा. चांगल्या कंपनीचा आहे. त्यामुळे रुमाल विकत घेण्याच्या वेळी त्याची आर्थिक परिस्थिती चांगली होती. पण आत्ता त्याला पैशांची चणचण भासतेय असं मी का म्हणालो? कारण मघाशी मी ज्या फेअरनेस क्रिमबद्दल बोललो, ते अगदीच स्वस्तातलं, लोकल कंपनीचं आहे. याच फॅब्रिकच्या इमेजवरून हे कळतं की हा रुमाल कमीतकमी दोन वर्षांपासून वापरात आहे. त्याचे जीर्ण झालेले धागेच बोलतायत. एखादा मनुष्य एकच

रुमाल दोन वर्षे का वापरेल? कारण तो निष्काळजी वृत्तीचा आहे. कदाचित त्याच्या घरी त्याला या निष्काळजीपणावरून टोमणे मारणारी बायको नसेल. बायकांचं अशा गोष्टींवर बारीक लक्ष असतं. म्हणून मी म्हणालो की तो अविवाहित आहे."

"पण... " अल्फाने पुढे पुस्ती जोडली, "या रुमालाला काही काही ठिकाणी थोडा लालसर रंग लागला आहे. ही पुढची इमेज बघ. माझ्या अंदाजाप्रमाणे, हा एका लिपस्टीकचा रंग आहे. आता लिपस्टीक म्हटलं की बाई आलीच. बायको नाही म्हणून प्रेयसी."

त्यावर मी हसलो.

"पुढचा तर्क – घुसखोर ड्रग्ज घेतो. हेही मी त्या केसांच्या नमुन्यांवरून ठरवलं. होय- केसांवरून ड्रग टेस्ट करता येते. पुढच्या इमेजमध्ये तू पाहशील, तर त्यात काही रासायनिक चाचण्यांचे फोटो आहेत. या चाचणीत मला मॉर्फिन मिळालं आहे, जे ड्रग ॲडिक्ट लोकांच्या केसांत आढळतं. निष्कर्ष – ड्रग ॲडिक्ट."

त्याने इमेज पुढं ढकलली. आता स्क्रिनवर पांढऱ्या पृष्ठभागावर मोठी झालेली काळपट कस्पटं दिसत होती. शिवाय कापडाचे काळे पडलेले धागेसुद्धा दिसत होते.

"हे पाहिलंस?" अल्फाने विचारलं.

“काळे पडलेले धागे?” मी विचारलं, “काय झालंय यांना? जळालेत का?”

“अं हं. धागे जळाले असते, तर ते फोटोत येण्यासाठी शिल्लकच राहिले नसते. पण तू शब्द योग्य वापरलास. हे काळपट डाग जळण्याचेच आहेत, पण धागे नव्हे - कचरा!”

मी भुवया आक्रसल्या.

“हा मनुष्य जिथं राहतो, तो भाग खूपच प्रदुषित आहे. आसपास सतत कुठंतरी कचरा जळत असणार आहे. त्या धुराचाच हा परिणाम आहे. घुसखोर जेव्हा कधी रुमाल धुवून टाकत असेल, तेव्हा सुकायला तो मोकळ्या आकाशाखाली टाकणार – गच्ची म्हण, बाल्कनी म्हण, व्हरांडा म्हण. तिथं या रुमालाचा बाहेरच्या प्रदुषित हवेशी संपर्क येतो. ही जी काळी कस्पटं आहेत ती विविध पदार्थांची आहेत. कागद, प्लॅस्टिक, रबर, थर्माकोल. एवढे सगळे पदार्थ जळलेल्या कचऱ्यातून हवेत निघताहेत याचा अर्थ नक्कीच जवळपास कुठंतरी डंपिंग ग्राऊंड असावं – जिथं कचरा टाकला जातो आणि जाळला जातो. मग मुंबईतलं सर्वात मोठ्ठं कचरा डंपिंग ग्राऊंड कुठे आहे? देवनार आणि गोवंडीजवळ. अर्थात, हा माझा तर्क थोडा धाडसाचाच आहे, पण कदाचित घुसखोर हा दोहोंपैकी कुठलातरी रहिवासी असावा.”

“अफलातून!” मी त्यावर प्रभावित होऊन ओरडलो, “तू ग्रेट आहेस अल्फा! इतक्या बारकाईने निरिक्षणं व तर्क फक्त तूच करू शकतोस. इतर कोणीच नाही.”

“धन्यवाद धन्यवाद.” अल्फाला हवी असलेली स्तुती मिळाल्यावर तो खुश झाला.

“पण अल्फा, हे सगळं तर ठीक आहे रे. पण तो मनुष्य ट्रेन्ड ॲथलीट होता, हे तू या रुमालावरून कसं काय सांगू शकतोस?” मी स्पष्टीकरण राहिलेला मुद्दा अधोरेखित केला.

“अच्छा ते होय. ते मी रुमालावरून नाही ओळखलं.” अल्फा म्हणाला, “ते मी ओळखलं घुसखोरानं काल रात्री केलेल्या करामतीवरून! मी वरून पहात होतो. त्याने जेव्हा पहिल्या मजल्यावरून उडी मारलेली मला दिसली, तेव्हा त्याची लँडींगची पद्धत मी पाहिली. त्यानं जमिनीवर पडल्या पडल्या कोलांटी उडी मारली – चित्रपटांत दाखवतात तसं. पण ती एका प्रोफेशनल ॲथलीटची निशाणी आहे. उडी मारल्यावर जमिनीकडून येणारा धक्का शोषून घेण्यासाठी तशी क्रिया करतात. साहजिकच मी निष्कर्ष काढला, की घुसखोर हा अशा गोष्टींत प्रशिक्षित असावा. आय कॅन टेल् यू, अशा पद्धतीने उंचावरून खाली उतरणं हे फार कौशल्याचं काम आहे. कोणी ऐरागैरा मनुष्य ते नाही करू शकत.”

मी स्तुतीपर टाळ्या वाजवल्या.

“वाह् वाह्. भले शाब्बास!!” मी म्हणालो. अल्फा हसला.

“एवढ्यावर खुश होऊन चालणार नाहीये बरं का.” तो म्हणाला, “हे सगळे ढोबळ अंदाज आहेत. यावरून घुसखोराचा पत्ता शोधणं आणि त्याला पकडणं कठीण आहे. शिवाय, तो त्या रिकाम्या इमारतीत जाऊन नक्की काय करतो, हेही आपल्याला अजून समजू शकलं नाहीये.”

“तू काल वरती गेला होतास तेव्हा तुला काही वेगळं दिसलं नाही का?” मी विचारलं.

“नाही.” अल्फा म्हणाला, “मी वरती खोलीत पोचलो तेव्हा आत काय असणार याबद्दल माझ्या मनात कुतूहल होतं. पण जे सत्पालच्या डायरीत लिहिलं होतं तेच मला दिसलं. खोली पूर्णपणे रिकामी होती. आतमध्ये कोणीही आणि काहीही नव्हतं. खोली अगदी सकाळी आपण पाहिली तशीच होती.”

“हं… “ मी म्हणालो, “कदाचित तू म्हणतोस तसंच असेल. वरती जाऊन फक्त दिवा लावून इशारा देणं एवढंच त्याचं काम असेल.”

“अं हं! मी तसं म्हणालो हे खरं आहे, पण आता मला तसं वाटत नाहीये.” अल्फा म्हणाला.

“का बरं?” मी आश्चर्याने विचारलं.

“त्याला कारणीभूत दोन गोष्टी आहेत.” तो म्हणाला, “पहिली म्हणजे, मी वरून घुसखोराच्या धावणाऱ्या आकृतीकडे पाहात होतो. अंधारात फारसं स्पष्ट दिसत नसलं तरी मला एवढं तरी कळालं, की त्याच्या पाठीवर एक लंबुळकी बॅग होती. त्यात नक्की काहीतरी होतं, थोडं जडसर. कारण पळताना त्याला थोडासा त्रास होत होता, असं मला वाटलं. वरती जाऊन फक्त दिवा लावायचं काम असणाऱ्या माणसाला सोबत बॅग बाळगण्याचं काय कारण?

“आणि दुसरं म्हणजे, घुसखोराच्या रुमालावरून एक गोष्ट मला समजली. काल जेव्हा मी रुमाल हातात घेतला, तेव्हा तो मला जरा ओलसर लागला होता. याचा अर्थ घुसखोर त्या खोलीत नक्कीच एखादं कष्टाचं काम तर करत असणार. रुमाल ओला होण्याइतपत घाम केवळ उष्णतेमुळे येऊ शकत नाही. शिवाय, रात्रीच्या वेळी हवा थंड आणि कोरडी होती. त्यात समुद्रावरचा वारा. रुमाल भिजेल इतका घाम खचितच येणार नाही.”

“पण घाम येईल असं काय केलं असणार त्यानं?” मी म्हणालो.

“मला विचारशील, तर त्याचा संबंध आपल्याला दिसलेल्या अवजड वस्तू ओढल्याच्या खुणांशी आहे.” अल्फा म्हणाला, “तो नक्की काय ओढत नेतो, कुठं टाकतो ते काही समजत नाही. पण तो वरती जाऊन फक्त दिवा लावणं एवढंच करत नाही, हे निश्चित.”

“मग या सगळ्याचा अर्थ काय आहे अल्फा?” मी विचारलं. अल्फाचा चेहरा गंभीर झाला.

“जे घडतंय, ते आपण कल्पना करत होतो तितकं साधंसुधं नाहीये, प्रभू.” तो म्हणाला, “मी आता झटपट पावलं उचलणार आहे. माझ्या पोलीस मित्रांना विश्वासात घेऊन गोवंडी-देवनार आणि मला संशय असलेल्या आणखी तीनचार भागांचं ट्रॅफिक सीसीटीव्ही फुटेज मिळवतो. त्यात कुठं ना कुठंतरी गाडी पळवणारा घुसखोर दिसेलच. त्यावरून त्याचा निश्चित ठावठिकाणा समजेल. एकदा का तो हातात आला, की आपलं काम तमाम!”

आम्ही जागेवरून उठलो.

“चला, आता पहिला चहा. नंतर पुढचं सगळं काम!” अल्फा म्हणाला. आम्ही फॉरेन्सिक लॅबला लॉक केलं आणि पुन्हा फ्लॅटवर परतलो.

***

# चार

त्या दिवशी फारसं काही घडलं नाही, किंवा कमीतकमी मला तरी तसं दिसलं नाही. अल्फा आवरून बाहेर पडला तो गायबच झाला. कदाचित तो त्याच्या पोलीस मित्रांना ‘विश्वासात’ घ्यायला गेला असावा. मी आयआयटीला परतलो आणि माझी उरलीसुरली कामं आटपायला सुरुवात केली. खोलीत सामानाचा ढिग होता जो मला पॅक करायचा होता. हा अल्फा लेकाचा काही मला आवरा आवरी करायला मदत करणार नव्हता. अजूनही त्यानं माझ्या जाण्याबद्दल ब्र शब्दही काढला नव्हता. त्यामुळे मदतीची अपेक्षा तर लांबच. मी थोडेफार कपडे वगैरे सॉर्ट केले आणि एका बाजूला लावून ठेवले. अल्फा कदाचित शोधमोहीमेवर गेला असेल, त्याचा आता काही लवकर फोन येत नाही, असं समजून

संध्याकाळच्या वेळी मी थोडं निवांत बसायला टेकणार, इतक्यात त्याचाच फोन आला.

“प्रभू, डिनर टुनाईट्? कुलाब्याला ये. तिथं आलास की कुठं यायचं ते सांगतो.” त्यानं माझा होकार गृहीत धरून फोन ठेवलाच! तसं एरवी मी इतक्या लांब जेवणासाठी जायला एका झटक्यात नकार दिला असता. पण अल्फाने स्वतःहून बोलावलंय याचा अर्थ त्याला माझ्याशी काहीतरी केसशी निगडित चर्चा करायची असणार होती. मी उठलो, जरा बऱ्यापैकी कपडे घातले आणि निघालो. नऊच्या सुमारास मी सीएसएमटीला उतरलो, तोपर्यंत मला अल्फाचा मेसेज आलाच होता. त्यानं एका मुघलाई रेस्टॉरंटचा पत्ता सांगितला होता. तिथं मी पोचलो.

वरच्या मजल्यावर एके ठिकाणी कोपऱ्यातला टेबल पकडून अल्फा बसला होता. त्याच्या समोर आणखी एक पाठमोरी व्यक्ती बसलेली पाहून मला आश्चर्य वाटलं.

“अरे! ये प्रभू ये.” अल्फा मला पाहताच म्हणाला, “पहा आपल्यासोबत आज कोण आहे. ओळख लागतेय का बघ!”

अल्फाच्या समोरचा माणूस वळला. त्याच्या भुवया जाड होत्या. त्यांखालचे डोळे तपकिरी, धारदार होते. लंबूळक्या नाकाखाली भरघोस मिशी होती. पहिल्याच नजरेत समजून येत होतं, की हा मनुष्य एकतर

पोलीस खाते किंवा मिलिटरीमधला आहे. पण साधारण चेहरेपट्टी पाहून मी त्या माणसाला ओळखलं.

"तुम्ही – इन्स्पेक्टर वाघमारे?"

तो माणूस मोठ्याने हसला.

"वा वा! ओळख विसरला नाही तुझा मित्र अजून! व्हेरी गुड." इन्स्पेक्टर वाघमारेंनी त्यांच्या दणकट हातांनी माझ्याशी शेकहँड केलं, "प्रभव ना तू? किंवा अल्फाच्या भाषेत – प्रभू!"

मी हसत होकार दिला. आम्ही सांगलीत कॉलेजला असताना एका केसमध्ये आमचा इन्स्पेक्टर वाघमारेंसोबत संबंध आला होता. तडफदार इन्स्पेक्टर अशी त्यावेळी त्यांची ख्याती होती. पण अल्फावर ते चांगलेच डाफरून असायचे. कॉलेजमध्ये असताना अल्फा पोलीसांच्या कामात लुडबूड करायचा आणि गुन्हेगाराचा माग काढण्याचा प्रयत्न करायचा (बऱ्याचदा पोलीसांच्या आधी अल्फाच गुन्हेगारापर्यंत पोचायचा). वाघमारेंना अल्फाचं हे मधेमधे नाक खुपसणं आवडायचं नाही. पण ही गोष्ट वगळता त्यांच्यात चांगली मैत्री होती. इतक्या वर्षांनी अचानक हेच वाघमारे मुंबईत पाहिल्यावर मला आश्चर्य वाटल्यावाचून राहिलं नव्हतं.

"इन्स्पेक्टर वाघमारे! तुम्ही इकडे कसं काय?" मी विचारलं.

“आता ते इन्स्पेक्टर वाघमारे राहिले नाहीत. असिस्टंट कमिशनर वाघमारे झालेत!” अल्फा म्हणाला.

“अरे वा!! प्रमोशनबद्दल अभिनंदन.” मी म्हणालो.

“थँक यू, यंग मॅन. अजूनही तू या नमुन्याला जळूसारखा चिकटून आहेस, हे बघून आनंद झाला!” वाघमारे म्हणाले. आम्ही हसलो आणि खुर्च्यांवर बसलो.

“वाघमारे मुंबईत आहेत, हे मला सरप्राईजच होतं. आज ट्रॅफिक सीसीटीव्हीच्या कामासाठी गेलो होतो तेव्हा तिथल्या कॉन्स्टेबलनं वाघमारेंचा उल्लेख केला. मग मी लगेचच यांना फोन लावला.” अल्फा म्हणाला.

“प्रधान सर तुझी सतत आठवण काढत असतात.” वाघमारे म्हणाले. प्रधान सर, म्हणजेच भालचंद्र प्रधान हे एक निवृत्त पोलीस अधीक्षक होते. अल्फा त्यांच्याच तालमीत तयार झाला होता. त्याची निरिक्षणशक्ती, तर्कशास्त्र, गुन्हेगारांचा माग काढण्याची पद्धत ही त्यांचीच देणगी होती. माझ्या माहितीप्रमाणे अल्फा अधूनमधून प्रधान सरांना भेट देण्यासाठी सांगलीची वारी करायचा.

“होय. परवाच भेटून आलो त्यांना.” अल्फा म्हणाला.

"वय झालं तरी त्यांच्या बुद्धीची धार काही कमी झाली नाहीये." वाघमारे म्हणाले, "बरं, काय चाललंय सध्या? मुंबई पोलिसांच्या कोणत्या प्रकरणात नाक खुपसून बसला आहेस?"

"खरंतर मुंबई पोलीसांना यात नाक खुपसायची गरज आहे. पण ते तसं करत नाहीयेत म्हणून माझ्यावर जबाबदारी पडलीये." अल्फा म्हणाला, "तसं वरवर पाहता समस्या साधीशीच आहे. अगदी महत्त्व न द्यावं अशी."

अल्फाने वाघमारेंना रिकाम्या इमारतीबद्दल आणि खिडकीतल्या प्रकाशाबद्दल वाघमारेंना थोडक्यात सांगितलं.

"हं, भलतीच चमत्कारिक भानगड आहे." वाघमारे कपाळावर आठ्या घालून म्हणाले, "तुझ्यासारख्याला भुरळ घालण्याइतपत तर नक्कीच चमत्कारिक आहे."

"मला अगदी सुरुवातीला वाटत होतं, की यातून मोठं काही निष्पन्न होणार नाही. पण आता वाटायला लागलंय, की कुठंतरी खोल पाणी मुरतंय." अल्फा म्हणाला.

"नवीन काही मिळालं का?" मी विचारलं.

"आजच्या दिवसात दोन गोष्टी मिळाल्या." अल्फा म्हणाला, "एक म्हणजे ट्रॅफिक सीसीटीव्हीचा डेटा. माफ करा हं वाघमारे, मी तुमच्या

डिपार्टमेंटच्या एका मित्राला धरून अनऑफिशियलीच ही माहिती काढली. मला शंका होती की घुसखोर हा गोवंडी किंवा देवनार यांपैकी कुठंतरी राहणारा असावा आणि तसंच निघालं.”

अल्फाने मोबाईलवर मॅप काढला आणि आम्हाला दाखवला.

“हा गायकवाड चौक.” स्क्रिनकडे बोट निर्देशित करत तो म्हणाला, “इथल्या सीसीटीव्हीमध्ये काल रात्री दोन वाजून पंचवीस मिनिटांनी एक स्पोर्ट्स बाईक कैद झालीये. काल कंपाऊंडच्या पलीकडून आलेल्या आवाजावरून हे तर आपल्याला कळालं होतंच, की घुसखोराकडे स्पोर्ट्स बाईक आहे. मग सीसीटीव्हीमध्ये कैद झालेली बाईक तीच कशावरून? याचं उत्तर म्हणजे, सीसीटीव्हीत ती चालवणाऱ्या मनुष्याच्या पाठीवर लंबुळकी बॅग दिसत होती – तीच जी मी पळणाऱ्या घुसखोराच्या पाठीवर पाहिली होती. चौकातून ती बाईक देवनार कॉलनी रोडने पुढं गेली. त्या रोडला पुढचा सिग्नल जेबी रोडच्या टर्नला आहे. पण त्या सीसीटीव्हीमध्ये ही बाईक दिसली नाही. याचा अर्थ मध्ये कुठंतरी तो वळला असणार.

“आता मध्ये तीन वळणं आहेत जी देवनार हाऊसिंग ब्लॉक्सकडे जातात. या भागात बऱ्याच जुन्या इमारती आणि बैठी घरंसुद्धा आहेत. घुसखोराचा मुक्काम यांतल्याच एखाद्या ब्लॉकमध्ये आहे. आणि मी म्हटलं तसं – डंपिंग ग्राऊंडच्या नजीक, रुमाल वाळत टाकण्याएवढी एखादी गच्ची असलेल्या ठिकाणी!”

“पण अल्फा, जरी इतक्या कमी कक्षेत तू तुझा शोध मर्यादित केला असलास, तरीही तिथं अशी चिक्कार घरं आणि अपार्टमेंट असणार आहेत. त्यांतला नक्की फ्लॅट शोधेपर्यंत वर्षं उलटतील!” वाघमारे म्हणाले.

“म्हणून तर मला तुमची मदत हवी आहे.” अल्फा म्हणाला, “पोलीस डिपार्टमेंटची जर मदत झाली, तर त्या भागात चौकशी करता येईल आणि घुसखोराचा माग पटकन् काढता येईल. तुम्ही काहीतरी करून त्या भागात तपासाला माणसं पाठवू शकता का?”

अल्फाचा प्रश्न ऐकून वाघमारेंच्या चेहऱ्यावर जे हावभाव आले, ते पाहूनच मला वाटलं की ते अल्फाला नकार देणार आहेत.

“खरं सांगायचं तर हे थोडं अवघड आहे अल्फा.” ते म्हणाले, “मला तपासाला डिपार्टमेंटची माणसं पाठवायला काहीच अडचण नाही, पण केव्हा? जेव्हा एखादा गुन्हा घडला असेल तर! तू सांगितलेली हकिकत रहस्यमय, संशयास्पद आहे, हे कबूल. पण यात कुठंच एखादा गुन्हा घडलेला नाहीये. तुला फक्त असं वाटतंय की काहीतरी काळंबेरं आहे. फक्त तेवढ्या माहितीवर मी पोलीस डिपार्टमेंटची माणसं कामाला लावू शकत नाही.”

"पण कदाचित गुन्हा घडणार असेल तर? ही सगळी एखाद्या मोठ्या गुन्ह्याची सुरुवात असेल तर? मला खात्री आहे, वाघमारे सर – ज्याअर्थी तो घुसखोर आमची चाहूल लागताच पळून गेला, त्याअर्थी तो नक्कीच काहीतरी बेकायदेशीर कृत्य करतोय. आपण थोडं कक्षेच्या बाहेर जाऊन शोध घेतला तर कदाचित काही विपरित घडण्याआधीच थांबवू शकतो."

"मी तुझ्याशी पूर्ण सहमत आहे. पण या क्षणी मी खरंच काही करू शकत नाही. मी माझं पद वापरून तुला मदत केली असती, पण कुणाकडे पर्सनल फेव्हर मागवा इतकी माझी इथं अजून ओळख झालेली नाही. शिवाय 'नवीन असिस्टंट कमिशनरने डिपार्टमेंटची माणसं काहीतरी क्षुल्लक गोष्टीच्या मागं लावली' अशा कमेंट्स मला ऐकायच्या नाहीयेत. तुला वाटतंय ना, की यामागे काहीतरी मोठं षडयंत्र आहे? ठीक आहे. तू मला काहीतरी गुन्हा घडतोय याचा फक्त एकच पुरावा आणून दे, मग मी तुला डिपार्टमेंटची हवी तेवढी माणसं उपलब्ध करून देतो. यू हॅव् माय वर्ड!"

वाघमारेंचा मुद्दा बरोबर होता आणि तो स्विकारण्याखेरीज आमच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता.

"ठीक आहे सर. पुरावा लवकरच तुमच्या हातात असेल याची मी खात्री देतो!" अल्फा म्हणाला. वाघमारेंनी स्मित करत मान हलवली. काही क्षणांतच आमचं मुघलाई पद्धतीचं जेवण आमच्या टेबलावर हजर

झालं आणि जुन्या आठवणी काढत त्यावर ताव मारण्यात आम्ही मग्न झालो.

*

अल्फा आणि मी परतीच्या प्रवासात एकमेकांशी काहीच बोललो नाही. अल्फा मुंबईच्या ट्रॅफिकमधून वाट काढण्यात मग्न होता. शिवाय बॅक ऑफ द माईंड तो देवनारसारख्या गजबजलेल्या वस्तीत घुसखोराला कसं शोधायचं यावर विचार करत असावा. अखेर पवईला पोचल्यावर निरोप घ्यायची वेळ आली, तेव्हा अल्फा मला म्हणाला,

“उद्या आपण गायकवाड चौक ते जेबी रोड यांच्या मधल्या भागाचा थोडा तपास करुया. कदाचित आपल्याला वाटतं तितकं हे अवघड नसावं. घुसखोराकडे स्पोर्ट्स बाईक आहे, हे आपल्याला ठाऊक आहे. त्या भागात स्पोर्ट्स बाईक असलेले फारफारतर डझनभर लोक असतील. शिवाय आपल्याला गाडीचं मॉडेल आणि नंबर ठाऊक आहे. कदाचित पोलीसांच्या मदतीशिवायसुद्धा दोनेक दिवसांत आपण घुसखोराचा ठावठिकाणा शोधू शकू.”

“चालेल.“ मी म्हणालो.

“ओके. उद्या सकाळी आठ वाजता मी इथंच तुला पिक अप करायला येतो. तयार रहा.”

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही गायकवाड चौकात पोचलो तेव्हा नऊ वाजायला आले होते. सूर्य डोक्यावर तळपायला सुरुवात झाली होती. ऑफिसला आणि शाळेला जाणारी जनता धावपळ करत होती. पण मुंबईच्या इतर भागांशी तुलना केली, तर देवनारचा भाग तसा शांत होता. अल्फाने रस्त्याच्या एकाच बाजूला त्याची पोर्श् थांबवली आणि आम्ही आत बसूनच काही क्षण त्या परिसराचा अंदाज घेत राहिलो.

“कुठून सुरुवात करायची?” मी प्रश्न विचारला.

“घुसखोर रात्री उशिरा बाहेर पडतो आणि उशिरा परत येतो, हे आपल्याला ठाऊक आहे. सांग बघू, इतक्या रात्री सुरू असेल असं कोणतं ठिकाण असू शकतं?”

“हॉटेल? पानपट्टी?” मी तर्क केला.

“पानपट्टी! अगदी बरोब्बर.” अल्फा हातावर टाळी देत म्हणाला, “चल, या रस्त्यावरच्या पानपट्ट्यांना एकेक करून भेट देऊ. मला खात्री आहे, कोणी ना कोणीतरी आपल्या घुसखोराला आणि त्याच्या गाडीला नोटीस केलं असेलच.”

अल्फाने गाडी एका पार्किंग स्पेसमध्ये लावली आणि आम्ही चौकातल्या पहिल्या पानपट्टीकडे मोर्चा वळवला. पानपट्टीजवळ पोचता पोचता अल्फा माझ्या कानात पुटपुटला,

“तू काही बोलू नकोस. फक्त माझ्या ‘हो’ ला ‘हो’ कर.”

पानपट्टीवाला एका पानावर मलई लावण्यात मग्न होता. आम्ही येताच तो म्हणाला,

“बोला साहेब. काय हवं आहे?”

“तसं मी इथं पत्ता विचारायला उतरलो. पण तू ‘साहेब’ची उपमा दिली आहेसच, तर काहीतरी घेऊनच जातो.” अल्फा म्हणाला. तसा तो पानवाला हसला, “एक गोल्ड फ्लेक दे.”

पानवाल्याने एक गोल्ड फ्लेक सिगारेटचं पॅक काढून दिलं.

“बरं, मी डिपार्टमेंटच्या एका कामगिरीवर आहे. एका माणसाचा पत्ता शोधतोय.” ‘डिपार्टमेंट’ असं म्हणताच तो पानवाला थोडा चपापला. आवाज खाली आणत त्याने विचारलं,

“सीआयडी का?”

“नाही. मी प्रायव्हेट इन्व्हेस्टीगेटर आहे. पण एका केसमध्ये डिपार्टमेंटची मदत करतोय.” अल्फा म्हणाला. ते ऐकून पानवाला एकदम आज्ञाधारक बनला.

“कुणाचा पत्ता हवा आहे सांगा साहेब. आपण या एरियात सगळयांना ओळखतो. आत्ता तुम्हाला त्याच्यापर्यंत नेण्याची व्यवस्था करतो. ” तो म्हणाला.

“त्या माणसाचं नाव गाव काहीच माहिती नाहीये.” अल्फा म्हणाला, “आमच्याकडे एवढीच माहिती आहे, की तो माणूस थोडा सावळ्या वर्णाचा आहे, त्याच्याकडे आर-वन्-फाईव्हची स्पोर्ट्स बाईक आहे आणि तो याच भागात कुठंतरी राहतो. तुझ्या बघण्यात कोणी आहे का असा?”

पानवाल्याने थोडा विचार केला. तो म्हणाला,

“अं.. माझ्या ओळखीत तरी असा कोणी नाहीये बुवा. असला तर या भागात नवीन असला पाहिजे. बाईकमधलं मला काही कळत नाही, पण स्पोर्ट्स बाईक असलेले बरेच लोक आहेत या भागात. नक्की सांगता येणार नाही.”

“हं.” अल्फा म्हणाला, “तुला त्याची आणखीन् एक खूण सांगतो. तो शक्यतो रात्री दहा-अकराच्या सुमारास बाहेर पडतो. असा कोणी पाहिला आहेस का त्या वेळेत?”

“नाही साहेब. ती वेळ तर माझ्यासाठी कस्टमरची वेळ असते. आजूबाजूला लक्षच जात नाही.” पानवाला म्हणाला.

"बरं. हे माझं कार्ड." अल्फाने खिशातून कार्ड काढत पानवाल्याकडे सरकवलं, "असा माणूस दिसला की मला फोन करायचा. तुला स्पोर्ट्स बाईकचं मॉडेल आणि नंबरही देऊन ठेवतो."

अल्फाने कार्डच्या मागेच आम्हाला हव्या असलेल्या गाडीचा नंबर लिहिला.

"ओके साहेब. मी आज लक्ष ठेवतो आणि ही गाडी दिसली की लगेच तुम्हाला फोन करतो." पानवाला म्हणाला. आम्ही त्याचा निरोप घेऊन पुढे निघालो. अल्फाने सिगारेटचं पॅकेट बाजूला फेकून दिलं.

"ओके. नेक्स्ट!" थोडं अंतर पुढे आल्यावर अल्फा म्हणाला, "पानपट्टीवाल्यांशिवाय आपण मेडिकल्स आणि आईस्क्रीमच्या गाड्यांवरही चौकशी करायला हवी. रस्त्याकडेला रात्री बारापर्यंत ओपन् असणारं प्रत्येक दुकान आपल्याला महत्त्वाचं आहे. कोणी ना कोणीतरी काहीतरी पाहिलं असणारच आहे!"

आम्ही एकेक करत सगळ्या दुकानांना, गाड्यांना आणि पानपट्ट्यांना भेट दिली आणि आम्हाला हव्या असलेल्या घुसखोराची आणि त्याच्या स्पोर्ट्स बाईकची माहिती विचारली. काही जणांनी 'डिपार्टमेंटच्या कामगिरीवर आहे' असं म्हटल्यावर एकदम नम्रतेची भुमिका घेत (चौकातल्या पानवाल्यासारखं) चौकशीला सहकार्य केलं.

काही जणांनी संशयित नजरेने आम्हाला वरून खालपर्यंत पहात मोजक्या शब्दांत प्रतिसाद दिला. काही जणांनी तर चक्क एक शब्दही सांगायला नकार देत आम्हाला बाहेर पिटाळून दिलं! अखेर चार तास वणवण भटकून अखेर आम्ही अल्फाच्या फ्लॅटवर परतलो. सगळीकडे चौकशी करूनही आमच्या हातात सॉलिड असं काहीच मिळालं नव्हतं. बऱ्याच जणांनी आम्ही वर्णन केलेली स्पोर्ट्स बाईक असणारा मनुष्य पाहिला होता, पण तो कुठं राहतो हे कुणालाच ठाऊक नव्हतं.

“आता काय करायचं अल्फा?” मी सोफ्यावर बसल्या बसल्या विचारलं.

“आता वाट बघायची!” अल्फा उत्तरला, “आपल्या बाजूने जितकं शक्य तितकं काम आपण केलं आहे. आत्तापर्यंत लोकांनी आपल्या घुसखोराची अजाणतेपणी दखल घेतली असेल, त्यांना त्याच्याबद्दल फार काही माहिती नसेल. पण आता ते लक्ष ठेवतील. आपण सांगितलेली स्पोर्ट्स बाईक दिसली रे दिसली, की आपण भेट दिलेल्यांपैकी निदान एकजणतरी मला फोन करेल! शिवाय मी माझ्या ‘नेटवर्क’मधली काही माणसंही त्या भागात पेरली आहेत. त्यामुळे आज ना उद्या आपल्याला घुसखोराचा ठावठिकाणा समजेलच.”

“मग तोपर्यंत आपण काय करायचं?” मी विचारलं.

"विचार! तोपर्यंत आपण विचार करायचा, प्रभू." अल्फा म्हणाला.

"कसला विचार?"

"एका न सुटलेल्या प्रश्नाचा विचार!" अल्फा उत्तरला.

"म्हणजे?"

"मला सांग, सत्पालची हकिकत ऐकून, किंवा त्या रिकाम्या इमारतीत आपल्याला आलेल्या अनुभवावरून तुला एक प्रश्न पडला नाही का?" अल्फाने विचारलं.

"कोणता प्रश्न?" मी गोंधळून विचारलं.

"घुसखोर दरवेळी सत्पाल किंवा आपण तिथं पोहोचायच्या आत तिथून फरार कसा होतो? त्याला कसं कळतं की कोणीतरी इमारत चढून त्याच्या मागावर येतंय?"

त्या प्रश्नावर मी भुवया आक्रसल्या.

अल्फा पुढे म्हणाला,

"असं पहा, सत्पलाच्या डायरीप्रमाणे तो दोनदा अकराव्या मजल्यावरच्या त्या खोलीत पाहणी करायला गेला आणि दोन्ही वेळा ती खोली रिकामी होती. मीदेखील जेव्हा वरती घुसखोराला पकडायला गेलो होतो तेव्हा माझ्या येण्याआधीच तो दुसऱ्या जिन्यावरून फरार झाला होता. थोडक्यात काय, तर त्याला कोणत्या ना कोणत्या मार्गाने आधीच

समजतंय, की कोणीतरी पायऱ्या चढून वरती येणार आहे आणि आपल्याला दुसऱ्या जिन्यावरून पळ काढला पाहिजे. हे कसं काय?"

मी विचारात पडलो.

"कदाचित त्याचा एखादा साथीदार त्यावेळी तिथं उपस्थित असावा." मी म्हणालो, "तो इमारतीच्या आवारात खालीच कुठंतरी उभा रहात असेल आणि वरती दिवा लावणाऱ्या माणसाला सिग्नल देत असेल."

"पण असा कोणी मनुष्य आपल्याला का दिसला नाही?" अल्फा.

"कारण तिथं अंधार होता आणि तो इमारतीच्या आवारात कुठंही लपलेला असेल." मी.

"कुठंही नाही. जिथून इमारतीचे दोन्ही जिने दिसतील अशा ठिकाणी." अल्फा म्हणाला, "आणि मला निश्चितपणे ठाऊक आहे, की त्यावेळी असा सिग्नल वगैरे देणारं कोणीही उपस्थित नव्हतं."

"मग दुसऱ्या कोणत्या मार्गाने घुसखोराला कळणार, अल्फा? पावलांचा आवाज?" मी विचारलं.

"नाही. पावलांच्या आवाजाने थोडक्यात सुटका होऊ शकते. पण इथं घुसखोराला आपण इमारतीत प्रवेश केल्या केल्याच समजलं होतं, की

कोणीतरी वरती येणार आहे. आठवतंय का, मी अकराव्या मजल्यावर पोहचेपर्यंत घुसखोर पहिल्या मजल्यापर्यंत उतरलाही होता."

"माझं तर काहीच डोकं चालेनासं झालंय बाबा." अखेर मी हार मानली.

"अर्थात, मलाही अजून काहीच अंदाज लागत नाहीये. तोच तर विचार करायचा मुद्दा आहे. एखादवेळेस आपल्याला त्या इमारतीला पुन्हा भेटही द्यावी लागेल. पण सध्यापुरतं आपल्या मेंदूला इतकं खाद्य पुरेसं आहे."

एवढं बोलून अल्फाने हातपाय ताणले आणि वरती शून्यात बघण्यात तो हरवून गेला. मी माझ्या खोलीवर जाण्यासाठी घेतलेला निरोप त्याला ऐकूही आला नाही.

*

गोवंडी भागात आम्ही केलेल्या चौकशीतून अल्फाने जे 'नेटवर्क' बनवलं होतं, त्यातून कधी ना कधी घुसखोराचा पत्ता लागणार, हे निश्चित होतं. कारण रस्त्यावरचा कोणी ना कोणीतरी आम्ही दिलेल्या वर्णनाची स्पोर्ट्स बाईक रस्त्यावर धावताना पाहणारच होता. पण तो प्रसंग इतक्या लवकर येईल, असं आम्हाला वाटलं नव्हतं. मी माझ्या हॉस्टेलच्या खोलीवर आल्यानंतर काही तासांतच अल्फाचा मला फोन आला.

“प्रभू, मला आत्ताच गायकवाड चौकातल्या पानवाल्याचा फोन आला होता. त्याला आपल्या घुसखोराच्या वर्णनासदृश दिसणाऱ्या एका माणसाचा पत्ता लागला आहे. त्याच्याकडे स्पोर्ट्स बाईकसुद्धा आहे असं कळालं. आपल्याला लगेच जायला हवं. दहा मिनिटांत कॉलेजच्या गेटपाशी येऊन थांब. मी तुला पिकअप् करायला येतोय.”

मी घड्याळात पाहिलं. रात्रीचे नऊ वाजायला आले होते. अल्फाच्या मोहीमेपुढे जेवणाची आहुती द्यावी लागणार होती. मी एक निराशेचा सुस्कारा सोडला आणि खोलीला कुलूप ठोकून बाहेर पडलो. अल्फा गेटवर माझी वाटच पहात होता. कारमध्ये बसून आम्ही गोवंडीच्या दिशेने निघालो.

“बातमी भरवशाची आहे ना? इतक्यातच घुसखोराचा पत्ता लागेल असं वाटलं नव्हतं.” मी म्हणालो.

“मलाही वाटलं नव्हतं.” अल्फा म्हणाला, “पण त्याच्या आवाजातला आत्मविश्वास तरी मला भरवशाचा वाटला.”

“त्याने स्वतः घुसखोर किंवा त्याची स्पोर्ट्स बाईक पाहिली का?”

“नाही. पण त्याला मिळालेली बातमी एकदम खात्रीशीर आहे असं तो म्हणाला.” अल्फा उत्तरला, “मला मनापासून वाटतंय की आज आपली घुसखोराशी भेट नक्की होणार!”

स्मित करत त्याने गिअर बदलला आणि ईस्टर्न एक्स्प्रेस हायवेवरून आमची गाडी वेगाने धावू लागली. गायकवाड चौकात पोचायला आम्हाला साधारण अर्धा तास लागला. चौकातल्या पानपट्टीवाल्याची तेव्हा गिऱ्हाईकाची वेळ होती. पण आम्हाला पाहताच तो पानपट्टीच्या छोट्या दरवाजाखालून बाहेर पडला आणि आमच्यापाशी आला.

“बोल भोला.” अल्फाने विचारलं (पानपट्टीवाल्याचं नाव भोला आहे, हे मला तेव्हा कळालं).

“खबर पक्की आहे साहेब.” तो अगदी पोलीसी खबऱ्याला शोभेल अशा खालच्या आवाजात म्हणाला, “तो मनुष्य हॉस्पिटल रोडवरच्या एका सोसायटीत राहतोय.”

“तो मी वर्णन केलेला माणूसच आहे हे कशावरून?” अल्फाने विचारलं.

“त्याच्याकडे तुम्ही सांगितलेली स्पोर्ट्स बाईक आहे.” भोला म्हणाला, “गाडीचा नंबरपण तोच आहे.”

“तू स्वतः पाहिलंस?”

“नाही. तुम्ही सकाळी मला सांगितलं तेव्हा मी ही गोष्ट माझ्या घरी बोललो. माझी बायको या भागातल्या सोसायट्यांत स्वयंपाकाला जाते. ती स्पोर्ट्स बाईकबद्दल ऐकताच मला म्हणाली, की अशी एक बाईक

हॉस्पिटल रोडवरच्या 'आदर्श' सोसायटीत तिने पाहिली आहे. त्या सोसायटीत एका फ्लॅटमध्ये ती स्वयंपाकाला जाते. मी तिला सांगितलं, की संध्याकाळी जाशील तेव्हा त्या गाडीचा नंबर पाहून मला फोन कर. तिचा मघाशी फोन आला आणि गाडीचा नंबर अगदी तुम्ही सांगितला तोच होता. मग मी जराही वेळ न घालवता थेट तुम्हालाच फोन केला."

"तुमच्या बायकोने गाडीच्या मालकाला पाहिलंय का" अल्फा.

"नाही. पण तो कोणत्या फ्लॅटमध्ये राहतो, हे तिनं शोधून काढलंय. तळमजल्यावरचाच फ्लॅट आहे." भोला.

"व्हेरी गुड. इथून किती दूर आहे ती सोसायटी?"

"जवळच आहे. चालत पाच मिनिटांच्या अंतरावर." भोला म्हणाला. अल्फाने त्याची पाठ थोपटली आणि हळूच त्याच्या खिशात काही नोटा सरकवल्या. भोलाने अगदी भक्तिभावाने अल्फाचा हात जोडून निरोप घेतला. आम्ही कारमध्ये परतलो आणि मॅपवर 'आदर्श सोसायटी'चा पत्ता टाकून गाडी सुरू केली. चौकातून जेमतेम दोनच लेन पलीकडे ती सोसायटी होती.

अल्फाने गाडी सोसायटीच्या अगदी समोरच पार्क केली. घुसखोराचा पाठलाग करायची वेळ आली तर पटकन गाडीपर्यंत पोहोचता

यावं हा त्यामागचा हेतू होता. आम्ही काही मिनिटं गाडीतून खाली न उतरता आतूनच इमारतीचा आणि आजूबाजूच्या परिसराचा आढावा घेतला. साधीशी पाच मजली सोसायटी होती ती. तीस-चाळीस वर्षं तरी जुनी असेल. भोवतीने कंपाऊंड म्हणून पुरुषभर उंच भिंत होती. तिच्यात लोखंडी गेट होतं. आतमध्ये एका बाजूला फक्त दुचाकी पार्किंग असावं. कारण आत कार जाण्याइतकं ते गेट मोठं नव्हतं. आणि बऱ्याचशा चारचाकी गाड्या रस्त्यावरच उभ्या होत्या. गेटवर अर्थातच सिक्युरिटी वगैरे भानगड नव्हती.

अल्फाने मला खूण केली. आम्ही दोघंही गाडीतून खाली उतरलो. रात्रीचे अकरा वाजायला आले होते. इमारतीत अजून जाग होती. आम्ही गेटच्या आत शिरलो. उजव्या बाजूला एक अरुंद रस्ता गेला होता. इमारतीत शिरण्याऐवजी अल्फा त्या रस्त्यावर वळला. मी त्याचा हेतू न समजून त्याच्या मागे चालू लागलो. थोडं अंतर पुढे जाऊन इमारतीला वळसा घातल्यानंतर आम्हाला टू-व्हीलर पार्किंगचं एक शेड दिसलं. अल्फाने तिकडे बोट दाखवत माझ्याकडे पाहिलं. त्या शेडमध्ये आम्हाला हवी असलेली स्पोर्ट्स बाईक उभी होती.

अल्फाची आणि माझी नजरानजर झाली. आमचं सावज इमारतीतच लपलेलं होतं. आम्ही पुन्हा मुख्य दरवाजापाशी आलो आणि इमारतीत शिरलो. तळमजला अंधारलेलाच होता. चार नंबरचा ब्लॉक, म्हणजे

सगळयात शेवटचा फ्लॅट घुसखोराचा होता. इमारतीत शिरताच उजवीकडे पायऱ्या होत्या आणि पुढे दोन बाजूंना प्रत्येकी दोन असे चार फ्लॅट होते. त्यांपैकी तीन फ्लॅटची दारं कुलूपबंद होती. चार नंबरचा एकच दरवाजा आतून लावून घेतला होता. आम्ही दरवाजाच्या जवळ गेलो. खालच्या फटीतून आतमधल्या दिव्याचा प्रकाश बाहेर पडत होता. याचा अर्थ आतमध्ये घुसखोर नक्की असणार होता.

मी अल्फाकडे पाहिलं. त्याने हळूवार खिशातून बंदूक काढली आणि दाराला कान लावून काही ऐकू येतंय का ते पाहिलं. आतमधून अस्पष्ट असा बोलण्याचा आवाज येत होता. आतमध्ये निश्चितपणे कोणीतरी होतं. दरवाजाच्या दिशेने पहात मला खूण केली. मग बोटांनीच 'एक-दोन-तीन' असं काऊंटडाऊन केलं आणि आम्ही दोघांनीही एकाच वेळी त्या दरवाजाला धडक मारली. दरवाजा जुनाट, पोपडे निघालेल्या लाकडाचा होता. त्याच्या बिजागऱ्यासुद्धा गंजलेल्या असाव्यात. एकाच धडकेत तो दरवाजा तुटून आतल्या बाजूला पडला आणि आम्ही आत शिरलो.

***

# पाच

आतमध्ये एक ट्यूबलाईट संथपणे जळत होती. तिचा प्रकाश एकेकाळी हिरव्या रंगाने रंगवलेल्या, पण आता पार रंग उडालेल्या जुनाट भिंतींवर पडत होता. डोक्यावर करकरणारा फॅन गोल फिरत होता. आम्ही खोलीभर नजर फिरवली. तिथं कोणीच नव्हतं. खोलीच्या दोन टोकांना दोन दरवाजे होते. जो बोलण्याचा आवाज येत होता तो एका दरवाजाच्या बंद दाराआडून येत होता. पण दरवाजा तोडण्याच्या आवाजामुळे आतल्या व्यक्तीच्या बोलण्यात अजिबात खंड पडला नाही. तो आवाज येतच राहिला. मी अल्फाकडे संशयाने पाहिलं. तो त्या खोलीच्या दिशेने पुढे झाला आणि तिचं दार ढकललं.

ती खोलीदेखील रिकामी होती! तो आवाज म्हणजे एका जुनाट रेडिओमधून येणाऱ्या निवेदकाचा आवाज होता. आम्ही वळून तिसऱ्या खोलीतसुद्धा तपासून पाहिलं. पूर्ण फ्लॅट निर्मनुष्य होता. आम्ही पाहिलेली शेवटची खोली म्हणजे किचन होतं (रेडिओ लावलेली खोली म्हणजे बेडरूम होती) आणि त्या किचनला आणखी एक दार होतं. बहुधा ते मागच्या बाजूला उघडत असावं. आम्ही ते उघडायचा प्रयत्न केला, पण ते बाहेरून बंद केलं होतं.

"घुसखोर मागच्या दरवाजातून निसटला!" अल्फा म्हणाला. त्याच्या आवाजात फ्रस्ट्रेशन दिसत होतं.

"अल्फा, बाहेर त्याची बाईक उभी आहे याचा अर्थ कदाचित तो इथंच कुठेतरी लपला असेल." मी सुचवलं.

"गुड पॉईंट. चल शोधूया." अल्फा म्हणाला. आम्ही बाहेर आलो आणि इमारतीला वळसा घालून पुन्हा मागे गेलो. स्पोर्ट्स बाईक अजून शेडमध्ये तशीच लावली होती. आणखी मागच्या बाजूला पुढे एक मोकळी जागा होती जिथे काही झाडं लावली होती. तळमजल्यावरील फ्लॅट्सचे मागचे दरवाजे इथेच उघडत होते. आम्ही घुसखोराच्या फ्लॅटचा दरवाजा शोधून काढला. त्याला बाहेरून कुलूप ठोकलं होतं. थोडक्यात, अल्फाचा अंदाज बरोबर होता. तो मागच्या दरवाजाने बाहेर पडला होता. पण मग ती बाईक?

आम्ही पुन्हा इमारतीत शिरून एक एक करून प्रत्येक मजला तपासला. पण व्यर्थ! आम्हाला हवा असलेला घुसखोर निसटला होता.

“त्याला आपण येणार, हे ठाऊक होतं.” अल्फा म्हणाला.

“ते कशावरून?” मी विचारलं.

“त्याचा फ्लॅट पाहिलास का? तिथं वैयक्तिक असं काहीच सामान नव्हतं. त्याला कुठूनतरी खबर लागली, की आपण त्याच्या मागावर आहे. त्यानं सगळं सामान गुंडाळलं आणि तो निसटला. त्याने मुद्दाम स्पोर्ट्स बाईक इथंच सोडली, कारण तिच्यासोबत त्याला कोणी पाहिलं असतं, तर पाठलाग होण्याची शक्यता होती.”

“बाप रे! पण हे कसं शक्य आहे अल्फा? त्याने आपल्याला आसपासच्या दुकानांत चौकशी करताना ऐकलं की काय?” मी म्हणालो.

“त्याची शक्यता फारच कमी आहे. कोणीतरी त्याच्यापर्यंत खबर पोहोचवली असणार.” अल्फा म्हणाला, “मी म्हटलं नव्हतं का – हे प्रकरण दिसतंय तितकं सोपं नाहीये. घुसखोराकडे काहीतरी अजब तंत्र आहे ज्यामुळे त्याला त्याच्या मागावर येणाऱ्याची आधीच बातमी लागतेय.”

“पण कसंकाय?”

“नो आयडिया.” अल्फा म्हणाला. काही वेळ आम्ही तसेच विचार करत थांबलो. मग अल्फा म्हणाला, “चल, घुसखोराच्या फ्लॅटचा थोडा कसून शोध घेऊ. काही ना काहीतरी सुगावा आपल्या हाती लागेलच.”

आम्ही पुन्हा त्या मोडून पडलेल्या दारातून फ्लॅट नंबर चारमध्ये घुसलो. पहिल्यांदा आत शिरल्यावर मी फ्लॅटकडे फारसं लक्ष दिलं नव्हतं. पण आता त्या खोल्यांमधला रिकामेपणा मला जाणवला. अगदीच मोजकं फर्निचर होतं तिथे. बैठकीच्या खोलीत दोन लाकडी खुर्च्या, एक टेबल, एक कपाट, एक छोटा पलंग आणि एक टी-पॉय इतकंच सामान होतं. एका भिंतीवर जुनाट, धुळकट तसबीर लटकलेली होती. कोपऱ्यात काही सिगारेटची थोटकं पडलेली होती. याखेरीज त्या खोलीत काहीही नव्हतं. तरीही अल्फाने खोलीची बारकाईने तपासणी केली. टेबल-खुर्च्यांच्या खालवर काही मिळतंय का ते पाहिलं. सिगारेटची एकदोन थोटकं गोळा करुन सोबत घेतली. मग आम्ही दुसऱ्या खोलीत गेलो.

रेडिओवर आता एक साठच्या दशकातलं कुठलंसं गाणं लागलं होतं. अल्फाने पुढे होऊन रेडिओ बंद केला. त्याही खोलीची अवस्था फारशी वेगळी नव्हती. एक पलंग आणि त्यावर ठिकठिकाणी कापूस बाहेर आलेली गादी. भिंतीच्या कोपऱ्यात एक कपाट, दुसऱ्या कोपऱ्यात टेबल-खुर्ची (त्यावरच तो रेडिओ ठेवलेला होता). समोर एक बंद खिडकी. वरती टांगणारा बल्ब. बाहेरच्या खोलीपेक्षा इथं फार काही विशेष दिसत नसलं,

तरी अल्फाने काहीतरी तिथं पाहिलं हे खरं. त्याने आधी खिडकीच्या गजांचं नीट निरिक्षण केलं. मग तो दरवाजाकडे गेला आणि तिथे काही वेळ उभा राहिला. त्याने दाराच्या कड्या आणि बिजागऱ्या तपासल्या. मग तो पुन्हा पलंगाकडे आला. तिथे ओणवा होऊन थोडी शोधाशोध केली. पलंगाखाली त्याला सूक्ष्म असं काहीतरी मिळालं असावं. त्याने वाकून ते चिमटीत उचललं आणि व्यवस्थित रुमालात ठेवून दिलं (ते काय होतं, हे मला दिसू शकलं नाही). मग त्याने कपाट उघडून पाहिलं. अखेर स्वतःशीच मान हलवत तो बाहेर गेला.

मला त्याच्या या हालचालींचं काहीच आकलन होत नव्हतं. मी त्याच्या मागोमाग गेलो. अल्फा किचनमध्ये शिरला आणि त्याची शोधक नजर रॅक्स आणि डब्यांवरून फिरू लागली. त्याने काही भांडी उलथीपालथी करून पाहिली. चहा-साखरेशिवाय तिथं दुसरं काहीच सामान नव्हतं. मी काही वेळ तसाच वाट पहात राहिलो. अखेर त्याचा तपास संपला आणि तो माझ्याकडे वळून म्हणाला,

“प्रभू, एक चांगली बातमी आहे!”

“घुसखोराबद्दल काही समजलं का?” मी उत्साहाने विचारलं.

“अं हं. पण त्याच्यासोबत हा फ्लॅट शेअर करणाऱ्याबद्दल समजलं!” अल्फा म्हणाला.

“काय?” मी आश्चर्याने ओरडलो.

“होय. इथं घुसखोर एकटा रहात नव्हता. त्याच्यासोबत आणखीही कोणीतरी रहात होतं.” अल्फा म्हणाला, “आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, तो दुसरा मनुष्य आपल्या ओळखीचाच आहे.”

“काय सांगतोस काय?” ओरडण्याची माझी दुसरी पाळी होती. अल्फा मंदपणे हसला.

“होय. कोण असेल ओळख?” तो म्हणाला, “सत्पाल सिंग!”

मी आता तिसऱ्यांदा ओरडणार होतो, पण माझ्या तोंडून शब्दच बाहेर पडले नाहीत.

“होय. एकूणच या परिस्थितीवरून असं दिसतंय, की सत्पाल सिंग जिवंत आहे.” अल्फा म्हणाला.

“तो… तो या कारस्थानात सामील आहे का?” मी विचारलं.

“नाही.” अल्फा म्हणाला, “आपण समजत होतो, की घुसखोराने किंवा त्याच्या साथीदारांनी त्याला मारून टाकलं असेल. पण त्याची डेडबॉडी कुठंच मिळत नव्हती. त्याचं उत्तर मला आत्ता सापडलं. घुसखोराने त्याला जेरबंद करून या फ्लॅटमध्ये कोंडून ठेवलं होतं.”

“पण हे सगळं तुला कसं समजलं?” मी.

“चल माझ्या सोबत.” अल्फा म्हणाला. त्याने मला पुन्हा एकदा त्या बेडरुममध्ये नेलं.

“पहिला तर बाहेरच्या खोलीत एक आणि आतल्या खोलीत एक असे दोन पलंग पाहूनच माझ्या मनात शंका आली, की या फ्लॅटमध्ये दोघंजण रहात असावेत. मग मी खोलीचं थोडं निरिक्षण केलं. माझ्या लक्षात आलं, की खिडकीची लाकडी तावदानं बाहेरून फळी मारून कायमची बंद केलेली आहेत. थोडक्यात, आतून खिडकी उघडणं शक्य नाही. असं का केलं गेलं असेल? मी खिडकीचे गज तपासले. कोणीतरी जोर लावून त्यांना उचकटण्याचा प्रयत्न केला आहे. इकडे येऊन बघ. दिसतंय का? मग मी खोलीचं दारही तपासलं. त्यावरही धक्के मारून कोणीतरी बिजागऱ्या आणि कोयंडे खिळखिळे केले आहेत, असं मला दिसलं.”

अल्फा दाखवेल तशी एकेक गोष्ट मी पहात होतो.

“यावरून काय प्रतित होतं? खोलीत कुणालातरी कोंडून ठेवलं होतं आणि आतल्या माणसाने खिडक्या, दारं धडकवून निसटण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे.” तो म्हणाला, “शिवाय खोलीत येताच आलेला कुबट वासही हेच सांगतो. मी तो मनुष्य ज्या पलंगावर झोपत होता, तो पलंग तपासला. त्याच्या खाली मला एक लांब केस मिळाला. इतर वेळी मला तो एखाद्या स्त्रीचाच वाटला असता. पण घुसखोर एखाद्या बाईला कोंडून का ठेवेल?

शिवाय खिडकीचे गज ज्या ताकदीनं उचकटण्याचा प्रयत्न झाला आहे, तो एखादी स्त्री नाही करू शकत. मी पुढे जाऊन कपाटात पाहिलं. तिथं कोपऱ्यात एक दोरखंड पडलेला दिसला, ज्यावर लांबूनच लालसर डाग दिसत होते.''

कपाट उघडून त्याने मला तो दोरखंड दाखवला. त्यावर खरंच रक्ताचे पुसट डाग पडले होते.

''यालाच पुष्टी दिली ती किचनमध्ये असलेल्या सामानाने. तिथली भांडी आणि साहित्य दोन लोकांना पुरेल असं आहे. या सगळ्यावरून काय निष्कर्ष निघतो? एक लांब केस असलेला मनुष्य बऱ्याच दिवसांपासून आतल्या खोलीत बंदिस्त करून ठेवलेला होता. सत्पाल सिंगचं गायब होणं आणि त्याची डेडबान मिळणं ही पार्श्वभूमी पाहता उत्तर सरळ आहे – या खोलीत डांबून ठेवलेला माणूस म्हणजे दुसरातिसरा कोणी नसून सत्पाल सिंगच होता!''

मी अल्फाकडे आश्चर्याने पहातच राहिलो.

''पण सत्पाल सिंगला कोणी का डांबून ठेवेल?'' मी विचारलं.

''अर्थातच, त्याला त्या रिकाम्या इमारतीतल्या प्रकाशाचं रहस्य कळालंय म्हणून.'' अल्फा म्हणाला, ''पण तुझ्या प्रश्नाला दुसऱ्या

अनुषंगाने पाहिलं, तर त्याचं उत्तर इतकं सोपं नाहीये. सत्पालला डांबून का ठेवलं? ठार का मारलं नाही? हा खरा प्रश्न आहे.”

आम्ही विचार करतच बाहेरच्या खोलीत आलो. सत्पाल सिंगचं जिवंत असणं ही एक चांगली बातमी होती. पण तिचा आमच्या शोधात कसा उपयोग होईल, हे मला समजत नव्हतं. कारण घुसखोर आता निसटला होता आणि जाताना बहुधा तो सत्पाललाही सोबत घेऊन गेला होता. शिवाय घुसखोराबद्दल किंवा त्याच्या रिकाम्या इमारतीतल्या कारनाम्यांबद्दल काही माहिती मिळेल असा कोणताही सुगावा या फ्लॅटमध्ये आम्हाला मिळाला नव्हता. मी असा विचार करत असतानाच बहुधा अल्फाला आणखी काहीतरी दिसलं. तो एकदम दारामागच्या कचराकुंडीपाशी गेला आणि आतमध्ये हात घालून मुठभर चुरगळलेले कागद बाहेर काढले.

“आहा! बघ प्रभू, या फ्लॅटमध्ये सत्पालच्या अस्तित्वाखेरीज दुसरा कोणताच पुरावा मिळाला नाही असा विचार करत होतास ना तू? हा बघ, घुसखोराबद्दल माहिती देणारा पुरावा!” अल्फा उत्तेजित आवाजात म्हणाला. त्या पुराव्यापेक्षा अल्फाने माझ्या मनातलं कसं ओळखलं, याच विचाराने मला धक्का बसला. पण कसं कोण जाणे, अल्फाला मनातले विचार ओळखायची कला अवगत होती. कदाचित सत्पाल जिवंत आहे,

हे कळूनही माझ्या चेहऱ्यावर फारसा उत्साह दिसला नाही म्हणून अल्फाला माझ्या मनातलं बरोबर ओळखता आलं असावं.

मी अल्फाच्या जवळ गेलो. बहुतेक कागद म्हणजे एखाद्या वहीतून फाडलेली,चुरगाळून बोळा केलेली पानं होती. राहिलेली दोनचार बेस्ट बसची तिकिटं होती. आम्ही सर्वप्रथम ती तिकिटं पाहिली. सगळीच्या सगळी देवनार ते लीलावती रुग्णालय बस स्टॉपची होती. अल्फाने त्या तिकिटांचं थोडं निरिक्षण केलं आणि ती खिशात ठेवून दिली. मग ते चुरगळलेले वहीचे कागद उलगडले. मी त्यात डोकावून पाहिलं. सगळ्या कागदांत अतिशय गिचमीड अशा अक्षरांत कसलीतरी आकडेमोड केली होती. जितकं लिहिलं होतं त्यापेक्षा जास्त खाडाखोडच केली होती. साहजिकच, त्यातून पटकन् काही अर्थबोध होत नव्हता. तरीही अल्फाच्या चेहऱ्यावरचा आनंद कायम होता. त्याने ते कागद झटकून, व्यवस्थित उलगडून, घडी करून त्याच्या खिशात ठेवले.

“या तिकिटांचं आणि कागदांचं जर व्यवस्थित ॲनालिसिस केलं, तर आपल्याला हवी ती सगळी माहिती मिळण्याची शक्यता आहे, प्रभू.” तो म्हणाला, “आता फक्त निरिक्षण आणि एकाग्रता पणाला लावण्याची गरज आहे, बस्स!”

त्याने माझ्याकडे बघत डोळे मिचकावले आणि तो मोडलेल्या दारातून बाहेर पडला.

*

त्यानंतरचे काही दिवस अल्फा अक्षरशः झपाटल्यासारखा त्या कचराकुंडीत मिळालेल्या कागदांच्या मागे होता. मागे रुमालावरून काढले होते तसे निष्कर्ष त्याला यावेळी कागदांवरून काढता आले नाहीत. सिगारेटच्या थोटकांमधूनही फारशी काही माहिती मिळाली नाही. मग त्याने त्या तिकिटांचा पाठपुरावा सुरू केला. ती तिकिटं साधारण महिन्याभरापूर्वीची होती. घुसखोर त्या दरम्यान बांद्रा येथील लीलावती रुग्णालयाजवळच्या भागात कुठंतरी दोनतीनदा गेला होता हे सिद्ध होत होतं. अल्फा दोन दिवस तिकडे भटकून आला. त्याने हॉस्पिटलला भेट दिली, आजूबाजूच्या परिसरात 'त्याच्या पद्धतीने' तपास केला. पण काहीच निष्पन्न झालं नाही. घुसखोराने तिकडे स्पोर्ट्स बाईक न नेता बसने जाण्याचा शहाणपणा केला होता. त्यामुळे तो बसमध्ये चढउतार करणाऱ्या गर्दीत मिसळून गेला असणार आणि साहजिकच पानवाल्यासारखं कोणीही त्याला ओळखू शकलं नसणार. अखेर अल्फाने 'लीलावती रुग्णालय' प्रकरणाचा नाद सोडून दिला.

मग राहता राहिला एकच दुवा – त्या कागदांवर खरडलेली असंबद्ध आकडेमोड! अल्फाच्या कागदांवरच्या प्राथमिक लॅब चाचण्या झाल्यानंतर मला तो मजकूर वाचायला मिळाला.


एकूण चार कागद होते ते - संपूर्ण गणिती आकडेवारी आणि गुणाकार-भागाकाराने भरलेले. प्रथमदर्शनी कुणालाही असं वाटावं, की दहावी गणिताच्या पेपरला एखाद्या विद्यार्थ्याने कच्च्या कामासाठी वापरलेले ते कागद आहेत! बऱ्याच ठिकाणी खाडाखोड केलेली होती, प्रश्नचिन्हे मांडलेली होती. सरळसरळ अंकगणिताची आकडेमोड होती ती. मी तर ते सगळं बघून चाटच पडलो होतो. घुसखोर त्या फ्लॅटमध्ये बसल्या बसल्या ही कसली गणितं सोडवत होता?

अल्फाने माझं लक्ष त्यांतल्या एका कागदाकडे वेढलं.

“हा कागद बघ. यांतले हे जे आकडे व्यवस्थित एकसलग लिहिले आहेत, ते मला फार महत्त्वाचे वाटतायत.”

मी ते आकडे पाहिले. ते काहीसे असे दिसत होते –

438, 52, 1.33, 1.09, 2



आकड्यांच्या बाजूलाच एक काटकोन त्रिकोण आणि त्याखाली छोटा बाणही काढला होता. इतर सर्व कागदांवर जी आकडेमोड केली होती, त्यात बहुतांश ठिकाणी या चौकोनातल्या आकड्यांचाच वापर केला होता.

"कदाचित हे सगळे आकडे काहीतरी गृहीतक म्हणून वापरले असावेत." मी म्हणालो, "कारण पुढचे सगळे कॅलक्युलेशन्स याच आकड्यांच्या आधारावर केले आहेत."

"हं... " अल्फाने एक मोठा श्वास घेतला आणि तो विचारांत गढला. मी पुन्हा त्या आकड्यांकडे पाहात राहिलो. त्यांतून काहीही अर्थबोध होत नव्हता. त्या आकड्यांतून एखादा संदेश देण्याचा प्रयत्न केला असावा, असंही म्हणता येत नव्हतं. कारण मग पुढचे कॅल्क्युलेशन्स कशाकरता केले होते? आणि संदेश द्यायचा झाला, तरी घुसखोर कुणाला देणार? शिवाय तो त्रिकोण... त्या त्रिकोणावरून मात्र काहीतरी अर्थ निघत होता. मला एकदम सुचलं आणि तसंच मी अल्फाला ते बोलून दाखवलं,

"अल्फा, मला असं वाटतंय, की हा काटकोन त्रिकोण कदाचित अंतर मोजण्यासाठी वापरण्यात आला असावा." अल्फाने माझ्याकडे एकदम चमकून पाहिलं. मी पुढे म्हणालो, "मी माझ्या अभ्यासक्रमात

अशा पद्धतीची काही गणितं सोडवलेली आहेत. आता आपल्या शोधात एका इमारतीचा संदर्भ आहे म्हणून मला सुचलं. ते आकडे लांबी-उंची वगैरे काहीतरी काढण्यासाठी वापरले असतील तर?”

माझं बोलणं ऐकून अल्फा पुन्हा एकदा त्या कागदांकडे पाहिलं आणि एकेक करून सगळे कागद चाळून काढले.

“पण हे कॅल्क्युलेशन्स तशा पद्धतीचे वाटत नाहीत.” अल्फा ते कागद माझ्या पुढे करत म्हणाला, “माझ्या माहितीप्रमाणे काटकोन त्रिकोणात लांबी-उंची वगैरे काढण्यासाठी ट्रिग्नॉमेट्रीक फंक्शन्स वापरतात, बरोबर ना? पण इथं कुठंच तशी समीकरणं वापरलेली नाहीयेत.”

मीही पुन्हा एकदा सगळे कागद नजरेखालून घातले. पण अल्फा म्हणाला, त्याप्रमाणे कुठंच लांबी किंवा उंची मोजण्यासाठी लागणारी समीकरणं त्या आकडेमोडीत वापरलेली नव्हती. मी डोकं खाजवत राहिलो. पण अल्फाच्या चेहऱ्यावर मात्र वेगळेच भाव अवतरले होते. इतके दिवस त्या कागदांवरच्या आकडेमोडीचा अर्थ लावण्याच्या प्रयत्नात वैतागलेला त्याचा चेहरा अचानक तेजस्वी झाला होता. अचानक त्याने त्याचा लॅपटॉप उघडला आणि काहीतरी सर्फ करू लागला.

“काय झालं?” मी गोंधळून विचारलं.

“मला एक कल्पना सुचली आहे.” अल्फा म्हणाला, “कदाचित मी फारच टोकाचा विचार करत असेन. पण सद्य परिस्थितीत आपण जे पाहिलं किंवा अनुभवलं, त्यावरून मला वाटतं की ते अगदीच अशक्य नसावं.”

“काय अशक्य नसावं? कसल्या कल्पनेबद्दल बोलतोयस् तू?” मला त्याच्या या अचानक पालटलेल्या नूराचा अर्थबोधच होईना.

“आत्ता नाही प्रभू. मला संपूर्ण खात्री झाल्यावरच मी तुला काही सांगू शकेन. आता मला मुळीच डिस्टर्ब करू नकोस. वेळ फार मोलाचा आहे.” असं म्हणून तो त्याच्या लॅपटॉपमध्ये डोकं खुपसून बसला. मी काही क्षण त्याच्याकडे पाहिलं आणि मग खांदे उडवून सोफ्यावर जाऊन बसलो. काहीतरी नवा शोध लागल्यावर सस्पेन्स ठेवण्याची अल्फाची ही सवय जुनी होती. आधी मला त्याचा राग यायचा, पण आता मला सवय झाली होती. मी निवांत वारं खात पेपर वाचत बसलो.

संध्याकाळ झाली आणि अंधार पडायला आला, तरीही अल्फा त्याच्या लॅपटॉपमधून डोकं काढायला तयार होईना. शेवटी वैतागून मी माझ्या हॉस्टेलवर जाण्याचा निर्णय घेतला. मी अल्फाचा निरोप घेणार, तितक्यात तो वर न बघताच म्हणाला,

“थांब, पाचच मिनिटं थांब प्रभू. आपल्याला आता बाहेर पडायचंय.”

“बाहेर? कुठं जायचंय?” मी विचारलं.

“आपल्या रिकाम्या इमारतीत!” तो माझ्याकडे पाहात म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर ओसांडून वाहणारा उत्साह पाहून माझी खात्री पटली, की पठ्ठ्याला काहीतरी घबाड मिळालंय!

“पुन्हा?” मी विचारलं.

“होय.” अल्फा उत्तरला.

“कशाला?” मी.

“जे आधी पाहिलं नव्हतं ते पहायला!” अल्फा लॅपटॉप मिटवत डोळे मिचकावून म्हणाला.

मला पुढे काही विचारण्याची त्यानं संधीच दिली नाही. अर्ध्या तासात आमची कार मलबार हिलच्या दिशेने धावत होती. मुंबईतील मेट्रोच्या बांधकामामुळे रस्त्यांवर झालेले ट्रॅफिक पार करण्यात आमचा बराच वेळ गेला. अखेर आम्ही जेव्हा समुद्रकिनाऱ्याजवळच्या त्या रिकाम्या इमारतीसमोर पोहोचलो, तेव्हा सर्वत्र अंधार पडला होता. मुंबईच्या रोषणाईत ही एकाकी इमारत वाळीत टाकल्यासारखी अंधारात उभी होती. अल्फाने एक छोटी बॅग पाठीवर घेतली आणि आम्ही गाडीतून

बाहेर पडलो. आवाराच्या आत शिरल्यावर अल्फाने मोबाईलचा टॉर्च सुरू केला. माझी नजर साहजिकच अकराव्या मजल्यावरच्या 'त्या' खोलीकडे गेली. इतर सर्व खोल्यांसारखी यावेळी तीही काळोखात बुडाली होती.

पुन्हा अकरा मजले चढण्याच्या विचारांनीच माझ्या गळयात आवंढा आला. आम्ही चढायला सुरुवात करण्याआधी अल्फाने तळमजल्याचा बारकाईने तपास केला. मला असं वाटलं, की तो काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करत असावा. पण त्याला ते मिळालं नाही. मी तो काय शोधतोय, हे विचारण्याचा प्रयत्नही केला नाही. आम्ही पायऱ्या चढायला सुरुवात केली. अल्फा टॉर्च जिन्यावर आणि दोन्ही बाजूला फिरवतच होता. आणि अचानक पहिल्या मजल्यावर पोहोचण्याच्या वेळी तो थबकला.

"काय झालं?" मी विचारलं. पण अल्फाने काही उत्तर न देता बाजूची भिंत तपासायला सुरूवात केली. टॉर्चच्या प्रकाशात मला दिसलं, की त्या भिंतीत साधारण दोन इंच लांबी-रुंदीचा लाकडाचा तुकडा चार खिळयांच्या आधारे ठोकण्यात आला होता. त्याच्या मधोमध एक छोटंसं छिद्र होतं, ज्याच्या आतमध्ये काहीतरी लुकलुकणारी वस्तू दिसत होती. अल्फाने त्याचा फोन माझ्या हातात दिला आणि हातांनीच तो तुकडा ओढून काढला. आतमध्ये एक छोटासा खळगा होता, ज्यात एक लहानशी काळी वस्तू बसवण्यात आली होती.

आम्ही तिच्यावर प्रकाश पाडून नीट पाहिलं. ती वस्तू म्हणजे एखाद्या इलेक्ट्रॉनिक चिपसारखी दिसत होती.

“हा कसलातरी सेन्सर आहे, अल्फा!” मी म्हणालो. मी आणखी जवळ जाऊन पाहिलं, “हा इन्फ्रारेड सेन्सर आहे.”

मी पटकन् मागे वळून जिन्याच्या विरुद्ध दिशेच्या भिंतीकडे पाहिलं. तिथंही अशाच प्रकारचा छिद्र असलेला लाकडाचा तुकडा लावण्यात आला होता. आणि विशेष म्हणजे तो पहिल्या तुकड्याच्या अगदी सरळ रेषेत, समोरासमोर होता. मी तो तुकडा काढून पाहिला. तिथंही आतमध्ये खळग्यात एक चिप बसवण्यात आली होती. या चिपचं वैशिष्ट्य म्हणजे, तिच्यातून नजरेला सहजासहजी दिसणार नाही अशा दोन वायरी निघाल्या होत्या आणि त्या जिन्याच्या खाली गेल्या होत्या. मी दोनचार पायऱ्या खाली उतरून पाहिलं. त्या वायरी जिन्याच्या खाली लपवलेल्या एका काळया डब्याच्या आत जात होत्या. माझ्या हावभावांकडे पाहून अल्फा म्हणाला,

“मला फार टेक्निकल डिटेल्स सांगता येणार नाहीत, पण हे इलेक्ट्रॉनिक सेटअप पाहून मला एवढं तरी समजलंय, की घुसखोराला कोणीतरी पायऱ्या चढून येतंय हे आधीच कसं कळत होतं!”

“बरोब्बर!” मी म्हणालो, “हा भिंतीत बसवलेला प्रॉक्झिमिटी सेन्सरचा सेट आहे. उजवीकडची चिप म्हणजे ट्रान्समिटर आहे आणि डावीकडची चिप म्हणजे रिसीव्हर आहे. या दोन्हीच्या मधून कोणी गेलं, तर त्या वायर्समधून काळ्या बॉक्सपर्यंत सिग्नल जातो. माझी खात्री आहे, की त्या काळ्या बॉक्समध्ये वेब मोड्यूल असणार. त्यातून ऑनलाईन सिग्नल जातो तो थेट घुसखोराच्या मोबाईल किंवा लॅपटॉपवर. थोडक्यात काय, तर इथून कोणीही वरती किंवा खाली जात असलं तर ते घुसखोराला समजल्याशिवाय राहणार नाही.”

“हं. म्हणजे घुसखोराला कोणीतरी वरती येतंय याची चाहूल आधीच कशी लागत होती, याचं उत्तर आपल्याला मिळालंय! साहजिकच इथून वरती जाणारा अकरा मजले चढेपर्यंत सगळं सामान गोळा करून पळ काढण्यासाठी घुसखोराला भरपूर वेळ मिळत असणार.” अल्फा म्हणाला, “व्हेरी गुड. चल, आता अकराव्या मजल्यावरच्या त्या खोलीत जाऊया.”

आम्ही एकेक मजला चढत वरती जाऊ लागलो. पण आता माझं लक्ष दुखणाऱ्या पायांकडे नव्हतं. मी पहिल्या मजल्यावर लावलेल्या सेन्सर सेटअपचा विचार करत होतो. घुसखोर बुद्धीमान, उच्चशिक्षित होता, हे मला त्या कागदांवरच्या आकडेमोडीवरून कळालं होतंच. पण आता हेही कळून चुकलं, की तो टेक्नॉलॉजीमध्येही खूप पुढे गेलेला आहे.

कोण असावा हा मनुष्य? आणि या सगळ्यातून तो काय साध्य करण्याचा प्रयत्न करत असावा?

आम्ही अकराव्या मजल्यावर पोहोचलो. तिथं अगदी कोणी डोळ्यांत बोट घातलं तरी दिसणार नाही इतका मिट्ट अंधार होता. टॉर्चच्या प्रकाशात वाट काढत आम्ही त्या खोलीपर्यंत पोहोचलो. अल्फाने आधी आतमध्ये सर्वत्र प्रकाशझोत टाकत अंदाज घेतला. आतमध्ये कोणीच नव्हतं. संपूर्ण खोली आम्ही गेल्या वेळी आलो होतो तशीच होती. आम्ही आत शिरलो. अल्फाने त्याचं भिंग काढलं आणि पुन्हा एकदा खाली वाकून बसत जमिनीचं निरिक्षण केलं.

“काही दिसतंय का?” काही मिनिटं गेल्यानंतर मी विचारलं.

“अं हं.” अल्फा उभा रहात म्हणाला, “घुसखोर त्या रात्रीनंतर परत इथं आलेला नाही.”

तो सावकाश चालत आतल्या खोलीत गेला आणि मी त्याच्या मागोमाग गेलो. हीच ती खोली होती जिथं घुसखोर दिवा लावून ठेवत होता. अल्फा खोलीच्या टोकाशी गेला आणि त्याने पाठीवरच्या बॅगेतून एक दुर्बिण काढली. ती डोळ्यांना लावून त्याने मुंबईच्या झगमगाटात दूर कुठेतरी पाहिलं. मग दुर्बिणीतून नजर काढत मोबाईलमध्ये पाहिलं. मग

पुन्हा दुर्बिणीतून काहीतरी पाहिलं. शेवटी जेव्हा त्यानं दुर्बिण पुन्हा बॅगेत ठेवली, तेव्हा त्याचा चेहरा आनंदाने खुलून आला होता.

“माझा तर्क अगदी बरोबर ठरणार असं दिसतंय, प्रभू!” तो उत्तेजित आवाजात म्हणाला, “सगळे दुवे बरोब्बर एकमेकांत बसताहेत. आता फक्त एकाच गोष्टीची खात्री करायची राहिलीय्.”

“कोणती गोष्ट? आणि तुझा तर्क आहे तरी काय नक्की?” आता मला अल्फाचं मौन असह्य झालं होतं. पण तो मला खुलासा करण्याच्या मूडमध्येच नव्हता. तो सरळ त्या खोलीच्या बाहेर पडला आणि कॉरीडॉरमध्ये इकडेतिकडे नजर फिरवू लागला. मी त्याच्या मागोमाग गेलो.

“अरे तू काय शोधतोयस ते मला सांग तरी! मी काही मदत करू शकेन.” मी वैतागून म्हणालो.

“सॉरी, ते मी तुला सांगू शकत नाही प्रभू. कारण मी काय शोधतोय हे मलाच माहिती नाहीये!” अल्फा लगबगीने धावाधाव करत म्हणाला, “मला काय हवंय, हे मला काय दिसतं त्यावर अवलंबून आहे.”

ही विचित्र प्रतिक्रिया ऐकून मी तर काय करणार? अल्फा जिकडे जाईल त्याच्या मागोमाग मोबाईलचा प्रकाश पाडत जाणे एवढंच काम माझ्या हातात उरलं. पण अल्फा मात्र कसून कशाचातरी शोध घेत होता.

त्याने आजूबाजूच्या सगळया खोल्या धुंडाळून काढल्या. अखेर आम्ही कॉरीडॉरच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पोहोचलो आणि अल्फा एकदम जागीच थांबला. समोर पायऱ्यांच्या जवळ एका कोपऱ्यात सिमेंटची दोन पोती एकावर एक अशी रचून ठेवली होती. कदाचित हेच अल्फाला हवं असावं. तो त्या पोत्याजवळ गेला आणि पुन्हा भिंग बाहेर काढत त्याने पोत्याचं निरिक्षण केलं.

"प्रभू, इकडे ये आणि हे पोतं थोडं उचलून धर." तो म्हणाला. मी मोबाईल त्याच्या हवाली केला आणि वरचं पोतं उचलून धरलं. अल्फाने त्या पोत्याच्या खालच्या भागावर प्रकाशझोत टाकत काही वेळ भिंगातून पाहिलं आणि मग तो एकदम ओरडला,

"प्रभू, आय गॉट इट्! मला त्या खोलीचं, तिच्यातल्या प्रकाशाचं आणि सत्पालच्या गायब होण्यामागचं कोडं सुटलंय! चल, ते पोतं आधीसारखं ठेव आणि धावायला लाग. आपल्याला लवकरात लवकर वाघमारेंची भेट घ्यायला हवीय."

"अरे बाबा मला एका शब्दाने तरी काहीतरी सांग!" मी पोतं खाली टाकत म्हणालो.

"तुला सांगत बसण्याएवढा वेळ आपल्याजवळ नाहीये. हे प्रकरण खूपच गंभीर आहे आणि आपण थोडासा जरी विलंब केला, तरी अनर्थ

होऊ शकतो. आता मी वाघमारेंना भेटेन तेव्हा सगळंकाही सविस्तर सांगेन. थोडी कळ काढ. तुला सगळ्याचं स्पष्टीकरण मिळेल. आता चल, लगेच!"

पुढच्याच सेकंदाला अल्फा एक आख्खा जिना उतरलादेखील होता. इतकं तातडीने वाघमारेंना सांगण्यासारखं काय असावं, याचा विचार करत मीही पायऱ्यांवरून उड्या मारत खाली उतरायला सुरुवात केली. पाच मिनिटांनी आम्ही मुख्य रस्त्याला लागलो होतो आणि आमची कार एसीपी वाघमारेंच्या निवासस्थानाच्या दिशेने धावत होती. खरंतर अल्फाने वाघमारेंच्या घरी पोहोचेपर्यंत मला या केसबद्दल त्याला जे कळालंय ते सांगायला हरकत नव्हती. पण त्याच्या चेहऱ्यावरचं गांभीर्य पाहून मला त्याला आग्रह करण्याची हिंमत झाली नाही.

काही वेळ अल्फा भायखळ्याच्या दिशेने ड्राईव्ह करत राहिला. मध्येच अचानक त्याने टर्न घेतला आणि आमची गाडी वेस्टर्न एक्स्प्रेसवेच्या दिशेने जाऊ लागली.

"आपण कुठं चाललोय?" मी गोंधळून विचारलं.

"वाघमारेंच्या घरी." अल्फा म्हणाला.

"त्यांचं घर तर दुसरीकडे राहिलं. तू गाडी विरुद्ध दिशेला वळवली आहेस." मी म्हणालो.

“मला ठाऊक आहे.” एवढंच अल्फा म्हणाला आणि गाडी चालवत राहिला. त्याचं कोड्यात वागणं कधीकधी माझ्या आकलनशक्तीच्या पलीकडे जायचं. आणि अशा वेळी मी जे घडतंय ते फक्त बघत राहण्याचा पर्याय स्विकारायचो. आत्ताही मी तसंच केलं आणि खिडकीतून बाहेर बघत राहिलो. काही वेळातच आम्ही अल्फाच्या अपार्टमेंटमध्ये पोहोचलो. त्याने पार्किंगमध्ये गाडी लावली आणि काहीच न घडल्यासारखा पायऱ्या चढू लागला. मी फक्त त्याच्या मागे चालत राहिलो. फ्लॅटचं लॉक उघडून आम्ही आत आलो आणि अल्फा दिवा लावून खुर्चीवर जाऊन बसला.

“आता माझं बोलणं शांतपणे ऐक.” अल्फा म्हणाला आणि अखेर त्याच्या या विचित्र वागण्याचा खुलासा होणार, हे समजून मी आनंदलो. मी त्याच्या शेजारीच सोफ्यावर जाऊन बसलो. तो पुढे म्हणाला, “आपल्याला वाघमारेंकडे जायचं आहे . पण कुणाला न कळू देता.”

“कुणाला कळू न देता म्हणजे? कुणाला कळणार आहे?” मी विचारलं.

“आपल्यावर पाळत ठेवणाऱ्याला.” अल्फा म्हणाला. ते ऐकून मी दचकलोच, “मला वाटतंय, की आपल्यावर कोणीतरी लक्ष ठेवून आहे.”

“काय सांगतोस?” मी आश्चर्याने विचारलं, “पण कशासाठी?”

“तुला आत्ता सगळं सांगत बसायला वेळ नाही.” अल्फाने त्याचं नेहमीचं विधान माझ्या तोंडावर मारलं, “पण हे प्रकरण अतिशय गंभीर आहे, प्रभू. आणि आपल्याला प्रत्येक क्षणी सतर्क रहायला हवंय. आपण काही वेळ असेच बसू. मग दिवा बंद करू, जेणेकरून जे कोणी आपल्यावर नजर ठेवतंय त्याला वाटेल की आपण नेहमीसारखेच झोपी गेलो. त्यानंतर माझा खास मार्ग वापरून अंधारात आपण इथून सटकू आणि वाघमारेंचं घर गाठू. “

मला अचानक धोक्याच्या सावलीखाली आल्यासारखं वाटलं. अचानक आमच्यावर पाळत ठेवायला कोणी सुरवात केली होती? घुसखोराच्या साथीदारांनी? आणि अल्फाला ते कसं कळालं? आमच्यावर पाळत ठेवून ते लोक घुसखोराला सुरक्षित ठेवण्याची प्रयत्न करत होते का?

बारा वाजण्याच्या सुमारास अल्फाने खिडकी लावून घेतली आणि दिवा बंद केला. मी कुतूहल म्हणून हळूच खिडकी बारीकशी सरकवून फटीतून बाहेर पाहिलं. काही मोजकी वाहनं सोडता रस्ता सामसूम होता. मी कोणी पाळत ठेवणारा मनुष्य दिसतोय का, याचा शोध घेतला. पण तसं कोणीच दिसलं नाही.

“बाहेर कोणी नाहीये अल्फा.” मी मागं वळून म्हणालो.

"मला पाहू दे." अल्फा खिडकीजवळ आला आणि त्याने फटीतून बाहेर पाहिलं. मग माझ्याकडे वळून तो म्हणाला, "तू नीट पाहिलं नाहीस, प्रभू. बाहेर कितीतरी लोक आहेत, जे आपल्यावर पाळत ठेवणारे असू शकतात. इकडे ये."

मी अल्फा दाखवेल तिकडे पाहू लागलो. तो म्हणाला,

"ती रस्त्याच्या कडेला थांबलेली कार दिसतेय? तिच्यात एक माणूस झोपलाय. कुणालाही वाटेल, की तो एखादा ड्रायव्हर आहे आणि गाडी बाजूला लावून ताणून देतोय. पण त्याच्या आरशात आपली खिडकी दिसतेय आणि कदाचित तो आपल्यावर लक्ष ठेवायला तिथं हजर असेल. त्यानंतर, समोरचं अपार्टमेंट पाहतोयस का? पहिल्या मजल्यावर एका फ्लॅटची खिडकी उघडी आहे आणि खिडकीलगतच आतमध्ये एक माणूस काहीतरी वाचत बसलाय. कदाचित तो बसल्या बसल्या आपल्या हालचालींवर नजर ठेवून असेल. तिकडे कोपऱ्यावर एक एटीएम आहे, ज्याच्या बाहेर सिक्युरिटी गार्ड विडी फुंकत बसलाय. कदाचित आपल्यावर पाळत ठेवण्याचं काम त्याच्यावर सोपवलं असेल. आता तुझ्या लक्षात आलं का, कितीतरी निरनिराळ्या मार्गांनी निरनिराळ्या व्यक्तींकडून आपल्यावर पाळत ठेवली जाऊ शकते. त्यामुळे आपण प्रत्येक पाऊल सावधगिरीनेच उचलायला हवं."

“पण आपल्यावर पाळत ठेवली जातेय, ही शंका एकाएकी तुझ्या मनात का आली? आणि तू अचानक सावधानता बाळगायला सुरुवात का केलीस?” मी विचारलं.

“कळेल. लवकरच कळेल.” अल्फा गूढ आवाजात म्हणाला.

आम्ही थोडा वेळ जाऊ दिला. मग अल्फाने मला ‘आता निघुया’ अशी खूण केली. त्याने फ्लॅटला कुलूप लावलं आणि पलीकडच्या त्याच्या लॅबवजा खोलीचं कुलूप उघडलं. तिथं बाथरूमच्या खिडकीतून खाली उतरण्याची व्यवस्था करून ठेवली गेली होती. तरी नशीब, दोनच मजले उतरायचं होतं. नाहीतर मी काही हे साहस करायला धजावलो नसतो. आम्ही खाली उतरलो आणि कंपाऊंडवरून उडी मारून अपार्टमेंटच्या मागच्या गल्लीत आलो. तिथून चालत मुख्य रस्ता गाठायला आम्हाला पाच मिनिटं लागली. तिथं अधूनमधून जा-ये करणाऱ्या दुचाकी आणि रिक्षांशिवाय दुसरी काही वर्दळ नव्हती.

आम्ही एक रिक्षा थांबवली आणि स्टेशनचा रस्ता धरला. अल्फाचं लक्ष बाजूच्या आरशांवरती होतं. रस्त्यावर रहदारी होती, पण कोणी आमचा पाठलाग करतंय की नाही, हे सांगता आलं नसतं. आम्ही कांजूरमार्ग स्टेशनवर उतरलो. अल्फा फलाटावरच्या बाकावर जाऊन बसला आणि मीही त्याचं अनुकरण केलं. दादरला एक ट्रेन आम्ही जाऊ दिली. यापुढची ट्रेन शेवटची होती. अल्फाचं पूर्ण फलाटावरच्या

हालचालींवर बारीक लक्ष होतं. अखेर ट्रेन आली आणि आम्ही त्यात चढलो.

“आपण त्यांना चकवण्यात यशस्वी झालोय.” अल्फा म्हणाला, “कोणीही आपला पाठलाग करत नाहीये.”

“इतकी खबरदारी कशासाठी, अल्फा?” मी अखेर न राहवून विचारलं, “त्या घुसखोराला आपण इतकं का घाबरतो आहोत?”

“हे प्रकरण आता फक्त घुसखोरापर्यंत मर्यादित राहिलं नाहीये, प्रभू.” अल्फा खालच्या सुरात म्हणाला, “कदाचित आपली गाठ एका खतरनाक दहशतवादी संघटनेसोबत पडलीये!”

ते ऐकून माझा जो ‘आ’ वासला गेला, तो बराच वेळ मिटलाच नाही.

***

# सहा

दोन ट्रेन्स बदलून, दोन टॅक्सी बदलून अखेर आम्ही वाघमारेंच्या घरी पोचलो. अल्फाने मला रेल्वेच्या प्रवासात सगळ्या प्रकरणाचा आणि त्याच्या निष्कर्षांचा थोडक्यात सारांश सांगितला होता आणि ते ऐकून माझं डोकं बधिर झालं होतं. अल्फाने घराची बेल वाजवली. एका अर्धवट झोपेत असलेल्या नोकराने दार उघडलं.

“वाघमारे सर आहेत का?” अल्फाने विचारलं.

“तुम्ही कोण?” नोकराने उलट प्रश्न केला.

“त्यांना सांग, अल्फा आलाय. अर्जंट भेट घ्यायची आहे.” अल्फा म्हणाला.

"ते आत्ता झोपले आहेत." नोकर कोरडेपणाने म्हणाला.

"हे बघ, आत्ता राज्याची सुरक्षितता धोक्यात आहे. जर आत्ता मला वाघमारेंना भेटता आलं नाही आणि नंतर काही अनर्थ झाला, तर मी वाघमारेंना सरळ तुझं नाव सांगेन. मग तुझी इथली नोकरी तर जाईलच, शिवाय तुला दुसरीकडे कुठे नोकरी मिळणार नाही याची वाघमारे सर दक्षता घेतील." अल्फा आवाजात थोडी जरब आणत म्हणाला. त्यावरून नोकराच्या चेहऱ्यावरची झोप उडाली आणि त्याजागी थोडी भीती अवतरली. त्याच्या लक्षात आलं, की समोर उभारलेल्या तरुणाची पोहोच बरीच मोठी आहे. आवाजात जबरदस्तीनं नम्रता आणत तो म्हणाला,

"आत या ना, मी साहेबांना लगेच बोलावतो."

आम्ही आत शिरलो आणि सोफ्यावर बसलो. काही क्षणांतच वाघमारे जांभई देत बाहेर आले.

"एवढ्या रात्री तुम्ही इथं काय करताय रे पोरांनो? कुठं आग लागलीये?" त्यांनी विचारलं. त्यांच्या आवाजात झोपमोड झाल्याचा वैताग स्पष्ट दिसत होता.

"सर, खाली बसा. तुम्हाला माझं बोलणं शांतपणे ऐकून घेण्याची गरज आहे."अल्फा म्हणाला.

"अरे पण झालंय काय एवढ्या मध्यरात्री?" वाघमारे आमच्या समोर बसत म्हणाले. त्यावर अल्फा शांतपणे उत्तरला,

"मुख्यमंत्र्यांच्या हत्येचा कट रचण्यात आला आहे. आपल्याला तातडीने हालचाली करण्याची गरज आहे!"

ते ऐकून वाघमारे सुन्न होऊन अल्फाकडे पाहातच राहिले. त्यांना अल्फाच्या बोलण्याचा अर्थ कळायला काही सेकंद जावे लागले.

"काय म्हणालास?" काही क्षण स्तब्धतेत गेल्यावर वाघमारेंनी विचारलं.

"मी म्हटलं, की मुख्यमंत्र्यांच्या हत्येचा कट रचला गेलाय. आपल्या यंत्रणेला हाय अलर्ट देणं नितांत गरजेचं आहे." अल्फा म्हणाला. ते ऐकून वाघमारेंनी माझ्याकडे पाहिलं.

"काय बोलतोय हा?" ते म्हणाले.

"खरंच बोलतोय, सर!" मी म्हणालो.

"खरं बोलतोय म्हणजे... पण... " त्यांना काय बोलावं, हे सुचेनासं झालं. मग पुन्हा अल्फाकडे वळून ते बोलले, "तू कालपर्यंत त्या रिकाम्या इमारतीमधील घुसखोरीच्या केसवर काम करत होतास ना? मग हा मुख्यमंत्र्यांच्या हत्येचा कट कुठून आला मधूनच?"

“त्या रिकाम्या इमारतीमधील घुसखोरी म्हणजेच हत्येच्या कटाचा एक भाग आहे. हे सगळं प्रकरण म्हणजे एक मोठं षडयंत्र आहे, सर!” अल्फा म्हणाला.

वाघमारेंनी क्षणभर अल्फाकडे पाहिलं. मग ते म्हणाले,

“मला सगळं पहिल्यापासून, सविस्तर सांग.”

अल्फाने एक मोठा श्वास घेतला आणि तो बोलू लागला,

“आपण मागच्या वेळी भेटलो होतो, तेव्हा मी तुम्हाला ती रिकामी इमारत, चौकीदार सत्पाल सिंगचं गायब होणं, त्याची डायरीत उल्लेख केलेला खिडकीतला प्रकाश आणि शेजारच्या सोसायटीतल्या वॉचमनलाही तसाच प्रकाश दिसणं हे सगळं सांगितलं होतंच. मी आणि प्रभवनंही खूप सारे तर्क लढवूनदेखील आमच्या लक्षात येत नव्हतं, की कोणी रात्री अपरात्री अकराव्या मजल्यावर जाऊन दिवा का लावतंय आणि फक्त तेवढंच नव्हे, तर दिवा लावून लगेच फरारही होतंय. आम्ही त्या जागेला जी भेट दिली, त्यातून फक्त एकच लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आम्हाला दिसली – आणि ती म्हणजे खोलीच्या दारापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत जमिनीवर एखादी जड वस्तू ओढत नेल्याचे निशाण! याखेरीज घुसखोराने कोणत्याही खाणाखुणा मागं सोडल्या नव्हत्या.

“मग आम्ही त्याला पकडण्यासाठी सापळा कसा रचला, तो आमच्या हातांवर तुऱ्या ठेवून कसा निसटला आणि त्याच्या पाठीवरच्या लंबूळक्या बॅगवरून सीसीटीव्हीच्या मदतीने आम्ही त्याचा ठावठिकाणा कसा शोधला, हेही मी तुम्हाला गेल्या वेळी सांगितलंय. तो देवनारमधल्या गायकवाड चौकाच्या भागात कुठंतरी रहात होता, हे नक्की. मी थोडं माझ्या पद्धतीने शोध घेतला आणि मला कळालं, की मला जसा हवा होता तसाच एक माणूस हॉस्पिटल रोडवरच्या एका इमारतीत रहात होता. मी आणि प्रभव तिथं गेलो खरे, पण यावेळीही त्याला कुठूनतरी आमच्या पाठलागाचा शोध लागला होता आणि तो आम्ही यायच्या आधीच सगळी खोली साफ करून पळाला होता.

“तेव्हाच मला शंका आली, की हा माणूस एकटा काम करत नसावा. त्याला खबरी देणारं एखादं नेटवर्क असणार, जे वेळोवेळी त्याला सावध करून सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतंय. आम्ही त्याच्या फ्लॅटची तपासणी केली, तेव्हा आमच्या आणखीन एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे रिकाम्या इमारतीचा वॉचमन सत्पाल सिंग जिवंत होता आणि त्याला त्याच फ्लॅटमधल्या एका खोलीत डांबून ठेवण्यात आलं होतं. असं का करण्यात आलं असावं? त्यांना सत्पालकडून कसली माहिती हवी होती का? की सत्पालला त्या लोकांबद्दल काहीतरी अत्यंत गुप्त असं काहीतरी

कळालं होतं आणि त्यामुळे त्याचं तोंड बंद करणं गरजेचं झालं होतं? तसं असेल तर त्यांनी त्याला ठार का मारलं नाही?

"उत्तर सरळ होतं. सत्पालला ठार मारून त्यांनी त्याची बॉडी कुठंतरी टाकून दिली असती, तर आज ना उद्या ती कुणालातरी सापडणार होती. त्यावर पोलीस तपास सुरू झाला असता आणि सर्वांचं लक्ष त्या रिकाम्या इमारतीवर वेधलं गेलं असतं. तेच घुसखोराला नको होतं. त्यामुळे त्यांनी सत्पालला न मारता डांबून ठेवलं. पण यातून एक गोष्ट स्पष्ट झाली – ती रिकामी इमारत या सगळ्याच्या केंद्रस्थानी होती आणि तिथं जो काही उद्योग चालला होता, तो या कानाची खबर त्या कानाला न लागता व्हावा असे प्रयत्न सुरू होते. पण तो उद्योग नक्की काय आहे, हे मात्र अजूनही माझ्या लक्षात येत नव्हतं.

"आम्ही घुसखोराचा फ्लॅट तपासला. तिथं काही चुरगाळून फेकलेल्या कागदांखेरीज आम्हाला काहीही सापडलं नाही. त्या कागदांवर अनाकलनीय अशी काही आकडेमोड केली होती. त्याचा अर्थ लावत असताना प्रभवनं एक शक्यता बोलून दाखवली – ती म्हणजे ती आकडेमोड अंतर किंवा उंची मोजण्यासाठी केलेली असू शकते. अडचण ही होती की त्या आकडेमोडीत अंतर-उंची मोजण्यासाठी नेहमी वापरण्यात येणारी समीकरणं वापरली नव्हती. पण तरीही मला त्या शक्यतेतून वेगळी कल्पना सुचली. मी ते कॅल्क्युलेशन्स पुन्हा एकदा

तपासले. मग इंटरनेटवरच्या काही माहितीचा आधार घेतला आणि कागदावर वापरण्यात आलेली समीकरणं पडताळून पाहिली. तेव्हा माझ्या लक्षात आलं, की ती समीकरणं लाँग रेंज शूटिंगमध्ये वापरण्यात येतात – म्हणजे थोडक्यात स्नायपर्स!

“तिथून मग एकेक कोडी सुटायला सुरुवात झाली. घुसखोराच्या पाठीवरची ती लंबूळकी बॅग – तिच्यात नक्कीच स्नायपर रायफल असणार! रिकाम्या इमारतीत इतक्या उंचावरच्या खोलीत रात्रीच्या वेळी दिवा का लावण्यात येत होता? कारण स्नायपर रायफलमध्ये बरेच सेटिंग्ज करावे लागतात जे अंधारात करत येण्यासारखे नव्हते. शिवाय घुसखोराचं जे टार्गेट होतं, ते इमारतीच्या त्याच विशिष्ट खोलीतून दिसत असावं. रात्रीच्या वेळीच का? कारण सकाळी हा उपद्व्याप करताना कुणाच्यातरी नजरेस पडण्याची भीती होती. घुसखोराने इमारतीच्या जिन्यात प्रॉक्झिमिटी सेन्सर लावले होते, जेणेकरून कोणी वरती आलंच तर त्याला पटकन् बंदूक बॅगेत टाकून पळ काढता यावा. इतकी अ‍ॅडव्हान्स उपकरणं वापरण्यासाठी सखोल तांत्रिक ज्ञान हवं, जे एखाद्या स्नायपरकडे निश्चितपणे असतं!

“आणखी एका प्रश्नाचं उत्तर मला मिळायचं राहिलं होतं. त्यानंतरच माझी थिअरी सिद्ध होणार होती. तो प्रश्न म्हणजे, ज्या खोलीत दिवा लागत होता तिथल्या जमिनीवर एखादी जड वस्तू घसटत नेल्याचे निशाण

मिळाले होते. त्यामागचं काय रहस्य होतं? तीच एक गोष्ट अशी होती जिचा स्नायपरच्या थिअरीशी मेळ बसत नव्हता. याचा शोध घेण्यासाठी मी आणि प्रभव इथं यायच्या आधी त्या रिकाम्या इमारतीत गेलो होतो. थोडा तपास आणि मेंदूचा वापर केल्यावर मला ते कोडं सुटलं. त्या खोलीच्या जमिनीवरून घसटत नेण्यात येणारी वस्तू म्हणजे सिमेंटचं भरलेलं पोतं होतं! तुम्हाला ठाऊक आहे की नाही मला माहीती नाही, पण स्नायपर लोक बंदूक ठेवण्यासाठी आधार म्हणून कधीकधी वाळूने भरलेली पोती वापरतात. गोळी मारल्यानंतर होणारं 'रिकॉईल' या पोत्यामुळे शोषून घेतलं जातं. अर्थात, त्यांना ऑन फिल्ड नेहमीच असं पोतं मिळत नाही. पण स्नायपर्सच्या मिलिट्री ट्रेनिंगमध्ये अशा पोत्यांचा उपयोग होतो, हे मला निश्चितपणे ठाऊक आहे.

"घुसखोराला खोलीच्या सपाट पृष्ठभागावर बंदूक ठेवून लक्ष्य साधता आलं नसतं. त्यामुळे तो जिन्यापाशी ठेवलेल्या पोत्यांमधलं एक पोतं उचलून आणत होता आणि बंदूक पोझिशन करण्याच्या ठिकाणी ठेवत होता. कोणीतरी वरती येतंय अशी चाहूल लागली, तर ते पोतं ओढत नेऊन आधीच्या जागी ठेवणं एवढंच त्याचं काम! याचे पुरावे मला जिन्यापाशी ठेवलेल्या पोत्यावरही मिळाले. त्याच्या तळाशी जमिनीवर घासल्याचे निशाण स्पष्ट दिसत होते.

"त्यामुळे माझ्या तर्काचं रुपांतर खात्रीत झालं. घुसखोर उंचावरून बंदूकीने निशाण साधून कुणालातरी गोळ्या झाडणार होता. मी त्या खोलीत उभा राहून दुर्बिणीतून पाहिलं आणि मला या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात आलं. तिथून मुख्यमंत्र्यांचं निवासस्थान स्पष्ट दिसत होतं. मी गुगल मॅपवर अंतरही पाहिलं. त्या इमारतीपासून मुख्यमंत्र्यांचं निवासस्थान जेमतेम अर्धा किलोमीटर अंतरावर होतं – स्नायपर बंदूकीच्या सहजपणे आवाक्यात येईल असं! त्यामुळे तातडीने मी तिथून बाहेर पडलो आणि तुमची गाठ घ्यायचं ठरवलं.

"आता तुमच्या लक्षात आलं असेलच - कोणीतरी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधण्याचा प्रयत्न करतंय आणि तो मनुष्य अजूनही आपल्या हाताबाहेर आहे! देवनारमधल्या फ्लॅटच्या अनुभवावरून हे तर स्पष्टच होतं, की माझ्या प्रत्येक हालचालीवर त्यांचं लक्ष आहे. त्यामुळे आम्ही त्यांना चकवा देऊन तुम्हाला भेटायला आलो आहे. घुसखोराचा प्लॅन आमच्या लक्षात आला आहे, हे चुकूनही त्यांना कळता कामा नये. नाहीतर ते सावध होतील आणि घुसखोर आपल्याला कधीच सापडणार नाही."

अल्फाचं बोलून झाल्यावर पुढची काही मिनिटं त्या खोलीत शांतता होती. वाघमारे सर अल्फाची हकिकत ऐकून स्तब्ध झाले होते. अखेर त्यांनीच त्या शांततेचा भंग केला.

“तू.. तू जे सांगतोयस, ते खरं असण्याची कितपत शक्यता आहे?” त्यांनी विचारलं.

“टक्केवारीत सांगायचं झालं तर शंभर टक्के!” अल्फा म्हणाला. त्याच्या आवाजातला आत्मविश्वास पाहून वाघमारेंचा चेहरा गंभीर बनला.

“मला हे सगळं माझ्या वरिष्ठांना ताबडतोब कळवायला हवं!” ते पुटपुटले, “तुझे निष्कर्ष चुकीचे असतील अशी शक्यता असली, तरीही!!”

ते झटकन् उठले आणि मोबाईलवर काही नंबर फिरवत दूर गेले. अल्फाच्या चेहऱ्यावर त्याच्या कष्टांचं फळ मिळाल्याचं समाधान दिसलं.

“नशीब वाघमारे सर इथं आहेत. नाहीतर कोणी आपल्याला दाद लागू दिली नसती.” तो म्हणाला.

“हे सगळं अविश्वसनीय आहे! मी स्वप्नातसुद्धा विचार केला नव्हता, की सत्पलाच्या गायब होण्यावरून झालेली सुरुवात मुख्यमंत्र्यांच्या हत्येच्या कटापर्यंत येऊन पोचेल!” मी म्हणालो.

“म्हणून मी नेहमीच म्हणत असतो – ‘नेव्हर टेक एनिथिंग ऑन इट्स फेस व्हॅल्यू’! जे समोर दिसतं ते आहे तसं कधीच स्विकारायचं नाही. कमीतकमी माझ्या क्षेत्रात तरी नाही. कारण कोणती गोष्ट तुम्हाला मोठा ब्रेकथ्रू देईल, हे सांगता येत नाही.”

अल्फा बोलत असतानाच वाघमारे परत आले.

“मी डिपार्टमेंटला कळवलंय. मुंबई पोलीसांना लवकरच हाय अलर्ट देण्यात येईल आणि अँटी-टेररिस्ट स्क्वाडलाही कळवण्यात येईल. आत्ता लगेच आपल्याला हेड-क्वार्टरला जायचंय. कमिशनर साहेबांना मी या प्रकरणाची माहिती देईन तेव्हा तुम्ही तिथं असणं आवश्यक आहे. मी दोन मिनिटांत तयार होऊन येतो. तोपर्यंत तुम्ही इथंच थांबा.”

ते आतमध्ये गेले. थोड्याच वेळात आम्ही मुंबई पोलीस हेड-क्वार्टरच्या दिशेने कूच केलं होतं.

*

रात्री दहाच्या ठोक्याला आम्ही मुंबई पोलीस मुख्यालयाच्या स्पेशल कॉन्फरन्स रूममध्ये होतो. तिथं पोलीस कमिशनर, सीबीआय, रॉ आणि इतर काही गुन्हे आणि दहशतवाद अन्वेषण संस्थांचे प्रतिनिधी हजर होते. मला प्रथम वाटलं की मला आतमध्ये सोडणार नाहीत. पण सगळ्या घटना-शृंखलेचा साक्षीदार म्हणून अल्फासोबत मलाही आत बोलावून घेण्यात आलं. अर्थात, आम्ही दोघंही तिथं फार वेळ थांबलो नाही हा भाग वेगळा. पण मुख्यमंत्र्यांच्या जीवाला खरंच धोका आहे का, याचं

समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत सर्वांनी अल्फावर प्रश्नांची चौफेर सरबत्ती केली.

“आपण मुख्यमंत्र्यांना संपूर्ण संरक्षण देऊ आणि या प्रकरणाचा तातडीने तपास सुरू करू, याबाबत शंकाच नाही.” श्री. रेड्डी म्हणाले. ते एनआयएचं प्रतिनिधित्व करत होते आणि तिथं उपस्थित असलेल्या लोकांच्यात सर्वात अनुभवी दिसत होते., “पण माझा प्रश्न हा आहे, त्या रिकाम्या इमारतीतून दुर्बिण घेऊन पाहिलं, तर मुख्यमंत्र्यांचं घर दिसतं एवढ्यावरून कोणीतरी त्यांना मारण्याचा प्रयत्न करतंय हा निष्कर्ष कितपत विश्वासार्ह आहे? कदाचित हा या तरुणांच्या कल्पनेचा खेळ असावा.”

“पण हा तरुण सांगतो त्याप्रमाणे जर तो मनुष्य लंबुळकी बॅग घेऊन त्या इमारतीत गेला असेल, तर त्यात स्नायपर रायफल असण्याची नक्कीच संभावना आहे, नाही का?” मुंबई पोलीस कमिशनर श्री. कोठारी म्हणाले.

“संभावना तर मी नाकारत नाहीचे, मिस्टर कोठारी. आय ॲप्रिशिएट् दी एफर्ट्स ऑफ धिस् जंटलमन्. याने मांडलेली थिअरी वाखाणण्याजोगी आहे यात शंकाच नाही. पण मला फक्त एवढंच बघायचंय, की या तर्कशृंखलेत आपण एखादी गोष्ट ग्राह्य तरी धरत नाहीये ना? किंवा यातून एखाद्या दुसऱ्या धोक्याची शक्यता आहे जिच्याकडे आपण दुर्लक्ष तर करत नाहीये ना? जसं की, त्या खोलीतून समुद्रातल्या घुसखोरांना सिग्नल

दिला जात असेल आणि काही दहशतवादी कारवाया नियंत्रित केल्या जात असतील. केवळ मुख्यमंत्र्यांचं निवासस्थान त्या इमारतीपासून जवळ आहे म्हणून आपण तिकडं लक्ष केंद्रित करू आणि एखादं मोठं कारस्थान आपल्या नजरेतून सुटायचं. ते मला नको आहे. यू अंडरस्टँड माय पॉईंट?”

“तुमच्या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकतो, मिस्टर रेड्डी.” अल्फा म्हणाला, “रिकाम्या इमारतीचा वॉचमन सत्पाल सिंग जेव्हा गायब झाला, ती तारीख होती पंधरा एप्रिल. त्याच्या आधी सलग दोन दिवस त्याला इमारतीच्या खोलीत मंद प्रकाश दिसला होता, म्हणजे घुसखोर त्यावेळी इमारतीत शिरला होता. दोन्ही दिवस सत्पालने हस्तक्षेप केल्यामुळे घुसखोराला त्याचा हेतू साध्य न करताच तिथून परतावं लागलं. तिसऱ्या दिवशी जेव्हा सत्पालने पुन्हा अडथळा आणला, तेव्हा मात्र घुसखोर आणि त्याच्या संघटनेच्या लक्षात आलं की सत्पाल सिंगला रस्त्यातून बाजूला करणं आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्याला ताब्यात घेऊन घुसखोराच्याच फ्लॅटमध्ये बंदिस्त करून ठेवलं.

“आता खरंतर घुसखोराचा मार्ग मोकळा झाला होता. पण त्या दिवसानंतर जवळपास एक महिना घुसखोर त्या इमारतीत गेला नाही. कारण मी स्कायलाईन अपार्टमेंटच्या वॉचमनशी जेव्हा बोललो, तेव्हा तो म्हणाला की सत्पालच्या गायब होण्यानंतर बरेच दिवस रिकाम्या इमारतीच्या त्या खोलीत कोणताही प्रकाश दिसला नव्हता. थेट एका

महिन्यानंतर, म्हणजे मेच्या शेवटच्या आठवड्यात त्याला पुन्हा एकदा तोच प्रकाश दिसला जो सत्पालने पाहिला होता.

"जर घुसखोर मुख्यमंत्र्यांना टार्गेट करत नव्हता आणि त्याचा हेतू काही और होता असं काही क्षण गृहीत धरलं, तर मग सत्पालला गायब केल्यानंतर त्याने इमारतीत येणं का थांबवलं? आणि साधारणपणे एका महिन्यानंतर असं काय घडलं ज्यामुळे घुसखोर पुन्हा त्या इमारतीत शिरला आणि त्याने पुन्हा दिवा लावला?

"याचं उत्तर एकच आहे – ते म्हणजे, सत्पाल गायब झाल्याच्या रात्रीच मुख्यमंत्री दिल्ली दौऱ्यावर गेले होते. त्यामुळे रिकाम्या इमारतीत शिरायचा रस्ता साफ असूनसुद्धा घुसखोराला तिथं जाऊन काहीच मिळणार नव्हतं. त्यानंतर एका आठवड्याने ते त्यांच्या निवासस्थानी परतले. पण तोपर्यंत सत्पाल सिंग गायब झाल्याची बातमी पेपर-आऊट झाली होती आणि पोलीसतपास सुरू झाला होता. लोकांचं लक्ष त्या इमारतीकडे वेधलं गेलं होतं. त्यामुळे लगेचच त्या इमारतीत जाणं धोक्याचं होतं. घुसखोराने वातावरण निवळण्याची वाट पाहिली. आठवड्याभरात जेव्हा पोलीस तपास थंडावला, तेव्हा त्याने पुन्हा इमारतीत जाऊन मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधायचं ठरवलं.

"पण नेमकं तेव्हाच मुख्यमंत्र्यांना श्वासोच्छ्वास करण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांना बांद्रा येथील लीलावती हॉस्पिटलमध्ये हलवण्यात

आलं. त्यामुळे घुसखोराचा बेत पुन्हा बारगळला. पण तरीही त्याने धीर न सोडता तिथे जाऊन पाहणी केली. कोणत्याही प्रकारे मुख्यमंत्र्यांपर्यंत पोचता येतंय का, ते पाहिलं. शिवाय आजुबाजुला कोणत्या उंच इमारती आहेत जिथून मुख्यमंत्र्यांची रूम दिसेल आणि त्यांना शूट करता येईल, हेही पाहिलं. पण तशी कोणतीच शक्यता त्याला दिसेना. त्यामुळे रुग्णालयात मुख्यमंत्र्यांना मारण्याचा विचार त्याने रहित केला आणि ते पुन्हा घरी येण्याची वाट पाहू लागला.

“मेच्या शेवटच्या आठवड्यात जेव्हा मुख्यमंत्री त्यांच्या निवासस्थानी परतले, तेव्हा घुसखोराने पुन्हा तयारी सुरू केली. त्याने रिकाम्या इमारतीमधली त्याची नेहमीची जागा घेतली आणि तेव्हाच स्कायलाईन अपार्टमेंटचा वॉचमन दिपक कोळी याने दुरून खोलीतला प्रकाश पाहिला. दुसऱ्याच दिवशी मी, माझा मित्र प्रभव आणि दिपक, तिघांनी मिळून घुसखोराला रंगेहाथ पकडण्याचा डाव टाकला. दुर्दैवाने तो आम्हाला सापडला नाहीच, पण आपल्याकडे कुणाचंतरी लक्ष गेलंय हे त्याला समजून चुकलं. त्यामुळे त्याने रिकाम्या इमारतीचा सगळा प्लॅनच रद्द केला. तो ज्या कुणा संघटनेकडून काम करतोय, ती सतर्क झाली असणार आणि कदाचित त्यांनी माझ्यावर पाळत ठेवायला सुरुवात केली असणार. मी घुसखोराचा पत्ता शोधून काढण्यात यशस्वी होतोय, असं

दिसायला लागल्यावर त्यांनी पटकन् घुसखोर आणि सत्पाल सिंगला त्यांच्या देवनारमधल्या फ्लॅटमधून दुसरीकडे हलवलं.

"तुम्हाला आता लक्षात आलं असेल – घुसखोर मुख्यमंत्र्यांना टार्गेट करतोय हे जर गृहीत धरलं, तर त्याच्या प्रत्येक हालचालीचा अर्थ लागतो. तुम्ही तारखासुद्धा तपासून पाहू शकता. माझ्याकडे सत्पाल सिंगची डायरी आणि घुसखोरानं लीलावती रुग्णालयाला जेव्हा भेट दिली ती तिकिटंसुद्धा आहेत. आणि मला खात्री आहे, की घुसखोर एक नवा हल्ला प्लॅन करतोय – नवीन ठिकाणी आणि नव्या वेळी. त्यानं कागदावर केलेली आकडेमोड म्हणजे याच नव्या ठिकाणाहून शूटिंग करण्यासाठी लागणाऱ्या स्नायपर सेटींगसाठी केलेली आकडेमोड आहे. आता फक्त हे ठिकाण कोणतं आहे, हे आपल्याला शोधून काढायचंय."

काही क्षण कॉन्फरन्स हॉलमध्ये शांतता पसरली. रेड्डींचा चेहरा भावशून्य होता. तेवढ्यात 'रॉ' संघटनेचे प्रतिनिधी श्री. गुप्ता बोलले,

"मि. रेड्डी, मी एक मुद्दा मांडू इच्छितो. आमच्या एक्सपर्ट्सनी हा तरुण ज्या आकडेमोडीच्या कागदांबद्दल बोलतोय, ते कागद तपासले. आणि त्यांचाही निष्कर्ष हाच आहे, की तसे कॅल्क्युलेशन्स एखादा स्नायपरच करू शकतो. त्यामुळे आय् ॲग्री विद व्हॉट ही इज् सजेस्टींग."

ते ऐकून अखेर रेड्डींचे भाव बदलले. ते म्हणाले,

"ऑल् राईट! सो वुई आर ऑन ट्रॅक. आता प्रश्न असा आहे, की घुसखोराचा पुढचा प्लॅन काय आहे? आणि त्याला आपण कसं पकडू शकतो?"

"त्याचाही मला थोडा अंदाज आला आहे." अल्फा म्हणाला, "जर आपली परवानगी असेल तर मी बोलू का?"

रेड्डींनी मान हलवली. अल्फा म्हणाला आणि सर्वजण त्याचं बोलणं ऐकू लागले,

"घुसखोराचा मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी हल्ला करण्याचा बेत तर फसला. मग आता तो काय करेल? त्यांच्या एखाद्या सभेत किंवा कार्यक्रमात त्यांना शूट करण्याचा प्रयत्न करेल. त्यासाठी तो त्या सभेच्या ठिकाणी रिकाम्या इमारतीसारखी एखादी उंच जागा शोधेल जिथून त्याला निशाणा साधता यावा. कदाचित याच नव्या जागेच्या ठिकाणी स्नायपर बंदूकीच्या सेटिंगसाठी त्याने त्या कागदांवर आकडेमोड केली असेल. आता त्या कागदांपैकी एका कागदावर बॉक्समध्ये काही आकडे लिहिलेले आहेत. त्याच्या उजव्या बाजूला एक काटकोन त्रिकोणही काढलेला आहे. त्या आकड्यांवरून आपण घुसखोर पुढचा हल्ला कुठं करणार असावा, याचा थोडा अंदाज लावू शकतो. हे पहा."

अल्फाने ते आकडे असलेला कागद टेबलावर ठेवला आणि तो पुढे म्हणाला,

“यावर पाच आकडे एकामागोमाग एक असे लिहिलेले आहेत. माझ्या मित्राने सुचवलं, की हे आकडे सगळ्या कॅल्क्युलेशन्ससाठी गृहीतक म्हणून वापरलेले असू शकतात. ते ध्यानात घेऊन मी पुढचे काही अंदाज बांधण्याचा प्रयत्न केला. आता एखाद्या स्नायपरच्या कॅल्क्युलेशनमध्ये कोणती गृहीतके असू शकतात? आणि त्यावरून आकडेमोड करून काय आऊटपुट मिळतं?

“इंटरनेटवरच्या माहितीचा थोडा अभ्यास केल्यावर माझ्या लक्षात आलं, की चारपाच गोष्टी आहेत ज्या स्नायपरच्या सेटींगसाठी आवश्यक असतात. त्या म्हणजे, शूटिंग पॉईंटपासून ते टार्गेटचं अंतर, ज्या उंचीवरून तो शूट करणार आहे ती उंची, स्वतः टार्गेटची ग्राऊंडपासून उंची, वाऱ्याचा वेग आणि दिशा इत्यादी. जर इथं लिहिलेले आकडे याच व्हॅल्यू दर्शवत असतील तर? मी त्या आकड्यांचा थोडंफार अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. स्नायपरला लागणाऱ्या इनपुट्समध्ये सर्वात मोठा आकडा कोणता असणार? अर्थातच टार्गेटचं अंतर. म्हणजे ४३८ हे मुख्यमंत्री सभेत जिथं उभारणार, तिथून घुसखोरानं निवडलेल्या इमारतीचं अंतर असावं. ४३८ फूट तर नसावं, कारण ते एखाद्या स्नायपरसाठी फारच जवळ होईल. मग मीटर? शक्य आहे. पण मी जितकं वाचलं, त्याप्रमाणे स्नायपरच्या

समीकरणांत यार्ड हे प्रमाण वापरलं जातं. त्यामुळे ते अंतर ४३८ यार्ड असणार.

“हे पहिलं गृहीतक बरोबर असलं, तर पुढची सगळी गृहीतकं बरोबर येतात. उदाहरणार्थ, अंतर झाल्यावर दुसरा मोठा आकडा म्हणजे घुसखोर जिथून शूट करणार त्या ठिकाणची जमिनीपासून उंची असायला हवी. म्हणजे ५२ यार्ड उंचीवरून तो हल्ला करणार आहे. इमारतीचा एक मजला साधारण साडेतीन यार्डांचा असतो. म्हणजेच, तो चौदाव्या किंवा पंधराव्या मजल्यावरून शूट करणार आहे. बॉक्समधला तिसरा आणि चौथा आकडा काय असावा, याबद्दल मलाही कल्पना नाही. कदाचित त्यांतला एक म्हणजे वाऱ्याचा त्या ठिकाणचा सरासरी वेग असेल. पण पाचवा आकडा खात्रीशीरपणे टार्गेटची उंची दाखवतो. २ यार्ड म्हणजे सहा फूट आणि मुख्यमंत्र्यांची उंचीदेखील सहा फूट आहे. म्हणजे आपला अंदाज बरोबर असल्याचा आणखी एक पुरावा. आणि शेवटी या सगळ्या गोष्टींचा वापर करून घुसखोराने ‘मिल् डॉट’ व्हॅल्यू कॅल्क्युलेट केली आहे जी स्नायपर गनची सेटींग दर्शवते.

“आता या सगळ्या माहितीवरून हल्लेखोराला कसं पकडता येईल? त्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या पुढच्या दोनतीन सभांच्या ठिकाणांचा मी आढावा घेतला. सोळा जूनला ते ठाणे येथील वस्तुसंग्रहालयाचं उद्घाटन करायला जाणार आहेत. पण ती एक बंदिस्त जागा आहे आणि तिथं

हल्लेखोराला शूट करता येणार नाही. त्यांचा पुढचा पब्लिक अपिअरन्स म्हणजे पंचवीस जून रोजी सायन येथील एका मेडिकल कॉलेजचा दीक्षांत समारोह. पण या कॉलेजच्या आसपास चारशे यार्डांच्या परिघात पंधरा मजली इमारतच नाहीये. त्यामुळे तोही पर्याय बाद झाला. त्यानंतर मुख्यमंत्री जनतेच्या समोर येणार आहेत, ते आझाद मैदानावरच्या त्यांच्या सभेला – सत्तावीस जून रोजी. आणि घुसखोर याच ठिकाणी त्यांना शूट करणार असावा असं मला वाटतं. कारण आझाद मैदानाच्या आसपास चारशे यार्डांवर दोन ते तीन इमारती आहेत, जिथं पंधरापेक्षा जास्त मजले आहेत. शिवाय मैदानावर सभा असल्याने हल्लेखोराला ओपन टार्गेट मिळेल. त्यामुळे या दोन-तीन इमारतींवर लक्ष ठेवलं, तर आपण घुसखोराला रंगेहाथ पकडू शकतो.”

अल्फा जेव्हा बोलत होता, तेव्हाच ‘रॉ’चे प्रतिनिधी त्यांच्या आय-पॅडवर माहिती तपासत होते. अल्फाचं बोलणं संपताच त्यांतला एकजण म्हणाला,

“ही इज् राईट! त्या मनुष्याला हल्ला करायचा असेलच, तर सत्तावीस जूनची सभा म्हणजे त्याच्यासाठी सर्वोत्तम संधी आहे. आणि आझाद मैदानाच्या जवळ बावन्न यार्ड किंवा त्यापेक्षा जास्त उंचीच्या तीनच इमारती आहेत. त्यांतल्या दोन रेसिडेन्शियल आहेत आणि एक

कमर्शियल आहे. तो रेसिडेन्शियल इमारत वापरण्याची जास्त शक्यता आहे. कमर्शियल इमारतींना जास्त टाईट सुरक्षा असते."

"ओके, देन! व्हॉट्स द स्ट्रॅटेजी?" रेड्डींनी विचारलं. त्यावर 'रॉ'चे प्रतिनिधी म्हणाले,

"मला वाटतं, की हल्ल्याची बातमी ऐकल्यावर मुख्यमंत्री किंवा त्यांचा पक्ष सभा रद्द करण्याचा निर्णय घेणार. पण त्यामुळे हल्लेखोर सावध होईल आणि त्याचं पितळ उघडं पडलंय, याची त्याला खात्री होईल. त्याऐवजी आपण मुख्यमंत्र्यांना सभा रद्द करण्यापासून परावृत्त करू. तिथं पार्टीचे सगळे नेते येतील, फक्त मुख्यमंत्र्यांना तिथं येऊ द्यायचं नाही. त्यांना यायला उशीर होणार आहे असं चित्र तयार करायचं. हल्लेखोर त्याचं सेटअप रेडी करून मुख्यमंत्र्यांची वाट बघत बसेल आणि तेवढ्या वेळात आपण त्याला पकडू शकू."

"ओके, तुमचा प्लॅन चांगला आहे." रेड्डी निर्णायक सुरात म्हणाले, "पण सभेच्या दिवसापर्यंत आपण तसंच हातावर हात ठेवून बसू शकत नाही. तो मनुष्य देवनारमधल्या ज्या फ्लॅटमध्ये रहात होता, तिथं आजूबाजूच्या कोणीतरी त्याला पाहिलेलं असणारच. तिथल्या लोकांना ताबडतोब कॉंटॅक्ट करा आणि घुसखोराचं स्केच बनवून घ्या. आपल्या एजंट्समध्ये ते स्केच डिस्ट्रीब्यूट करा. जे दोन रेसिडेन्शियल अपार्टमेंट आहेत, तिथल्या मॅनेजरना कल्पना देऊन ठेवा. कोणी नुकताच फ्लॅट

भाड्याने घेतलाय किंवा घेणार आहे का, याची चौकशी करा. शिवाय कमर्शियल इमारतीवरही लक्ष ठेवा. वुई हॅव् टू कॅच दॅट बास्टर्ड!"

रेड्डींच्या आक्रमक धोरणामुळे सगळयांना चेव चढला. कोठारी त्यांच्या अधिकाऱ्यांना बोलावून सूचना देऊ लागले. मिटींग बरखास्त झाली, तेव्हा वाघमारे आमच्या जवळ येऊन म्हणाले,

"तुमचं इथलं काम झालेलं आहे. तुम्ही बाहेर पडा आणि सरळ घरी जा. काही धोका वाटला, तर ताबडतोब मला फोन करा. तू बंदूक बाळगतोयस् ना?"

अल्फाने मान डोलावली.

"गुड. वेळ आली, तर ती वापरायला मागेपुढे पाहू नकोस. नाऊ गो अँड अ‍ॅक्ट नॉर्मल. काही घडलंच नाही असं दाखवत रहा. आता प्रकरण 'रॉ' आणि 'एनआयए'च्या हाती गेलं आहे. त्यामुळे तुलाच काय, आम्हालाही स्वतंत्रपणे काहीही करता येणार नाही. पण तरी काही लागलं तर तुला मी फोन करेन."

आम्ही वाघमारेंचा निरोप घेऊन बाहेर पडलो.

*

त्यानंतर काही दिवस शांततेत गेले. तीस जूनला मी मुंबईला रामराम ठोकून घरी जायला निघणार होतो. मी माझ्या सामानाची बांधाबांध हळू हळू करून संपवली. कॉलेजमधील कागदपत्रे, सर्टिफिकेट्स वगैरेंचं कामही झालं. अल्फाकडे एकदोनदा जाणं झालं, पण तेव्हा आधीसारखंच अल्फाने माझ्या जाण्याची काहीच चौकशी केली नाही. आमचं जे काही बोलणं झालं ते रिकाम्या इमारतीच्या केसबद्दल आणि हल्लेखोर कधी पकडला जाईल, यावरच झालं. अल्फा वाघमारेंच्या संपर्कात होता आणि त्याला त्यांच्याकडून बऱ्याच अपडेट्स मिळत होत्या. सध्या भारतीय गुप्तचर विभागाच्या एजंट्सनी एकदोन लोकांना संशयित म्हणून हेरलं होतं. पण अजूनही कुणाला अटक झाली नव्हती.

सत्तावीस जूनचा दिवस जवळ येऊ लागला तशी माझ्या छातीमधली धडधड वाढू लागली. पोलीस डिपार्टमेंट आणि ‘एटीएस’च्या माणसांनी हल्लेखोराला पकडण्यासाठी सापळा रचला असणार, याबद्दल मला खात्री होती. दरम्यानच्या काळात अल्फाकडून मला असं समजलं, की त्याने आमच्यावर पाळत ठेवणारा माणूसदेखील शोधून काढला होता. त्या रात्री अपार्टमेंटच्या शेजारील खिडकीत बसलेली व्यक्तीच हल्लेखोराच्या संघटनेचा हेर होता असं अल्फाने मला सांगितलं. त्याने ही गोष्ट लगेच वाघमारेंना कळवली आणि त्या पाळत ठेवणाऱ्या माणसावरच त्याच्या नकळत पाळत ठेवली जाऊ लागली. पण त्याला या गोष्टीचा संशयदेखील

आला नाही. अल्फावर नजर ठेवण्याचं काम त्यानं प्रामाणिकपणे सुरू ठेवलं. आणि त्यावरूनच आम्हाला कळालं, की भारतीय गुप्तचर यंत्रणेला मुख्यमंत्र्यांवरील हल्ल्याच्या कटाची माहिती मिळाली आहे, याचा हल्लेखोर संघटनेला थांगपत्ताही लागलेला नाहीये.

अखेर सभेचा दिवस उजाडला. मला त्या दिवशी नेमकं मेडिकल टेस्टचं काम आलं. त्यामुळे मी दिवसभर गव्हर्न्मेंट हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या टेस्ट्स करून घेण्यात मग्न होतो. पण माझं लक्ष पूर्णवेळ अल्फाच्या मेसेजकडे होतं. आजचा दिवस म्हणजे या प्रकरणाचा निर्णायक दिवस ठरणार होता. हल्लेखोराला सभेच्या आधीच, पण रंगेहाथ पकडण्याचं नियोजन होतं. पण अर्थातच कितीही तयारी केली, तरी शेवटच्या क्षणी काहीतरी गडबड होण्याची शक्यता होतीच. अल्फाशी दुपारी माझं बोलणं झालं, तेव्हा आज दिवसभर खोलीतच बसून राहण्याचा त्याचा बेत आहे असं त्याने सांगितलं. आता फक्त वाघमारेंच्या फोनची वाट पाहणं एवढंच आमच्या हातात होतं.

संध्याकाळी सहाच्या सुमारास मी मेडिकल रिपोर्ट्स घेत असतानाच माझा फोन वाजला आणि स्क्रीनवर अल्फाचं नाव पाहून माझ्या छातीत धस्स झालं. नक्कीच हल्लेखोराची बातमी अल्फापर्यंत येऊन पोचली होती. मी अधीरतेने फोन उचलला आणि अल्फाचा आवाज आला,

"प्रभू, आपण जिंकलो! दहशतवादी संघटनेचा खेळ उधळण्यात आला आहे. हल्लेखोर पकडला गेलाय!"

"खरंच? हल्लेखोर पकडला गेला?" मी ओरडलोच.

"होय. आत्ताच वाघमारेंचा फोन आला होता." अल्फा म्हणाला.

"येस येस!" मला माझ्याच नकळत आनंदाच्या उकळया फुटत होत्या. पण क्षणभरात माझ्या लक्षात आलं, की रिपोर्ट काउंटरवरची बाई आणि तिथं उपस्थित असलेले लोक माझ्याकडे विचित्र नजरेने पाहात आहेत.

'सॉरी' असं म्हणत मी बाजूला झालो आणि कोपऱ्यात जाऊन ऐकू लागलो. अल्फा पुढे म्हणाला,

"हल्लेखोराला आझाद मैदान पोलीस चौकीत नेण्यात आलंय. आपल्याला तिकडेच जायचंय. तू आहेस तिथंच थांब. मी तुला घ्यायला येतोय."

"ओके. मी वाट पाहतोय." मी म्हणालो.

थोड्याच वेळात अल्फाने मला पिकअप केलं आणि आम्ही आझाद मैदान पोलीस चौकीत पोचलो. इन्स्पेक्टर वाघमारे तिथंच होते. आम्हाला पाहताच ते बाहेर आले.

“अल्फा! तू तर जाळ काढलास मित्रा! छोट्या मोठ्या प्रकरणांवरून उड्या मारत असताना एकदम लाँग जंपच घेतलीस! तुझे सगळे अंदाज बरोबर निघाले. हल्लेखोर आमच्या ताब्यात आहे. त्याला माहिती आणि मदत पुरवणारी साखळीदेखील आयडेंटिफाय झालीये आणि तेही लवकरच गजाआड होतील. तुझ्यावर पाळत ठेवणारा माणूसही तू बरोब्बर ओळखलास. त्यालाही आम्ही ताब्यात घेतलंय. मी आता आत्मविश्वासाने हे विधान करू शकतो, की धोका टळलेला आहे.”

“हल्लेखोराला पकडण्यात काही अडचण तर आली नाही ना?” अल्फाने विचारलं.

“नाही. त्याच्या प्लॅनची आपल्याला माहिती आहे, हे त्याच्या गावीही नव्हतं. त्याने जिथून सभेचं स्टेज दिसेल, अशा ठिकाणी एक फ्लॅट भाड्याने घेतला होता आणि तिथं त्याचं स्नायपरचं सेटअप रेडी करून ठेवलं होतं. आपल्या माणसांनी तिथं घुसून त्याला सगळ्या सामानासकट पकडलं.” वाघमारे उत्तरले.

“तो कोणत्या संघटनेचा सदस्य आहे? आणि मुख्यमंत्र्यांना मारण्याचा त्याचा हेतू तरी काय होता” मी विचारलं.

“ठाऊक नाही.” वाघमारे म्हणाले, “अजून त्याने तोंडातून एक अक्षरही काढलेलं नाहीये. त्याचं नावही अजून आपल्याला ठाऊक

झालेलं नाहीये. पण लवकरच तो बोलेल. तो नाहीतर त्याच्या टोळीतलं कोणी ना कोणीतरी बोलेलच. नाही बोलले, तर आपले एनआयएचे एजंट्स त्यांना बोलायला भाग पाडतील.”

आम्ही बोलत असतानाच श्री. रेड्डी आतून बाहेर आले. अल्फाला पाहताच ते आमच्याजवळ आले.

“यू हॅव् डन ए फिनॉमिनल् जॉब, यंग मॅन!” ते स्तुतीपर आवाजात म्हणाले, “देशाला तू एका मोठ्या संकटातून वाचवलंयस. मी मुख्यमंत्री आणि माझ्या वरिष्ठांशी बोलताना तुम्हा दोघांचं नाव नक्कीच नमूद करेन. वेल् डन!”

“धन्यवाद, सर.” अल्फा नम्रपणे स्तुती स्विकारत म्हणाला.

“आमचं इथलं काम झालंय. गुन्हेगाराला घेऊन माझी टिम लवकरच इथून रवाना होईल. त्याआधी, आय वुड् लाईक टू हॅव् युवर कार्ड.”

अल्फाने स्मित करत त्याच्या ‘इंटेलिजन्स सर्व्हिस’चं कार्ड रेड्डींना दिलं.

“आणि तुम्हीसुद्धा, वाघमारे. थँक यू फॉर युवर क्विक रिस्पॉन्स. भविष्यात पुन्हा भेट होईल अशी आशा करतो. गुडबाय!” असं म्हणून ते निघून गेले. वाघमारेंनी आनंदात अल्फाच्या पाठीवर थाप मारली.

“आम्हाला हल्लेखोराला पाहता येणार नाही का?” मी विचारलं.

“नाही. आय ॲम सॉरी.” वाघमारे म्हणाले, “हा राष्ट्रीय सुरक्षिततेचा मामला आहे. त्यात मी काहीच हस्तक्षेप करू शकत नाही. तुम्हाला आत्ता इथं येऊ दिलं, हेच मोठं भाग्य समजा.”

“ठीक आहे तर, वाघमारे सर. आम्ही निघतो.” अल्फा म्हणाला, “तुम्ही निवांत झाला की भेटू मग.”

वाघमारे हसले.

“नक्कीच. मी फोन करेन.”

*

अशा तऱ्हेने रिकाम्या इमारतीतील त्या अर्धप्रकाशित खिडकीचं प्रकरण नाट्यमयरित्या समाप्त झालं. नंतर चौकीदार सत्पाल सिंग याचीही सुटका करण्यात आली. त्या संघटनेच्या लोकांपैकीच एकाच्या फ्लॅटवर तो डांबून ठेवलेल्या स्थितीत आढळला. अल्फाने वाघमारेंना सक्त बजावून ठेवलं, की जरी या प्रकरणाची बातमी पेपरात आली, तरी त्याचं नाव कुठंही येता कामा नये. शिवाय हे दहशतवादी कारस्थान उघडकीस आणल्याबद्दल जर काही बक्षीस वगैरे मिळणार असेल, तर ते ‘स्कायलाईन’ अपार्टमेंटचा वॉचमन दिपक कोळी याला देण्यात यावं. वाघमारेंना अल्फाच्या मागण्या मान्य करण्यावाचून दुसरा पर्यायच नव्हता.

आम्ही ज्या गुन्हेगाराच्या मागावर होतो, त्याला न पाहताच केस क्लोज होण्याची ही पहिलीच वेळ होती, आणि कदाचित शेवटचीही. कदाचित – माझ्यासाठी शेवटची… कारण मी तर आता इंग्लंडला निघालो होतो. कमीतकमी पाचसहा वर्षे तरी माझा मुक्काम तिकडे असणार होता. अर्थात, अधूनमधून भारतात येणं होणार होतं. पण तेवढ्यात अल्फासोबत पुन्हा एखाद्या साहसात भाग घ्यायला मिळण्याची संधी नक्कीच मिळणार नव्हती. तीस जूनच्या सकाळी आम्ही नाश्त्याला भेटलो. अजूनही अल्फाने माझ्या परदेशात जाण्याच्या योजनेवर काहीही भाष्य केलं नव्हतं. त्याने थंडपणे ऑर्डर दिली आणि तो म्हणाला,

“रेड्डींचा मला फोन आला होता.”

“कशाबद्दल?” मी विचारलं.

“इंटेलिजन्स एजन्सीज् जॉईन करायला आवडेल का, असं ते विचारत होते.” तो म्हणाला.

“ओह् माय गॉड! अभिनंदन, अल्फा! ही खूप मोठी संधी आपणहूनच तुझ्याकडे चालून आली आहे. भारतीय गुप्तचर विभागात काम करणं म्हणजे तुझ्या बुद्धीला यथायोग्य न्याय देण्यासारखं आहे.” मी म्हणालो, “काय कळवलंस तू त्यांना?”

“मी त्यांना प्रामाणिकपणे नकार दिला.” अल्फा म्हणाला.

“आर यू सिरियस?” मला ते ऐकून धक्काच बसला, “अरे पण का?”

“तेच कारण, ज्यासाठी मी पोलीसांत किंवा सीआयडीत भरती झालो नाही.”तो एक मोठा उसासा सोडत म्हणाला, “तुला ठाऊक आहे प्रभू, मला कुणाच्या हाताखाली काम करायला आवडत नाही. कुणाच्या ऑर्डर्स स्विकारणं हा माझा स्वभाव नाही. मला कशावर काम करायचं आहे आणि कशावर नाही, हे ठरवणारा मीच असलो पाहिजे. मी रेड्डींना सांगितलं, की तुम्हाला कोणत्याही मदतीची किंवा माहितीची गरज भासली, तर बिनधास्त मला संपर्क करा. मी नेहमी मुंबईतच, त्याच पत्त्यावर रहात असेन. पण मला सिस्टममध्ये आणण्याचा प्रयत्न तेवढा करू नका!”

“मग काय म्हणाले ते?”

“काय म्हणणार? हसून मला शुभेच्छा दिल्या आणि फोन ठेवला.” अल्फा म्हणाला.

“हरकत नाही. तुला स्वतंत्रपणे केसेस घ्यायच्या असतील, तर कोणीच तुला अडवू शकत नाही. तू तुला हवं तसंच कर आणि आवडतं तेच कर.” मी म्हणालो.

“हं.” तो म्हणाला. थोडा वेळ आमच्यापैकी कोणीच बोललं नाही. मग अखेर मी विषयाला तोंड फोडलंच,

"मी आज घरी निघतोय." मी म्हणालो.

"अच्छा!" अल्फाने इतकीच प्रतिक्रिया व्यक्त केली.

"वीस ऑगस्टला माझी लंडनची फ्लाईट आहे. पुन्हा मुंबईला येणं कधी होईल सांगता येत नाही." मी म्हणालो.

"हं... म्हणजे तुझ्या जाण्याच्या प्लॅनमध्ये काही बदल होणार नाही तर!" एक मोठा उसासा टाकत अल्फा म्हणाला.

"म्हणजे? कसला बदल अपेक्षित आहे तुला?" मी चकित होऊन विचारलं. त्यावर अल्फा हसला.

"अजूनही तुझ्या लक्षात आलं नाही का प्रभू?" तो म्हणाला, "मी इतके दिवस तुझ्या जाण्याच्या विषयांवर बोललो नाही, तुझी विचारपूस केली नाही, अभिनंदन केलं नाही याचा अर्थ सरळच नाही का? मला तुझा इंग्लंडमध्ये पुढील शिक्षण घेण्याचा बेत मुळीच पसंत पडलेला नाहीये. मला वाटलं, की आजउद्या काहीतरी होऊन तुझा विचार बदलेल, किंवा तू प्लॅन रद्द करशील. पण तसं काहीच घडलं नाही."

"काय?" माझा माझ्या कानांवर विश्वासच बसत नव्हता, "पण माझा प्लॅन रद्द व्हावा असं तुला का वाटलं? हे तर एका जवळच्या मित्राला जसं वाटायला हवं त्याच्या बरोबर विरुद्ध आहे अल्फा!"

"मला माहिती आहे!" अल्फा म्हणाला, "यात माझा पूर्ण स्वार्थ आहे, दुसरं काही नाही. तू जाशील लेका इंग्लंडला. आणि इथं माझे तर्क, निरिक्षणं, निष्कर्ष कोण ऐकणार? माझ्यासोबत साहसात सहभागी कोण होणार? मी एकटा पडणार नाही का?"

"तुला एखादं रहस्य समोर दिसलं, की दुसरं कोणी लागतं का? आणि तसंही तू तुझे निष्कर्ष मला शेवटपर्यंत सांगत नाहीसच. मग कशाला हवाय मी सोबतीला? " मी म्हणालो. त्यावर अल्फा खळखळून हसला.

"अगदी हीच तक्रार ऐकण्यासाठी तू सोबत हवा आहेस, प्रभू!" तो म्हणाला, "मला रहस्याचा उलगडा करताना धक्का तंत्र वापरायला आवडतं. संपूर्ण प्रकरणात मौन राखून शेवटी अचानक खुलासा करण्यात जी मजा आहे, ती वेळोवेळी माझे तर्क सांगून तुला शोधाची माहिती देण्यात नाही. तुझ्या जागी दुसरा कोणी असता, तर त्यानं माझ्या या वागण्याला वैतागून अंग काढून घेतलं असतं. पण तू मी काही सांगणार नाही, हे ठाऊक असूनसुद्धा माझ्या सोबत येतोस आणि पाठपुरावा करत राहतोस. असा मित्र माझ्यासारख्या विचित्र स्वभावाच्या माणसांना क्वचितच मिळतो."

अल्फाच्या त्या स्पष्टीकरणावर मी स्मितहास्य केलं. तो पुढे म्हणाला,

“कॉलेजमध्ये केवळ हौस म्हणून प्रकरणांत नाक खुपसणाऱ्या मुलापासून ते भारतीय गुप्तचर खात्याची ऑफर धुडकावून लावणाऱ्या तरुणापर्यंतचा माझा प्रवास तू पाहिला आहेस आणि, मी खरंतर कुणाला श्रेय देत नाही, पण त्या प्रवासात तुझा फार मोठा वाटा आहे. त्यामुळे मी कितीही प्रयत्न केला, तरी तुझ्या इंग्लंडला शिक्षणासाठी जाण्याच्या निर्णयावर आनंद व्यक्त करू शकत नाही.”

मी काही क्षण शांत राहिलो. अल्फाने आमच्या मैत्रीवर मोकळेपणाने बोलण्याचे प्रसंग क्वचितच यायचे. हा त्यांतलाच एक होता.

“तुझं म्हणणं मला पटतंय, मित्रा. आणि मी त्यासाठी तुझ्यावर रागावणार नाही. पण माझं जाणं अटळ आहे. तुझ्यासोबत एखाद्या नव्या साहसात भाग घेण्याची संधी मला पुन्हा कधी मिळेल, हे मला ठाऊक नाही आणि मलाही त्याचं वाईट वाटतंय. कदाचित मला केंब्रिजला ॲडमिशन मिळाल्याच्या आनंदात मी ते व्यक्त करू शकत नाहीये. पण मला खात्री आहे, की तो दिवस नक्कीच येईल. कदाचित मध्ये अनेक वर्षं उलटतील. पण उशिरा का होईना, तो दिवस येईल. आणि त्यावेळी तुझ्या हाकेला प्रतिसाद द्यायला मी हजर असेन.”

तेवढ्यात आमची ऑर्डर आली.

"आता मला वाटतंय, की मी रेड्डींना होकार द्यायला हवा होता. गुप्तचर विभागाच्या एखाद्या मिशनच्या निमित्ताने तरी मी इंग्लंडला आलो असतो!" अल्फा म्हणाला. आम्ही दोघंही हसलो. अखेर आमचा नाश्ता झाला आणि बिल वगैरे पे झालं.

"ठिकाय तर.. निरोप घ्यायची हीच वेळ आहे. कदाचित मला स्टेशनवर किंवा एअरपोर्टवर येणं जमणार नाही." अल्फा म्हणाला, "फेअरवेल, प्रभव देसाई! बी इन टच्!"

आम्ही एकमेकांना आलिंगन दिलं आणि आपापल्या मार्गांना लागलो. अल्फाने मला स्टेशनवर किंवा एअरपोर्टवर सोडायला येणं मुद्दाम टाळलं, हे मला कळत होतं. पण मी त्याला आग्रह केला नाही. मी दुःखी होतो का? मला ठाऊक नाही. सिनेमात दाखवतात तसं मेलोड्रॅमॅटिक तर मला मुळीच वाटत नव्हतं. कारण मला माहित होतं, की आम्ही पुन्हा भेटणार आहे. कदाचित तो प्रसंग एवढ्यात येणार नाही. कदाचित हा या कहाणीतला छोटासा 'ब्रेक' असेल. पण अल्फासोबतची साहसं इथंच थांबणार नव्हती, हे नक्की!

***

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या. साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धीआणि विकास नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820 (Whatsapp free books)